बा. वा.

229

BVBK-0400291

कि.

बा. वा.
नों. क्र. २९७

म. नं. मं. कर्वे. [illegible]
[illegible]
दा. क्र. २९७ दिनांक .....
विषय किशोर - २७०

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

इतिहासातील एक महान धाडसी पर्व.

# प्रतापगडाच्या छायेत

म. ग्रं. स. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय
दा. क्र. २९१ दिनांक
विषय किशोर क्र. २६०

साईदास आपटे.

BVBK-0400291

अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

प्रकाशक : अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

© साईदास आपटे.

घर नं. १०६, वरचा वाडा, मोरजी, ता. पेडणे (गोवा राज्य)

मुद्रक : श्रीधर रघुनाथ कुलकर्णी, श्रीधर मुद्रणालय, कराड.
३३८, सोमवार पेठ, कराड.

☆

माझे वडील .... थोर नाटचकलाकार

कै. श्रीपाद जिवाजी आपटे

यांच्या स्मृतीस ....

साईदास आपटे

☆

जाणीव— या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी लेखकास ३० रु. मानधन देवून लेखकाची परवानगी घेणे अत्यावश्यक आहे. परवानगीशिवाय प्रयोग करणाऱ्यावर व संबंधित व्यक्तीवर म्हापसा-गोवा न्यायालयात कायदेशीर इलाज केला जाईल.

लेखक

किमत ५ रुपये.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

# मनोगत.

आज रसिक वाचकांच्या हाती मी माझं ऐतिहासिक नाट्य-पुष्प ' प्रतापगडाच्या छायेत ' देत आहे. सामाजिक नाट्य लेखनात क्वचित प्रसंगी काल्पनिकपणा आला तर फारसा खटकत नाही, पण इतिहासाशी तोच काल्पनिकपणा खटकल्यावाचून राहात नाही. प्रस्तुत नाटक लिहिताना हा अनुभव मला आला. थोडक्यात या नाटकाचं कथानकच मी आपल्यासमोर ठेवतो. " प्रतापगडाच्या छायेत " हे नाटक लिहिताना मला कै. ह. ना. आपटे (कादंबरीकार) यांच्या ' सूर्योदय ' या कादंबरीचा बराचसा उपयोग झाला. शिवाजीला पकडून नेण्यासाठी विजापूरहून अफजुलखान वाईला येतो. याच सुमारास चंद्रराव मोऱ्यांची मुलगी आपल्या बापाच्या खुनाचा सूड घेण्यासाठी शिवाजी विरुद्ध कारस्थान करीत असते. एका बाजूनं खानाचा धिंगाणा तर दुसऱ्या बाजूनं या बाईची कृष्ण कारस्थानं. विजापुरातून जाधव, निरोजी, कमल अशी माणसं शिवाजीच्या आश्रयाला येतात. त्यानाही भयंकर त्रास सहन करावा लागतो. खानाच्या माणसाकडून निरोजी मरतो. त्याची बायको सती जाते. जाधवराव व कमल यांची ताटातूट होते. चंद्ररावाची मुलगी संतीणीच्या वेषात असते. कमलही संतीणीचा वेष घेऊन तिच्या सेवेला येते. व तिनं रचलेल्या कृष्णकारस्थानातून शिताफीने शिवाजीची मुक्तता करते शिवाजी महाराज कमलला आश्रय देतात. जाधवराव संशयानं शिवाजीला दोषी ठरवू पाहतो, पण कमल निष्पाप आहे असं कळताच तो त्याना शरण येऊन त्यांच्याच पदरी राहतो. शेवटी खानाचा वध शिवाजी करतो. जावळीकरांची पोरगीही आत्महत्या करते. अशा कथानकावर हे नाटक बेतण्याचा मी प्रयत्न केला व माझ्या कुवतीप्रमाणे संवाद तयार करून त्यांत गुंफले. यांत मी किती यशस्वी झालो हे सुज्ञ रसिकानीच ठरवावे. आशा आहे की नाट्यरसिक माझ्या याही नाट्यपुष्पाला मायेनं गोंजारून हृदयाशी धरतील. शेवटी मी सर्वांचाच अनंत ऋणी आहे.

जय महाराष्ट्र – जय हिंद !

आ. नम्र,

ता. ३०।१०।७८ साईदास आपटे.

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

प्रस्तुत 'प्रतापगडाच्या छायेत' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग तारीख १९–३–७८ रोजी श्री कानडी वंस प्रासादिक नाटय मंडळ मोरजी या संस्थेने सादर केला. त्यावेळी त्यांत भाग घेणारे–

–: कलाकार :–

| | | |
|---|---|---|
| शिवाजी | : | श्री. चंद्रकात य. शेटगांवकर |
| अफजुलखान | : | ,, रमेश द. पिंगे |
| पंताजी गोपीनाथ | : | ,, केशव अ. शेटगांवकर |
| कृष्णाजी भास्कर | : | ,, रामचंद्र मोरजकर |
| सय्यद बंडा | : | ,, महादेव द. कोलगावकर |
| मीर गुलाम | : | ,, दैऊ कृ. शेटगावकर |
| येसाजी कंक | : | ,, गणेश व्ही. शेटगावकर |
| तानाजी | : | ,, उल्हास रा. शेटगावकर |
| निरोजी | : | ,, अशोक श्री. शेटगांवकर |
| जाधवराव | : | ,, गोविंद तु. शेटगावकर |
| सर्जेराव | : | ,, अशोक रा. मोरजकर |
| पठाण | : | ,, बाबनी ना. शेटगावकर |
| तारा | : | कु. शुभांगी कुंडईकर |
| कमल | : | कु. शालिनी गडकर |
| सैनिक | : | श्री. सूर्यकांत कृ. शेटगावकर, भरत सा. शेटगावकर राजाराम शि. शेटगावकर, उदय म्हापसेकर. |

दिग्दर्शक : साईदास आपटे – अशोक तिवरेकर.

वेषभूषा व रंगमंच सजावट : महाबळेश्वर मणेरकर

| | | |
|---|---|---|
| संगीत | : | विद्याधर पाळणी |
| तालरक्षक | : | राजाराम मोरजकर |
| फिडल | : | तुकाराम शेटगावकर |
| प्रकाश योजना | : | आर. एल्. रेडकर |
| रंगभूषा | : | नारायण शेटगावकर |
| ध्वनिसंकलन | : | पत्रे साऊंड सर्व्हिस, म्हापसा. |
| निर्माता | : | व्ही. एस्. शेटगावकर |
| व्यवस्थापक | : | श्री कानडी वंस प्रासादिक नाटय मंडळ, |

भाटीवाडा – मोरजी.

# अंक १ ला

## दृश्य १ ले

स्थळ : प्रतापगडावरील शिवाजीचा खलबतखाना. मध्यभागी महाराजांचे आसन असून दोन्ही बाजूना काही आसने मांडलेली आहेत. रंगमंच प्रकाशमान होतो त्यावेळी पडद्यात शिंग फुंकल्याचा आवाज येतो. नंतर महाराचांचा जयजयकार करणारी घोषवाक्ये ऐकू येतात. "शिवाजीमहाराज की जय ... क्षत्रिय कुलावंतस – गो-ब्राह्मण प्रतिपालक शिवाजी महाराज येत आहेत हो ऽऽऽ" घोष वाक्यांचा आवाज विरत जातो आणि शिवाजी – पंताजी गोपीनाथ – येसाजी कंक व तानाजी प्र. क. शिवाजी आसनाकडे जात आहेत.

**शिवाजी :** बसा मंडळी .. आज कोणत्याही परिस्थितीत या गंभीर प्रश्नावर आम्हाला विचार करावाच लागणारेय .. (बसतात तानबा-येसाजीही बसतात. कृष्णाजी भास्कर उभेच आहेत– त्याना उद्देशून ) पंत असा विचार तरी कोणता करताहां आपण ? आपल्यासारख्या बुद्धिवंताला ही गोष्ट एवढी विचार करण्यासारखी वाटावी, याचंच आम्हाला आश्चर्य वाटतंय ! आपण थोर बुद्धिवान– धोरणी– दूरदर्शी आहांत हे आम्ही पुरतं ओळखून आहों; आणि म्हणूनच आम्ही तुमच्यासारख्या मुत्सद्दी पुरुषाची वकीलपदी निवड केलीय.

**पंता. गोपीनाथ :** महाराज, आपल्या पायाचा बंदा सेवक हे कधीही नाकबूल करणार नाही. आमचा दूरदर्शीपणा आपण पूर्ण जाणून आहांत याची आम्हाला चांगली जाणीव आहे. म्हणूनच महाराजांशी बोलायला आम्हाला एवढा अवधी लागला. ज्या गोष्टीची जबाबदारी आपण आमच्यावरती

सोपवली आहांत त्यासाठी आम्हाला जागरूक राहूनच विचार करायला हवा. साऱ्याच गोष्टीचा तडकाफडकी विचार करून चालणार नाही. महाराज, साधक-बाधक गोष्टीचा पूर्णपणे विचार करूनच निर्णय घेणे हिता-वह आहे अशी आमच्या मनातली मनोदेवता सांगतेय. दरबारात जी बातमी येवून थडकली आहे, ती मती कुंठित करणारी आहे, तरीपण त्यातून मार्ग काढण्याची जिम्मेदारी महाराजानी आमच्यावर सोपविली आहे ती आम्ही पार पाडणारच. आई माय भवानीचा मंगल आशीर्वाद तुमच्या-आमच्या मस्तकी सदैव असताना तसा काही वाईट वखत येणार नाही याची महाराजानी मनोमन खात्री बाळगून असावं.

शिवाजी : आमच्या मनाला पूर्ण खात्री आहे पंत ( उठतात ) म्हणूनच आम्ही कसलाही विचार न करता सारा विश्वास आई भवानीच्या चरणी ठेवून निर्धास्त आहो. ... कोणत्याही वख्ती आम्ही पळपुट्यागत समरांगणा-तून माघार मुळीच घेणार नाही. जोपर्यंत देहात जिद्द आहे, महाराष्ट्राचं मंगल व्हावं अशी इच्छा आहे आणि देहात रक्ताचा शेवटला थेंब शाबूत आहे तोपर्यन्त छातीचा कोट करून आमच्यावर चारी दिशानी गिधाडागत हल्ला करणाऱ्या गनिमाशी शर्थीनं मुकाबला करायला आम्ही खंबीर आहो. पंत, अविधाचा समूळ नायनाट करण्यासाठीच आम्ही जिजामातेच्या उदरी जन्म घेण्याचं महत् कार्य केलय. पंत, आपला दूरदर्शीपणा, समर्थांचा पुण्य-मय उपदेश, जिजामातोश्रींची पुण्याई आणि आई तुळजाभवानीचा मंगल आशीर्वाद आमच्या पाठीशी सदैव असताना आम्ही भ्यावं तरी कशासाठी? आमच्या हातूनच अविधाची चामडी निघावी ही तो श्रींची इच्छाच आहे !

पंता. गोपीनाथ : महाराज, आपल्या अंगीचा अतुल पराक्रम आम्हाला पूर्ण ठाऊक आहे – तरी – पण –

शिवाजी : पंत, जे बोलायचं असेल खुल्या दिलानं, मनी कोणताही संदेह न ठेवता बोला. या वख्ती आमच्या जोवाचं काही बरं वाईट होईल असं तर वाटत नाही ना पंताना ?

पंता. गोपीनाथ : तस नाही महाराज, पण दिवसेदिवस जे ऐकायला येतंय ते फारच भयानक – सर्वांगाचा थरकाप करून सोडणारं आहे. विजापुरातून

अफजुलखान आपणाला जिवंत पकडून नेण्याचा विडा उचलून या खोऱ्यात आलाय. त्याचं तेवढं आम्हाला विशेष वाटत नाही पण जावळीकरांच्या पोरीचा उच्छाद मात्र विचार करण्यासारखा वाटतो. एका बाजूनं तो कडवा यवन तर दुसऱ्या बाजूनं ही अवदसा. महाराज, एकाच वेळी दोघा अविंधाना तोंड द्यायचं म्हणजे जरा पंचाईतच आहे. कारण नुकतीच कुठे आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली जातेय पुरेसं सैन्य पदरी जमायला अजून बराच अवधी जाईल.

**शिवाजी :** चुकताहा आपण पंत, आमच्या कार्याची मुहूर्तमेढ जरी नुकतीच रोवली गेली असली तरी बिलकूल पर्वा करणार नाही आम्ही. शूर मावळ मराठ्याच्या पाठिंब्यामुळे आम्ही आमचा पल्लेदार मार्ग आक्रमणार आहोत. गिधाडागत आमच्यावरती शत्रूनं जरी चौफेर हल्ला केला तरी प्रत्येकाला आम्ही आमच्या तळपत्या समशेरीचं पाणी पाजायला समर्थ आहोत. प्रसंगी आमच्या देहाचे लाख तुकडे झाले तरी चालतील, पण आम्ही शत्रूपुढे कदापिही वाकणार नाही. जावळीकरांच्या पोरीनं आपल्या जन्मदात्याच्या खुनाचा सूड आमच्यावर उगवायचा ठरवलाय हे आम्ही पुरतं जाणून आहो, पण ती किती झाली तरी एक सामान्य बाईमाणूस— या घडीला तिचा तर आम्हीं विचारच करीत नाही.

**येसाजी :** महाराज, असं म्हणून कसं चालेल ? ती सामान्य बाईमाणूस असली तरी तिच्या हालचालीवर सूक्ष्म नजर ठेवायला हवी. कानाडोळा करून मुळीच चालणार नाही. ती फार धूर्त कावेबाज बाई आहे. आपल्या बापाच्या खुन्याचा बदला घ्यायचाय तिला. ती चवताळलेली जहरी नागीण कधीही स्वस्थ बसणार नाही. महाराजाना ती जरी सामान्य वाटत असली तरी तिच्या हालचालीवर डोळ्यात तेल घालून करडी नजर ठेवायला हवी वाटल्यास महाराजानी या कामी एखाद्या गुप्त हेराची नेमणूक करावी जेणे करून तिची कारस्थाने महाराजांच्या कानी येतील.

**शिवाजी :** जावळीकरांच्या पोरीवर आमची करडी नजर नाही असं का वाटतं आपणाला येसाजी ? आमचं लक्ष प्रत्येकाच्या हालचालीवर अगदी खिळून आहे. कोण कुठून आणि कसले डाव रचतो, घाताचे मनोरे बांध-

तोय हे आम्ही जाणत का नाही ? तरी पण तिच्या बाबतीत आम्ही निर्धास्त आहो. ज्यावेळी तिच्याकडे मोर्चा वळवायचा त्यावेळी तिच्याकडेही वळवू आणि समजा विजापुरातून आलेला तो क्रूर हैवान नि जावळीकरांचो पोरगी एकाच वेळी आमच्यावर चाल करून आली तरीही काही हरकत नाही. तुमच्यासारखे खंदे शूर वीर पाठीशी असताना आम्हाला भय म्हणून तरी का वाटावं ?

**येसाजी :** आमच्या परीने आम्ही प्रयत्नांची शिकस्त करू महाराज, पण-

**शिवाजी :** पण काय ? बोला येसाजी .....

**येसाजी :** शत्रू फार प्रबळ आहे असं एकतोहो आम्ही...

**शिवाजी :** प्रबळ शत्रूचं भय आम्हाला कधीही वाटत नाही, येसाजी आम्ही प्रबळ शक्तिवान जाणतो ती आमची कुलदेवता, आई तुळजा भवानी. तिच्या प्राबल्यापेक्षा जगात कोणाचंही प्राबल्य आम्ही मानायला तयार नाही. शत्रू कितीही शक्तिवान असला तरी आम्हाला त्याचं मुळीच भय वाटत नाही.

**पंता. गोपीनाथ :** येसाजी, महाराजांची आजवरची कामगिरी तुम्हा-आम्हाला चांगली माहित असताना, त्यांच्याशी या घडीला जास्त बोलणं बरं नव्हे. महाराजांच्या अंगी अरीला लोळविण्याचं सामर्थ्य आहे. याची कल्पना अलम मराठी रयतेला आहे. त्यांचा विश्वास जिद्द फार दांडगी आहे येसाजी. आणि त्यात तुमच्या सारख्या शूर वीरांची साथ महाराजाना लाभलेली असताना प्रबळ शत्रूचं भय ते मुळीच बाळगणार नाहीत

**शिवाजी :** पंत, आई तुळजाभवानीच्या प्रबल शक्ति सामर्थ्याची मिरास आमच्या वाट्याला आली असता आमच्या मनी मुळीच भय-भीतीची भ्रांत देखील नाही. आणि त्यातून आमच्या साथीला तानबा-येसाजीसारखे मातब्बर लढवैय्ये प्रसंगी तळहातावर स्वतःचं शीर घेऊन समरांगणात आमच्यापुढे उभे असतात आमच भाग्य थोर म्हणा किंवा ज्या राष्ट्रासाठी आम्ही आमच्या देहाची आहुती द्यायला तयार झालो त्या पुण्यप्रद महाराष्ट्राची पुण्याई म्हणा म्हणूनच आम्ही प्रबल शत्रूच्या छाताडावर मनसोक्तपणे आमच्या समशेरीचे वार करू शकतो. बरं पंत, बोलता-बोलता

आम्ही खूपच बोलत चाललो. आता असं बोलण्यात स्वतःला गुंतवून घेणं बरं नव्हं. ज्यानं आमच्या नाशासाठी विजापूरच्या पातशहातीपुढे पैजेचा विडा उचललाय त्या अफजुलखानाच्या अंतरगातलं वादळ किती प्रलयंकारी आहे याची आम्हाला जरूर दखल घेतली पाहिजे.

पंता. गोपीनाथ : मीही आपणास त्याच गोष्टीची आठवण करून देणार होतो, पण आपणच नेमकं आमच्या मनातलं बोललात.

शिवाजी : होय पंत, आमच्या मनात ही गोष्ट कालपासूनच ठाण मांडून बसलीय. पंत, आपण जातीनं या वरती खानाच्या डेऱ्यात जावून येणं भाग आहे.

पंता. गोपीनाथ : महाराज, पंताजी गोपीनाथ आपल्या चाकरीत आहे तेव्हा आपण जी कामगिरी आमच्यावरती सोपवाल ती आम्ही राजीखुषीने मान्य करून आपल्या चरणांची सेवा करू. बोला महाराज, या वरती खानाच्या डेऱ्यांत जावून कोणती गोष्ट करावी अशी इच्छा आहे महाराजांची ?

शिवाजी : आपण खानाच्या छावणीत जावून तेथील हालचालींचं आणि त्याच्या अंतरंगातील वादळाचं सूक्ष्म निरीक्षण करा. त्या कडव्या हैवानाचे बोल काय आहेत, त्याची महत्वाकांक्षा तरी कोणती आहे ते सारं ऐकायचंय आम्हाला, पण तो जरी काहीही बरळला तरी त्याच्या कानी आमचा वज्रनिर्धार घाला. विजापूरच्या हजरतीपुढे आम्ही कधीही नतमस्तक होणार नाही. प्रसंगी तळहाती शीर घेऊन शत्रूशी सातत्यानं मुकाबला करू, पण त्या मग्रूराच्या हातचं बाहुलं होणार नाही. त्याना आमच्या शौर्याची जाणीव आहे, पण ते आमची नाहक थट्टा करू पाहाताहेत काही हरकत नाही, आम्हीही काही कमकुवत नाही आहोत. ते आम्हाला डोंगर कपारीतला उंदीर समजताहेत, पण आम्ही अवघड गुहेतल्या सिंहाचे क्रूर छावे आहोत हे कृतीनं दाखवायचंय त्याना. चला पंत, तातडीने डेऱ्यात जावून त्याच्या हाती आमचा हा खलिता सुपूर्द करा.
( खलिता देतात )

पंता. गोपीनाथ : (स्वीकारीत) जशी महाराजांची आज्ञा ( मुजरा करून जातात )

**शिवाजी :** तानबा- येसाजी- आमचा खलिता घेऊन पंत खानाच्या डेऱ्याकडे जायला तर रवाना झालेच. आता तुम्ही दोघानी प्रतापगडाच्या पायथ्यापर्यंत एक फेर फटका मारून यावं असं आम्हाला वाटतंय. गडाच्या रक्षणासाठी ठेवण्यात आलेले आमचे खास मर्जीतले माणूस कदाचित शत्रूपक्षातल्या माणसांशी फंद-फितूरीन वागून आमच्याशी दगलबाजी करतील. थोडासा जरी फितुरीचा संशय तुमच्या दृष्टोपत्तीस आला तरी लागलीच येवून बातमी आमच्या कानी घाला. न जाणो आमचंच खावून आमच्याशी निमकहरामी करतील.

**तानाजी :** महाराज, त्या विषयी आपण निर्धास्त असावे. हरएक सैनिकावर आमची करडी नजर अहोरात्र फिरत असते. आई भवानीनं अजूनपर्यंन्त तरी तशी दुर्बुद्धी कुणाला दिली नाही. सारे डोळ्यात तेल घालून प्रतापगडाचं रक्षण करताहेत.

**शिवाजी :** तरी पण आम्हाला सावध राहिलं पाहिजे. व्यक्ति तितक्या प्रकृता असतात तानबा. कोण कधी कसा बदलेल त्याचा भरोंसा नाही. न पेक्षा इकडे आम्ही आमच्या परीनं महाराष्ट्राचं भलं होण्यासाठी अहोरात्र तळमळत राहावं आणि तिकडे आमच्याच माणसानी आमचा केसानं गळा कापावा.

**तानाजी :** तसा वखत आम्ही येवू देणार नाही. अन् समजा तसा काही प्रकार आम्हाल दिसलाच तर आम्ही आपणाला कळवायच्या आत त्यांचा पुरा समाचार घेऊ. आम्ही आपली चाकरी पत्करून आहो ते कशासाठी ? महाराज, आपण निर्धास्त असावे.

**शिवाजी :** शाब्बास माझ्या शूर वीरानो ! आपल्या सारख्या शूरांचीच गरज आज या राष्ट्राला आहे. आमच्या यशाचा आम्हाला जो एवढा अभिमान वाटतो त्याचं कारण आपल्यासारखे वीर आमच्या पाठीशी सदैव खडे आहेत म्हणूनच चला, आपण सर्वच प्रतापगडच्या पायथ्याशी एक फेरफटका मारून येऊ आणि अंबाभवानीच्या दर्शनाला जावू. आज तिच्याकडे आम्ही तिचा आशीर्वाद मागणार आहोत आणि आम्हाला खात्री आहे की आई भवानी आम्हाला आपला आशीर्वाद नक्की देणार. कोणत्याही परि-

स्थितीत महाराष्ट्राचं सदैव कल्याण व्हावं ही एक उदात्त इच्छा आमच्या हृदयात अहोरात्र पिंगा घालतेय. त्यासाठी येणाऱ्या प्रत्येक संकटाला हर-घडी धैर्यानं सामोरं जाऊन विजयाचं पारडं आमच्या बाजूनं झुकवलं पाहिजे. चला लवकर — अजून आम्हाला पुष्कळ गोष्टीचा विचार करा-यचा आहे.

तानाजी :
येसाजी : } चला महाराज ...... ( सर्व जातात. )

## दृश्य २ रे

स्थळ : रस्ता. पठाण आणि मीर गुलाम प्रवेश करतात.

मीर गुलाम : या अल्ला! या परवर दिगार! अरे यार, विजापूर सोडल्या-पासून अभीतक आमच्या साऱ्या इच्छा मनातल्या मनातच विरून गेल्या. हाय मेरे कंवख्त ! निदान या मुलखात तरी आमचं तकदीर उदयाला येईल अशी आम्हाला बहोत खात्री होती, लेकिन हाय ! अभीतक कशातच काय नाय. ही खानाची नौकरी म्हणजे साली जिंदा मौत ! सबेरेसे शामतक और शामसे सबेरेतक सारख्या आपल्या येरझारा. कधी दमून बसायची सोय नाही की डोळ्याला डोळा लावायची बात नाही. आणि कदाचित डोळा लागलाच तर पाठीवर लाथ ही ठरलेलीच ! अरे यार, तुझ्या पाहणीत एखादी चटक चांदणी—अस्मान की परी याने खुबसुरत बिजली आली नाही?

पठाण : अरे बिजलीको मारो गोली यार ! मी नुसता रस्त्यावरून चाला-यला लागलो ना की मेरे सामने लाखो बिजल्या चमकायला लागतात.

मीर गुलाम : झूट-सब झूट है तुम्हारी बात. अरे यार, रस्त्यावरून चाल-ताना जर लाखो बिजल्या तुझ्या समोर चमकतात तर मला का सांगितलं नाहीस एवढे दिवस ? एखादी मी नाही का पटकावली असती ? तू अगदीच बुद्दू आहेस. अरे अल्लानं तुझ्या तक्‌दिरात एवढ्या बिजल्या दिल्याहेत, लेकिन तू तो पूरा अडानी. यापुढ असं करूं नकोस, तुला दिसतील तेव्हा मला पैगाम भेजो— समझे ?

पठाण : लेकिन यार, तुझी औरत विजापुरात जिवंत असताना तुला रे रस्त्यावरच्या बिजल्यांची गरज काय ?

मीर गुलाम : अरे बूढ्के बच्चे, विजापुरातलं विजापुरात. तबतक हमारा क्या ? आम्ही काय करायचं ?

पठाण : तुम्हारा क्या म्हणजे ? अरे तबतक खानाची नोकरी.

मीर गुलाम : तू थट्टा करतोहेस माझी. अरे विजापूर सोडून किती तरी दिवस झाले आम्हाला. रात्रीची चाकरी करताना डोळे अगदी पेंगाळून येतात. तेव्हा वाटतं ...

पठाण : का वाटतं ?

मीर गुलाम : वाटतं–सरळ धावत जाव आणि गाढ झोपी जावं औरतीच्या मिठीत लेकिन हाय ! कसलं काय नि कसलं काय ! आम्ही मात्र जांभया देत (जांभई देतो) अख्खी रात गुजारावी. अरे यार, जवान गडी असला म्हणजे त्याला औरतीची याद येणारच ए, थोडसं मनावर घेशील का माझं ? निदान एखादी तरी बिजली पैदा करून दे मला.

पठाण : तुम मत डरो मेरे दोस्त, झाल्यास आजच पाहिन मी एखादी बिजली, लेकिन बिजलीच्या नावाने असा झुरणीला लागू नकोस.

मीर गुलाम : या अल्ला ! या परवर दिगा ! मेरे यार, अल्ला तुझं बहोत भल करो. तुला माझं अर्धं आयुष्य देईल. जिंदा रहो दोस्त–जिंदा रहो.

पठाण : आता थोडावेळ गप्प रहा बघू ( दूर पाहात ) घोड्याच्या टापाचा आवाज ऐकायला येतोय का तुला ?

मीर गुलाम : ( कानोसा घेत ) हो सच है . सच है... नक्कीच इकडं येतय कुणातरी.

पठाण : तुम यहाँ खडे रहो मैं देखता हूं उधर ( पुढे जातो )

मीर गुलाम : या अल्ला, खान इथून त्या शिवाजीचं बरं वाईट करून जाई पर्यंत तरी एखादं खुबसुरत औरत मला मिळू दे. विजापुरात आलो की तुला कोंबड-बकरं देतो. सालं छोकरी ! शिवाय बिलकुल करमत नाही हल्ल. शिवाजीच्या या मुलुखात हरएक कदमाला किती तरी छैल छबेल्या असतील; लेकिन आमचं तकदिर फुटलंय त्याला बिचारा अल्ला तरी

काय करणार ? निदान या पठाणानं तरी माझ्यावर दया केल्यावर पुरे-मला खात्री आहे की हा लुटारू पठाण माझ्यासाठी नक्कीच काहीतरी करणार. तो मला बिलकुल दगा देणार नाही.

**पठाण :** ( प्र. क. )गुलाम-अरे यार तुम्हारा काम फत्तेह हो गया. घोड्या वरून दोन पुरुष आणि दोन सुंदर छोकऱ्या त्या समोरच्या वाड्याजवळ उतरल्याहेत. पाहुया तेरे तक्दिर का सितारा ! चमकता है– या नही ?

**मीर गुलाम :** मेरे यार–तुम्हारे एहसान हम जिंदगीभर नही भुलूंगा

**पठाण :** लेकिन त्यातली एखादी तरी छोकरी इकडे यायला हवी ना ! (दूर पाहात) गुलाम–अरे–गुलामा–साल्या अल्ला पोंचला तुला. छोकरी येतेय, लेकिन–सुनो यार, तुम कुछ बातचित मत करो, हम सब देखता हूं. तबतक तू तिकडच्या बाजूला हो. मी पाहतो प्रयत्न करून ( मीर गुलाम कडेला सरकतो )

**मीर गुलाम :** अरे वाटल्यास मी इथून थोडा वेळ दूर जातो. लेकिन ...

**पठाण :** ठेहेरो–चिल्लावो मत. बिजलो अभी नजदिक आयी है थोडे देरतक चुपचाप वहाँ खडे रहो.

**कमल :** ( प्र. क ) अगबाई ! हे कोण आडदांड ? लुच्चे लफंगे तर नाहीत ना ?

**पठाण :** आप किसीके तलाशमे है क्या बिबीजान ? हम तो सामने खडे है.

**कमल :** मेल्या जिभेला काही हाड आहे की नाही तुझ्या ?

**पठाण :** जिभेला हाड नसतं बिबीजान.

**कमल :** पुन्हाही बिबीजान म्हणालास ?

**पठाण :** अग अशी रागावतेस का बिजली ? आयीये- आयीये अशा जा या बाजूनं. हम लोग तो तुम्हारे रास्तेमे कोई रुकावट पैदा नही करेंगे. अल्ला तेरा भला करेंगे और साथ-साथ हमाराभी.

**कमल :** कोण आहेस रे तू लफंग्या ?

**पठाण :** मैं लफंगा नही. पठाण हूं.

**कमल :** (दचकून) कोण ? प– पठाण ?

**पठाण :** मत डरो रानी.

**कमल :** (रागाने) हा खबरदार उल्लू के पठ्ठे, पुन्हा राणी म्हणालास तर राणी कुणाला म्हणतात तेही माहीत नाही वाटतं ?

**पठाण :** मै सब कुछ जानता हूं.

**कमल :** काय जाणतोस ? दुसऱ्यांच्या बायकाना राणी म्हणणं ? पुन्हा असं म्हणालास तर मुळीच गय करणार नाही तुझी.

**पठाण :** क्या करेंगी तुम ?

**कमल :** काय करीन ? शिवाजीला सांगून मुसक्या बांधीन तुझ्या.

**पठाण :** (हंसून) सिवाजी ? कौन है वो सिवाजी ? असको हम नही पेहेचानते.

**कमल :** तुझ्या सारख्या शंढाला कुठली असणार शिवाजी महाराजांची ओळख ? तो या महाराष्ट्राचा भावी राजा आहे. गोब्राम्हण प्रतिपालनाचं कंकण हाती बांधलय त्याने. आमच्या सारख्या मराठमोळ्या स्त्रीयांचा तर तो पाठीराखाच म्हणावा लागेल.

**पठाण :** ऐसा मत बोल छेल छबेली. पुन्हा सिवाजीचं नाव काढलंस तर गर्दन छाटून टाकीन धडावरची. और तुम्हारे बदनके उपर जो गेहेने है वो भी उतार कर ले जाऊंगा. जल्दी करो नही तो तेरी खैर नही.

**कमल :** हरामखोरा, माझ्या बरोबर आलेले माझे यजमान यावेळी जरी माझ्या सोबत नसले तरी मी मुळीच डगमगणार नाही. शिवाजीच्या राज्यात प्रत्येक मराठा-गडी माझ्या सारखीचा कैवारी आहे. कोण कोठून नि कसा येऊन तुझा घात करील याचा पत्ता देखील लागायचा नाही.

**पठाण :** अग कशाला बढाया मारताहेस त्या निमक हराम शिवाजीच्या आणि त्याच्या शूर गड्यांच्या ? माझ्यापुढे काय करतील ते हरामखोर ? मुकाटयाने माझ्या हो ला हो देवून तेरी जान बचाव. नही तो पिछे जो घना जंगल है ना, उधर लेकर हमारी ख्वाईष पुरी करूंगा-और तुम्हारा खात्मा करूंगा.

**कमल :** बोलणं फार सोपं असतं समजलास ? तुझ्या एकंदर वागण्यावरून तू नक्कीच त्या काफर अफझुलखानाचा नोकर असला पाहिजेस

**पठाण :** मै किसीकाभी नोकर नही हूं. मै आझाद हुं विजापूर सोडल्यापासून

फक्त वाटमारीचा धंदा पत्करलाय मी. हा रस्ता म्हणजे आम्हां लोकांचा अड्डाच. बोलो, हमारी ख्वाईष पुरी करती है या नही?

कमल : नाही-नाही कदापिही नाही. तुझ्या धमकीला तशी सहजा-सहजी बळी पडणारी नामर्द बाई नाही मी. जरी यावेळी मी एकटी असले तरी शूराची पत्नी आहे. प्रसंगी तुझ्यासारख्या पागल माणसाला यमसदनास पाठविल्यावांचून राहाणार नाही

पठाण : अैसी बात है क्या बिबीजान ? तो हम भी कुछ कम नही मेरी ख्वाईष मैं इसी तरह पुरा करता हूं ( हात पकडतो ) मैं अभी देखता हूं कौन बचानेवाला है तेरी जान.

कमल : राक्षसा– सोड– सोड– माझा हात

पठाण : वो कभी नही छुटेगा. मुकाट्यानं दागिने काढ आणि माझ्या हातावर ठेव. गुलाम ए.. साल्या गुल्या संमधा उभाच काय राहिलाहेस ? प्रसंग कोणता आहे याची अक्कल आहे की नाही ? अरे दोस्ता, असली खुबसुरत औरत दुनियेत कुठेही मिळणार नाही. बिजली हवीय ना तुला ?

मीर गुलाम : साल्या हवी म्हणून काय विचारतोहेस ? हे सगळं आमच्याच साठी चाललय.

पठाण : बादमे इधर आकर यह छबेली को अच्छी तरहसे पकडो. तोपर्यंत मी दागिने काढतो.

मीर गुलाम : अरे दागिने कशाला काढतोहेस. तिच्या अंगावरचे ! राहू देत ते ... मला तरी कुठं आहे शक्ति ... नवीन दागिने घडवायला ? तेव्हा सालंकृत बिजलीच पदारात घेतलेली बरी.

कमल : मेल्यानो – असा डाव आहे का तुमचा ? आई तुळजा भवानी तू तरी धावून ये ग माझ्या रक्षणाला

पठाण : गुलामा, अरे साल्या तुला दागिन्यासह बिजली हवी म्हणतोहेस ना ...? मग ने तर हिला पळवून. थोडासा उशीर लावलास तर ही बया हातची पळायची आमच्या. हिचे रिस्तेदार येण्याच्या आंत बुरखा घालून तोंड बांधून घेऊन जा.

कमल : चांडाळा-काय बरळतोहेस तू ? लाज लज्जा कशी नाही तुला ? तुला कुणी आया बहिणी आहेत की नाही ? नादान बेशरम

पठाण : तू काहिही म्हणालीस तरी मला बिल्कुल राग येणार नाही. लुटारू माणसाना लाज लज्जा सोडावी लागते, समजलीस ? (गुलामाला) ए–बुढ्ढके बच्चे -साल्या पाहातोहेस काय–सोड कमरेचा शेला आणि झांक या बिजलीचा मुखवटा-आयिये-नजदिक आयिये-बिजली तो तुम हांसिल करेंगे और हम तकलिफ उठायेंगे ? यह कौनसा दस्तूर है ?

मीर गुलाम : मैं बहोत आभारी हूं दोस्त.. आता हिला अशी पळवतो... की बस्स! (हात पकडतो)

कमल : (हिसडा देवून हात सोडवून घेते व खंजीर काढते) नीचानो, खबरदार मला पळविण्याचा प्रयत्न कराल तर. मी म्हणजे शेळपट जनावर वाटले की काय तुम्हाला ? हिम्मत असेल तर आता पुढे येवून बघा. हा तळपता खंजीर एककाच्या पोटांत खुपसून प्राण घेईन.

पठाण : अरे यार, देखते क्या हो ? बिजली तो चमक उठी है. उसके साथ मुकाबला करके उसको हंसील करके लेना पडेगा.

मीर गुलाम : (पवित्रा घेत) जी हां–तो और कुछ सोचनेकी बात नही. चलावो तुम्हारी समशेर-मैं तेरे पिछे हू...

पठाण : अरे बिजली तो आपको चाहिए ना ? मग तूच कर तिच्याशी दोन हात.

मीर गुलाम : प्रथम तू कर... नंतर मी करतो तिच्याशी दोन हात. मी आहेच इथे. एवढी होशियारी दाखवतेय ना ती .. मग प्रथम तूच कर. सटवी तुला उलट उत्तर देते काय ? तुला चांडाळा म्हणून तुझी निर्भत्सना करते... तिला ठाऊक नाही अजून तुझ्या अंगातली ताकद .. ए .. अस्मानके बिजली चलावो तुम्हारा खंजीर .. मेरे दोस्तके हातकी करामत देखनेकी है ना ? तो अभी देखो यार, देखता क्या है ? होऊ दे मुकाबला.

पठाण : तू तर पुरी कमालच केलीस, अरे किती झालास तरी साधा शिपाई गडी तू. मर्दांची ताकद कुठ आहे तुझ्यात. या ठिकाणी माझ्यासारखाच

जवान गडी पाहिजे... होशिऽऽर छेल छबेली, चलावो तेरा खंजीर देखता हु तेरी ताकद

**कमल :** अस्स काय ? ठीक आहे मलाही पाहायचीय तुझी ताकद (खंजीर खोचून–शेल्याआड लपविलेली समशेर उपसते ) जय भवानी ( ती त्याच्याशी निकरानं लढते )

**पठाण :** ( लढता लढता ) ए बुद्दू ... साल्या तुम भी शुरू करो.

**मीर गुलाम :** ऐसी बात है क्या ? तो मैं भी करता हू ... (तोही लढाईत सहभागी होतो. लढाईला जोर चढत जातो आणि अचानक कमळच्या हातातून समशेर गळून पडते. ती खंजीर काढणार एवढ्यात दोघेही तिला पकडतात )

**कमल :** धावा – धावा – हो कुणीतरी आणि सैतानांच्या हातून माझी मुक्तता करा.

**पठाण :** अस्मानकी परी, यहाँ कौन भी नही आ सकेगा. नाहक ओरडू नकोस, पाहिलीस ना आमची ताकद ? गुलामा, पाहातोहेस काय. घाल बुरखा बिजलीच्या तोंडावर.

**मीर गुलाम :** यार–तुम अभी मत डरो–मैं घालता हूं अभी (बुरखा घालणार एवढ्यात आवेषाने सर्जेराव प्र. क.)

**सर्जेराव :** हां– खबरदार लुटारू गुंडानो. विजापूरच्या हजरतींच साम्राज्य वाटलं की काय तुम्हाला ? हराम खोरानो, हा मराठ्याचा मुलुख आहे. मुकाट्यानं तिला सोडून बाजूला व्हा अगोदर.

**पठाण :** अरे जारे मरगठ्या ! कोण भीक घालतोय तुझ्या धमकावणीला ? एवढा वेळ लढून शिकार केलीय ती हातची सोडून पळायला ? आम्ही होणार नाही बाजूला. क्या कर सकते हो तुम ?

**सर्जेराव :** ठीक आहे ! तुम्ही या बाईला खुशाल नेवू शकता.

**कमल :** नका– नका हो मला या मांगाच्या हातात देवू– दया करा...

**पठाण :** ए चूप बैस... हुं आता कसं बोललास ? चलरे गुलामा जावूया आपण हिला घेऊन...

**सर्जेराव :** पण एक अट आहे.

पणाण : कौनसी शर्त ?

सर्जेराव : मला तुमच्यातलं शौर्य बघायचंय.

पठाण : हमारा शौर्य ? और तुम देखना चाहते हो ? देखो जरूर देखो- हम अभी दिखाता हूं ( समशेर उपसतो )

सर्जेराव : चल तर, प्रथम तुझी ताकद पाहतो मी ( दोघे लढतात-लढता-लढता पठाण 'या अल्ला दगा-दगा' असं ओरडत पळतो ) वारे तुझी ताकद ! शेवटी पळालास नामर्द भेकडासारखा. अरे टिकशील तरी कसा या शूर सर्जेरावापुढे ? ए-पळपुटयाच्या दोस्ता, तुला इच्छा आहे का लढायची ?

मीर गूलाम : तो तुम्हारे दिलमे अैसा आया की हम भी भाग जायेंगे ? नही ऐसा कभी नही होगा. मैं तो मेरे रानीकेलिये अपनी जान भी कुर्बान कर सकता हूं लेकिन यहांसे कभी नही भाग जाऊंगा. मैं तय्यार हूं अभी चलाओ तुम्हारी समशेर (दोघे लढतात. शेवटी तोही "या अल्ला-दगा-दगा असं ओरडत पळतो) हं-पहा-पहा कसा पळतोय जीव जाईपर्यंत. (कमलकडे वळून) बाई, कोण आपण ? आणि जाताहा तरी कुठे ?

कमल : काय सांगू तुम्हाला सर्जेराव ? आम्ही विजापूरातून आलो आहोत आमची मंडळी त्या पलीकडच्या वाडयांत उतरली आहे. मी सहज इकडचा भाग बघायला म्हणून आले तर इथं हा अनर्थ ओढवला. तरी बरं, देवानं तुम्हाला पाठविलं ! नपेक्षा ते सैतान माझी अब्रू लुटायला मागे सरणार नव्हते.

सर्जेराव : कुठ जायचं आहे आपणाला ?

कमल : शिवाजी महाराजाकडे. त्यांच्याच आश्रयाला आलो आहोत आम्ही.

सर्जेराव : आपण विजापूराहून महाराजांच्या आश्रयाला आलाहांत ?

कमल : होय सर्जेराव, तिकडे आम्हां हिंदूचा अपरिमित छळ चालला आहे. दिवसा ढवळ्या दरवडे पडताहेत बायकांच्या शीलावर. लुटली जाताहेत सगळी घरंदारं. जीवन जगवणे फार कठीण होऊन बसलंय आम्हां हिंदूना. आम्ही अब्रूदार माणसं. आम्हाला आमची अब्रू जोपासायची आहे. शिवाजी

महाराज हिंदूचे कैवारी आहेत असं ऐकलंय आम्ही. आणि म्हणूनच त्यांच्या आश्रयाला आलो आहोत. त्यांचीच सेवा करून राहायचंय आम्हाला

सर्जेराव : व्वा ! व्वा ! आपलं ध्येय फार उदात्त आहे बाई. आपली इच्छा सफल व्हायला मुळीच अवधी लागणार नाही. आता तुमच्या मागचं सारं दु:ख संपलं असं समजा. आपलं नाव काय ?

कमल : कमल .. जाधवरावांची धर्मपत्नी आहे मी.

सर्जेराव : अस्स का ? वा ! वा ! मग चला तर तुम्हाला महाराजांच्या चरणांची भेट घडवितो. त्यांचेच सेवक आहोत आम्ही.

कमल : आम्ही सारी माणसंच महाराजाकडे येणार आहोत. आज किंवा उद्या महाराजांच्या आश्रयाला आम्ही अवश्य येवू. त्यांच्या राज्यात स्त्रियांच शील मौलिक मायेनं रक्षिलं जातं याचा मला आज खरा अनुभव आला. आपल्या सारखे खदे वीर महाराजांच्या चरण सेवेत आहेत हे पाहून जीवाला फार समाधान वाटलं. हृदय अभिमानानं भरून आल माझ. आपल्या शौर्याचं कौतुक करावं तेवढं थोडच आहे. सर्जेराव, केवढी लाख मोलाची कामगिरी केलीत आपण ? अहाहा ! मर्द असावेत तर आपल्यासारखे,

पद:–

शूर वीर गडी शिवरायाचे
भाग्य उजळले महाराष्ट्राचे ॥ धृ ॥
कोट करूनी तव छातीचा
वार झेलती महा रिपूचा
धन्य तुमच्या हो शौर्याचे ॥ १ ॥

चला– सर्जेराव, तुम्हाला आमच्या मंडळीची ओळख करून देते...

सर्जेराव : चला– चला– कमलाबाई – ( दोघं जातात )

## दृष्य ३ रे

स्थळ : अफजुलखानाचा शामियाना. पात्रे – अफजुलखान, सय्यद बंडा कृष्णाजी भास्कर. खान हुक्का पीत बसला असून, एक मुसलमान सेवक चिलमीतले निखारे, फुलवीत आहे, काही मुसलमान सैनिक पहाऱ्यावर आहेत.

अफजुल : (आवेशाने) सेवाजी– सेवाजी– .. त्या बंडखोर सेवाजीचं नुसतं नांव घेतलं तरी अंगाची कशी लाही लाही होते. तळपायांची आग मस्तकाला जाते आमच्या. हजरती समोर आम्ही कसम खाल्ली आणि त्या हरामखोराला पकडायला जावली मुलूखांत आलो. लेकिन इथं आल्यावर त्या हैवानाला पकडणं तेवढं मामुली काम नाही याची आम्हाला चांगलीच कल्पना आली. लेकिन वह काफर सेवाजीको गिरफदार करना हमारा फर्ज है. वो डोंगरका चुहा कहाँ भाग जायेगा ? प्रयत्नांची शिकस्त करून हुजरतीपुढे या निमकहरामला जिंदा पकडून उभा केलाच पाहिजे. वकीलजी, उसके बारेमे आपका क्या खयाल है ?

कृ. भास्कर : खाविंद, लहान तोंडी मोठा घांस घेतोय याबद्दल प्रथम आपण मला क्षमा करावी. मला तर असं वाटतंय की आपण समजतां तेवढी ही गोष्ट सोपी नाही. या वाई-जावळ खोऱ्यात आपण कांही पहिल्यांदाच येत नाही आहांत. मागे काही दिवस आपण या प्रांताची सुभेदारी केलेली आहे, तेव्हां इथल्या किल्यांची-प्रदेशाची खाविंदास थोडी-थोडकी कल्पना आहेच.

अफजुल : हां ! क्यो नही ? या प्रदेशाची खडान्खडा मालुगत है हमे.

कृ. भास्कर : खाविंदास मला एवढेच सुचवावयचं आहे की शिवाजी फार कावेबाज माणूस आहे. तो अमुक एका किल्यांत आहे- असं समजून आपण किल्ल्याला वेढा घाल, अन् भुयारी मार्गातून तो एखाद्या दुसऱ्याच अज्ञात स्थळी प्रयाण करील. आपले श्रम वाया जाऊं नयेत हीच इच्छा. तेव्हा तो अगोदर नेमका कुठल्या किल्यात आहे याची खबर काढून नंतरच खाविंदानी वेढा देण्याची तयारी करावी. या उपर खाविंद आपल्या मर्जी-प्रमाणे करायला समर्थ आहेत.

अफजुल : वकीलजी, तुमची शंका बरोबर आहे. लेकिन हम कुछ कम नही. आम्ही काही मेल्या आईचं दूध प्यालेलो नाही. हजरतीपुढे आम्ही कसम खाल्ली आहे त्याप्रमाणे आम्ही आमचं काम फत्तेह करणारच. त्या बंडखोर सेवाजीचं मुंडकं छाटून तरी हजरतीपुढे टाकू- किंवा जिवंत गिरफदार तरी करूं-लेकीन-हात हलवीत पराजय माथी घेऊन मात्र बादशहापुढे जाणार नाही. वकीलजी, वह काफरकी अवलाद तो पागल सैतान- नेमका कुठल्या किल्ल्यात ठाण मांडून बसलाय याची खबर काढा-

कृ. भास्कर : त्याबद्दल खाविंदानी बिलकुल काळजी करू नये. आजच हेर-पाठवून बातमी काढून ठेवतो (बाहेरून मीर गुलाम येवून कुर्निसात करतो)

मीर गुलाम : खाविंद, आपको मिलनेकेलिये प्रतापगडसे कोई बम्मन आया है- और वो आपकी मुलाखत चाहता है.

अफजुल : प्रतापगडसे ? और हमारे मुलाखातके लिये ? भेज दो उसे तुरंत. (मीर गुलाम जातो) वकीलजी, कौन है वो प्रतापगडका बम्मन ?

कृ. भास्कर : खाविंद, मला कसं कळणार ? ( बाहेरून पंत गोपीनाथ खलिता घेऊन येतो)

पंत गोपीनाथ : (मुजरा करुन) खाविंदाना प्रणाम असो.

अफजुलखान : कौन है तुम ?

पंत गोपीनाथ : मी शिवाजी महाराजांचा वकील आहे.

अफजुलखान : वो काफर सिवाजीको मुझे सामने महाराज मत कहो.

पंत गोपीनाथ : माफी असावी खाविंद; पण महाराजानीच...

अफझुल खान : फिर भी महाराज ?

पंत गोपीनाथ : त्यानी खलिता देवून मला आपल्याकडे पाठवलंय.

अफझुल खान : बंडा...

सय्यद बंडा : जी हुजूर ..

अफझुल खान : त्या खलित्यांत काय लिहून पाठवलंय ते वाच बघू.

सय्यद : ( खलिता घेऊन वाचतो ) हजरतीनं माझ्यासारख्या गरिबाला पकडून नेण्यासाठी खाविंदास जावळ प्रांती पाठविले आहे असे ऐकतो. आणखी तशी प्रतिज्ञा भोगून खाविंद आले आहेत असेही समजले. बंदा

तर हजरतीच्या मुलखाची व्यवस्था नीट राहावी एवढ्याचसाठी केवळ खटपट करतो आहे. पाळेगारी, पुंडावे, मोडून मुलूख बेदिक्कत केला तो स्वत:साठी नव्हे, हजरतीसाठीच. असे असून हजरतीच्या मनांत दुष्मानी उत्पन्न व्हावी हे मोठे दिलगिरीचे काम झाले. परंतु दुसरा कोणी न येता खाविंद स्वत: इकडे आले यामुळे थोडी आशा उत्पन्न झाली की खरा प्रकार समजला असता कांही दगा होणार नाही. उलट खाविंद हजरतीपुढे शिफारस करून संशय दूर करतील जाणोन पत्र लिहिले आहे. तरी जो काय खरा मजकूर आहे हा समजण्याकरिता पंताजी गोपीनाथ इकडले आमचे जाणते चिटणीस पाठविले आहेत. त्यांजपासून सर्व मजकूर विदित करून घेऊन, पुढे जसा विचार होईल तसा हुकूम होणे मुलूख सोडून जाणे म्हणून हुकूम झाला तरी मानणे जरूर परंतु पुंडावे मोडून हजरतीची कामगिरी केली ती ध्यानी आणावी एवढाच मोका आहे. आपला शिवाजी भासले.

**अफझल खान :** ( मोठ्या हंसतो ) आता हजरतीचा बदा गुलाम वगैरे गोष्टी सांगण्यास वकील पाठवून देतो. लेकिन विजापूराहून हजार निरोप आणि हजार हुकूम पाठविले. नाना प्रकारचे धाक घातले. दिल्लीहुन औरंगजेबाने शाहिस्तेखानासारख्या मातब्बर सरदारास पाठविले तरी या हरामखोराने त्यांना व आम्हास बिलकुल दाद दिली नाही. मैने पहलेच सोचा था की मी इकडे आलो हे समजताच हा बंडखोर काफर हैवान नांगी टाकणार. लेकिन अभीं क्या नही होगा. रूमालान हात बांधून माझ्या पुढे उभा राहिल्याखेरीज आम्ही त्याची कोणत ही गोष्ट पक्की समजणार नाही. असे खलिते कितीही पाठविले तरी हम कभी नही डर सकते हो– बंडा–

**सय्यद :** जी हुजूर–

**अफझल खान :** वो खलितेका जबाब नही देना.

**सय्यद :** यह आपकी मर्जीका सवाल है खाविंद.

**अफझुलखान :** जी हां–यह हमारे मर्जीका सवाल है. और इसिलीये आम्हं त्या निमक हरामाच्या खलित्याला जबाब देणार नाही. पत्रातील मजकूर सच है या झुटा हे समजण्याकरिता दुसरी व्यवस्था लावून द्यावी. वकीलजी आपण माणसाबरोबर बाहेरच्या डेऱ्यात चला. सय्यद–उसको लेके जाव.

**सय्यद :** चलो वकीलजी ( पंत गोपीनाथ व सय्यद जातात )

**अफझलखान :** देखो, वकीलजी, अुस बंडखोर सेवाजीकी तरकीब, लेकिन हम कभी नही फस जायेंगे. अभी अुसके दिन भर गये है. अुसे अल्लाका बुलावा आगया है. त्याच्या देहाच्या राईराईएवढया ठिकऱ्या करून बादशहापुढे नाही टाकल्या तर हव्याहेत कशाला त्या गमजा ? वकीलजी मला अस वाटतंय की ज्या अर्थी हा बम्मन प्रतापगडाहून सिवाजीचा खलिता घेऊन आला त्याअर्थी – वो हैवान .. दगेखोर सेवाजी प्रताप-गडीच आपलं तोंड काळोखात खुपसून बसला असावा.

**कृ. भास्कर :** खाविंद, शिवाजी मोठा धूर्त पुरूष आहे. त्याच्या नसानसात कावेबाजी आणि दगेखोरपणा भिनलेला आहे. खाविंदाची दिशाभूल व्हावी या उद्देशाने त्याने प्रतापगडाहून खलिता पाठविल्याचे भासविले असावे असे आम्हाला आपले वाटते. खलिता प्रतापगडाहून आला असं कळताच आपण कदाचित गडावर हल्ला कराल, पण तो धूर्त- शिवाजी त्या अगोदरच भुयारी मार्गाने अन्यत्र पळून गेलेला असेल. ( सय्यद प्रवेश करतो )

**अफझुलखान :** वकीलजी, सेवाजीनं जरी आम्हाला गुंगारा द्यायचं ठरवलं तरी आम्ही मुळीच डगमगणार नाही. तो जिथं जाईल तिथून त्याच्या मुसक्या बांधून विजापूरात घेऊन जाऊ त्याला. महाराष्ट्रका सवता सुभा स्थापन करायचा विचार आहे त्या सैतानाचा, लेकिन आम्ही त्याच्या स्वप्नाचा विध्वंस करून टाकणार आहोत. त्याला राहायचं असेल तर त्याने इथल्या मुलुखाचा सुभेदार म्हणून राहावं. नपेक्षा हजरतीपुढे शरणा-गती पत्करावी.

**सय्यद :** वो निमकहरामजादा काफर सेवाजी हजरतीपुढे शरणांगती पत्क-रायला हरगीज तयार होणार नाही.

**अफझूलखान :** खामोश ! ये बाते किसीके सामने कर रहा है तुम ..

**सय्यद :** खाविंद, बंदेको माफी करना ... लेकिन मला तसं वाटलं म्हणून मी बोलला.

**अफझूलखान :** बंडा–तूं आमच्या पदरी चाकरीला आहेस. आमच्या अंगातलं बळ तुला पूर्ण ठाऊक आहे, असं असताना त्या बंडखोर-लुच्या-सेबाजीच्या

मुसक्या बांधून त्याला विजापूरात आम्ही नेवून- बादशहापुढे शरणांगती पत्करायला लावूं की नाही याचा अंदाजही करता येत नाही तुला ? वो सेवाजी तो हमारे सामने पहाडका चूहा है. उसको गिरफदार करना हमारे हातका मैल है. समझे ! हम उसको जिंदा पकडके जल्द ही जल्द हजरतीके- दरबारमे पेश करेंगे.

कृ. भास्कर : सय्यद बंडयावर खाविंद नाहक रागे भरले. तो म्हणतो त्याप्रमाणे शिवाजी विजापूरच्या बादशहापुढे शरणांगती पत्करिल असं- मला सुद्धां वाटत नाही.

अफझूलखान : नही-नही- ऐसा हरगीज नही होगा वकीलजी.त्या सेवाजीला मुंडी खालीं नमवावीच लागेल. आपणाला तो बडा- पहाड वाटत असेल.लेकिन आम्ही त्याला कवडीचीही किंमत देत नाही त्याच्या खलित्यावरून तो आम्हाला भयंकर घाबरून गेलाय यांत संशय नाही. आम्हाला तोंड देणं किती मुष्किल आहे याची कल्पना आलीय त्याला. आणि या सर्व- गोष्टीचा विचार करून तो सुटू पाहातोय आमच्या जाळयातून - लेकिन त्याला आम्ही कुत्र्याच्या मौतीनंच ठार मारणार आहोत

कृ. भास्कर : खाविंद- बंद्याला थोडी संधी मिळेल का आपल्याशी बोलायची?

अफझुलखान : जरूर-जरूर-क्यो नही ? बोलो- क्या कहना चाहते हो आप ?

कृ. भास्कर : ज्या अर्थी शिवाजीनं हा खलिता पाठवून आपली बाजु मांडली आहे त्याअर्थी तो आपणास वचकून आहे यात मुळीच संदेह नाही. पण मला असं वाटतंय की प्रत्यक्ष शिवाजीची भेट होऊन या विषयावर थोडीशी बातचीत करावी. जर खाविंदानी मला एवढा मोका दिला तर मी जातीनं जावून त्याची भेट घेईन.

अफझूलखान : आप जरूर मसलत कर सकते हो वकीलजी, आमची त्याला कसलीच हरकत नाही. लेकिन हमारा बेत पक्का है-वो कभी नही बदलेंगा. एवढी गोष्ट मात्र वकीलजीनी ध्यानी ठेवावी. मग चला तर आतांच त्या बंडखोर सेवाजीच्या मुलाखतीला. और एक गोष्ट ध्यानमे रखो की कोणत्या परिस्थितीत तो आमच्या जाळयात अडकेल अशी कांही तरी तजबीज करा. तो नक्की कुठं दडी देऊन बसला आहे याची खबर- जातां जातांच त्या

बम्मनाकडून काढा. त्यालाही घेऊन चला- सोबत. आणखी काही बातमी मिळाली तर तीही काढा त्याच्याकडून–चला-निघा लवकर-

कृ. भास्कर : जशी... खाविंदाची आज्ञा... (जातो)

## दृष्य ४ थे

स्थळ : एक जंगल वजा भाग. चंद्रराव मोऱ्याची मुलगी तारा संतीणीच्या वेषांत प्र. क. केंसाच्या जटा बांधलेल्या आहेत. अंगात भगवी कफनी- हातांत कमंडलू-कफनीच्या आत दडलेली एक समशेर. खांद्याला भगवी झोळी. वय अदाजे २५।२८ च्या आसपास. चेहऱ्यावर सूडाच्या छटा.

तारा : स्वतःला गो ब्राम्हण प्रतिपालक म्हणवून घेणारा तो जातीवंत दगेखोर. सैतान शिवाजी स्वतःस समजतोय तरी कोण ? मुहमे राम और बगलमे छुरी अशीच त्या काफर हैवानाची स्थिती आहे. शिवाजी हे नाव उच्चारताच मस्तकात संतापानं शूळ उठू लागतो, पण हरामखोरा, लक्षात ठेव नीट, ही चवताळलेली जहरी नागीण तुझा कडाडून चावा घेतल्या- शिवाय शांत बसणार नाही. काय करू ! हात कसे खुमखुमताहेत. असा जर या एकांतवासात सापडला असता तर बोकडासारखा सपासप कापून काढला असता. माझ्या बाबांचा निघृण खून करून स्वतःला प्रतिष्ठित म्हणून मिरवतोहेस काय ? पण शहाजीच्या पोरा माझ्या बाबांच्या खुनाचा बदला नाही घेतला तर मोऱ्यांच्या घराण्याचं नांवच सांगणार नाही. ठायी ठायी तुला अश्रू ढाळायला लावले नाही तर हव्याहेत कशाला त्या गोष्टी ?

पद

ठायी ठायी तुज रडविन दुष्टा
ना तरी सांगे मम प्रतिष्ठा ॥ ध्रु ॥
घाव घालीन वर्मी तुझिया
नाश करीन मी तुझा पापिया
लोळशी नरकी तूं पापिष्ठा ॥१॥

उगाच नाही मी हा वेष धारण केलाय ? शिशुपालाप्रमाणे तुझे सर्व अपराध भरतांच तुला प्रायश्चित्त मिळाल्यावाचून कदापिही राहाणार नाही. तुला कोठून कसा कोंडीत पकडावा त्याच विचारात रात्रंदिवस या जंगलातून फिरतेय मी, दुष्टा, तुला फसविन तर मीच फसविन, मग पाहाते तुझ्या अंगातलं शौर्य आणि तुझी बुद्धी ! (पुढे जाणार तोच समोरून जाधवराव-निरोजी व कमल- प्र. क. त्याना पाहून तारा किंचित बाजूला वळते.)

जाधवराव : (निरोजीस) मजल दरमजल करीत आम्ही इथपर्यंत तर-पाचलो. आता इथून सिवाजीचा मुक्काम कितीसा लांब आहे याचा काही अदाज लागत नाही.

निरोजी : आपण अगोदर या जंगलातून पुढे जावू आणि एखाद्या वाटसरूला प्रतापगडो जाण्याचा मार्ग विचारूं.

जाधवराव : हो, तसंच करावं... पण निरोजी, आपण बुवा फारच घाबरून गेलो आमच्या जीवाला. वाटलं होतं फक्त विजापुरांतच त्या राक्षसांचं थैमान चाललेल आहे; पण इथही तोच प्रकार ! विजापूरच्या लुटारूंचा तांडा इकडेही धुडगूस घालू लागला. हर ! हर ! काय ती लूटमार ! काय तो पाशवी अत्याचार ! तिकडे हाल होतात म्हणून आम्ही इकडे आलो, पण इकडेही आमच्या नशीबी तेच-

कमल : नाही धनी, एकदा का आम्ही शिवाजीमहाराजांच्या आश्रयाला गेलो की आपोआपच आमच्या मागची भिती दूर होईल. अविंध्र कितीही नाचले तरी शिवाजी महाराज त्याना नामोहरम केल्याशिवाय राहाणार नाहीत. विजापुरातून हजरतीपुढे अफजुलखान शिवाजी महाराजाना पकडण्याचा विडा उचलून इकडं आलेला असल्याने सध्या महाराज त्याच गडबडीत असणार.

निरोजी : अग कुठे शिवाजी महाराज अन् कुठे तो मोगल हैवान अफजुल-खान ! महाराजानी नुसतं मनात आणलं तर त्याची आंतडी बाहेर यायला क्षणाचाही वेळ लागणार नाही.

जाधवराव : चला, प्रथम आपण या जंगलातून पुढे जावूं. कदाचित त्या लुटारूंचा तांडा इकडे यायचा.

निरोजी : अरे- घाबरतोय कोण त्या लुटारूना ! येऊ देत तर खरे. एकेकाला सपासप कापून काढीन समशेरीनं.

जाधवराव : ( ताराकडे पाहात ) निरोजी – निरोजी.

निरोजी : काय ?

जाधवराव : ती पहा कुणीतरी संतसांप्रदायातली बाई तिकडे उभी आहे. चला, आपण तिलाच प्रतापगडावर जाण्याचा मार्ग विचारू.

निरोजी : (पाहात) अरे ती ईश्वराची सेवा करणारी कुणीतरी संत आहे. आपण कशाला तिच्या वाटेला जावं ? आपण मार्ग सोडू नये. एकदा मार्ग सुटला की पुढे साराच अनर्थ व्हायचा संभव असतो. तिला न हटकता आपण सरळ जाण हेंच बरं. उगाच तिच्या चिंतनात व्यत्यय कां आणा ?

जाधवराव : छे! छे! आपण बुवा त्या संतीणीचं दर्शन घेणार, चल कमल. आपण तिचा आशीर्वाद घेऊंया. अरे निरोजी, संत महंताचं दर्शन घ्यायला सुद्धा ऋणानुबंध लागतात. उगाच कुणालाही नाही, संताचं दर्शन घडत ! चला, आपण सर्वजणंच तिचा आशिर्वाद घेऊ.

कमल : पण धनी, काही दगा फटका तर येणार नाही ना ?

जाधवराव : दगा फटका ? वेड तर लागलं नाही तुला ? अगं सत्पुरुषांच्या दर्शनात का कधी कुणाचं वाईट झालंय ? मूर्खंच आहेस तू. चल-तूं माझ्याबरोबर ये.

कमल : चला- (दोघं तारा जवळ जातात-निरोजी तिथंच आहे.)

जाधवराव : संतीणबाई, आम्ही उभयता नमस्कार करीत आहोत तुम्हाला (नमस्कार करतात.)

तारा : आपण नमस्कार केलात म्हणून आपणास आशीर्वाद देणं आमचं कर्तव्य आहे, पण आपल्यासारख्या निमकहराम माणसाना त्याचा कांहीही उपयोग होणार नाही.

जाधवराव : म्हणजे? आपल्या बोलण्याचा अर्थ तरी काय समजावा आम्ही?

तारा : तुम्हा लोकांच्या साऱ्या गोष्टी ऐकल्याहेत मी. आणि म्हणूनच ठामपणे सांगतेय का आशीर्वादाचा उपयोग आपणास काहीही होणार नाही. आपण विजापूरकरांच्या अन्नावर वाढलात, पण अन्नदात्याशी कृतघ्न होऊन सैतानाच्या संगतीचा हव्यास धरून इकडे आलात.

जाधवराव : म्हणजे आपणाला म्हणायचंय तरी काय ?

तारा : आपण कुठुन आलात ?

जाधवराव : विजापूरहून.

तारा : जाताहां कुठ ?

जाधवराव : महाराष्ट्राच्या भावी राजाकडे.

तारा : (हंसून) हेंच-हेंच-चुकतंय तुम्हा लोकांचं. आपणा सर्वांना तो महाराष्ट्राचा भावी राजा वाटतो, पण आम्ही त्याला अलम मराठी रयतेचा क्रूर शत्रू म्हणून ओळखतो. अजूनही विचार करा आणि परत माघारी जावून बादशहाची माफी मागा.

निरोजी : पाहिलंस जाधवराव, तुला मी प्रथमच सांगत होतो. आता तरी यांचा प्रत्यय आला की नाही तुला ? ज्याअर्थी ही संतीण शिवाजी-महाराजाचा द्वेष करतेय त्याअर्थी ही नक्कीच महाराजांची कट्टर दुष्मन आहे.

जाधवराव : आता माझ्याही डोक्यात थोडासा प्रकाश पडला. नक्कीच ही महाराजाचा दुष्मन आहे. पण आमच काय करील हो ?

तारा : मडळी, कल्पनेच्या भ्रामक साम्राज्यात बुडून जावू नका. या जगात कुणाच कुणाच काही करावं लागत नाही. जशी कृती तसच ज्याच त्याला फळ मिळत असतं.

जाधवराव : पण आपण एवढं महाराजांविरुद्ध तरी कां बोलताहां ?

तारा : साऱ्या गोष्टी तुमच्यासारख्या माणसाना सांगून काय उपयोग ? शिवाजी अलम मराठी रयतेचा कर्दनकाळ आहे. एवढच सांगायचय मला. या उपर मी आणखी जास्त कांही सांगू इच्छित नाही. तुम्हाला एवढ कळून देखाल जर त्याचेच पाय चाटायला जाणार असाल तर आमची काही हरकत नाही, पण पूर्ण लक्षात ठेवा यातून चांगलं काहीही निर्माण होणार नाही. उलट केल्या कर्माचा पश्चात्ताप मात्र होईल जन्मभर !

जाधवराव : ते आमचं आम्ही पाहून घेवू. या गोष्टी सांगण्याचा तुमच्यासारख्या संतीणीना काय अधिकार ? आम्हाला वाटल होतं की, तुम्हा खरोखरच संत आहात ... पण ..

दा. क २९१ दिनांक
विषय किशोर क्र. २५०



कमल : धनी– शब्दानं शब्द विकोपास नेण्यापेक्षा आपण आपला मार्ग धर-लेला बरा. महाराजाविरुद्ध बोललेलं मला बिलकुल सहन होत नाहीय, पण करणार काय? या मग्रूर संतीणीला देवानंच शिक्षा द्यावी.

तारा : देवानं शिक्षा द्यायला आम्ही काहीही अमंगल केलं नाही त्याचं. तो कशाला शिक्षा देईल आम्हाला ?

कमल : ज्याअर्थी शिवाजी महाराजाना तुम्ही उण्या-अधिक शद्बानं संबोधिता त्याअर्थी देवालाच तुम्ही दूषण देता माणसानं देवासारखी करणी केल्यावर त्याचा देव व्हायला वेळ लागत नाही. मला वाटतं आपण त्या कडव्या हैवानाची हेर असला पाहिजे.

तारा : आम्ही कुणाचिही हेरगिरी करीत नाही. आम्ही परमेश्वराचे दास आहो. आमचा सामना अन्यायाविरुद्ध आहे.

निरोजी (रागाने) संतीणबाई, आपण आमच्यापासून कांही तरी लपवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहात. काय असेल ते या घडीला आम्हाला कळलं पाहिजे. नपेक्षा शिवाजा महाराजाविरुद्ध बोलणारी आपली जीभ मुळासह छाटली जाईल एवढं पक्कं ध्यानी ठेवा. बायकावर शस्त्र उगारणं महापाप आहे, पण प्रसंगी आम्ही तेही करायला मागेपुढे पाहणार नाही.

तारा : माझी जीभ छाटण्याचा तुम्हाला काय अधिकार ?

निरोजी : संतापानं मस्तकात शूळ उठला की माणूस अधिकार वगैरे गोष्टी क्षणभर विसरतो, संतीणबाई.

तारा : त्या हरामखोर शिवाजीच्या पाठिंब्यामुळे आपण एवढे शेफारला आहांत-पण तुमच्याशी मुकाबला करायची माझी पूर्ण तयारी आहे. त्या भेकड पळपुट्याच्या बढाया माझ्या समोर मारताहा काय ?

जाधवराव : हा- खबरदार .. बाई ! स्त्रीच्या मर्यादेला शोभेल एवढंच बोला. उगाच संघर्ष वाढविण्याचा खटाटोप करू नका.

तारा : असल्या डुरकावण्या पुष्कळ ऐकल्याहेत आजवर. आपणास शिवाजीचा जर एवढा पुळका येतोय तर जास्त वेळ बोलण्यात न दवडता हाती समशेर घेऊनच उत्तर द्या. उगाच वेळ कशाला वाया घालवता ?

निरोजी : ( समशेर उपसतो ) ही पहा उपसली मी समशेर. शिवराया-

विरुद्ध आता एक जरी शब्द उच्चारलात तरी आम्ही आपली मुळीच गय करणार नाही.

तारा : अस्स ! ठीक आहे ! ही पहा मी सुद्धा उपसली समशेर (उपसते). गिधाडागत आपण सर्व जरी माझ्यावर तुटून पडलात तरी चालेल. प्रत्येकाला सपासप कापून काढीन एका क्षणात. चला–व्हा–पुढे.

निरोजी : आपल्यासारख्या सर्वसंग परित्याग केलेल्या सतीणीकडे तळपती समशेर पाहून आम्हाला आश्चर्य वाटलं. ज्याअर्थी तुम्ही हत्यारबंद आहांत त्याअर्थी तुम्ही मोठ्या चतुर दिसता, पण पूर्ण ध्यानी ठेवा, सत्याचा वाली जर या जगात सज्जनांचा पाठिराखा असेल तर आमची या संघर्षातून विजयानं सुटका होईल आणि तो जर यांच्या सारख्या कपटी अविधाना पाठबळ देण्यासाठी सिद्ध झालेला असेल तर आम्ही सत्कार्यासाठी स्वतःच्या पंच प्राणांची आहुती द्यायला सदैव तयार आहो. चला. होऊ द्या सुरवात. (तारा आणि निरोजी निकरानं लढत असतात एवढ्यात सय्यदबंडा व पठाण प्र. क. )

सय्यद : हा ! खबरदार, मरगठ्ठे के बच्चे. क्षणाचाही विचार न करता एकदम लढाई थांबवा. नपेक्षा एकेकाची गर्दन छाटली जाईल.

निरोजी : ( लढाई थांबवीत रागाने ) कोण ? कोण आहात आपण ?

सय्यद : आपल्यासारख्या मरगठ्ठ्यांचा कर्दन काळ . सय्यद बंडा – म्हणतात मला.

जाधवराव : (आश्चर्याने) कोण ? बंडा ? विजापूरच्या परिसरात दिवसाढवळ्या स्त्रियांच्या अब्रूवर दरवडा घालणारा उन्मत्त सैतान ?

सय्यद : होय–तोच मी–

निरोजी : गर्दन छाटणं हातचा मळ झालाय वाटतं तुझ्या ? पण आम्ही काही आजच नामर्द झालो नाही. हिम्मत असेल तर चालव समशेर. जाधवराव, ही दोन्ही बोकडं सतीणबाईच्याच बाजूची दिसताहेत. तेव्हा या हराम खोराना समशेरीचा प्रसाद द्यायलाच हवा. तूं या कपटी वयेचा समाचार घे. मी आणि कमल या यवनाना बघतो. अलम मराठी रयतेच्या डोळ्यात धूळ फेकणाऱ्या नामर्द भेकडानो चला, असे पुढे या–पाहतो तुमची शक्ति. जय एकलिंगजी ! जय तुळजाभवानी ! (जाधवराव ताराशी, कमल

पठाणाशी, आणि निरोजी सय्यदशी निकरानं लढतात. अचानक सय्यदचा वार निरोजीला लागतो व तो खाली कोसळतो. तशी कमल व जाधवराव लढाई थांबवून निरोजीस सावरतात. संधी साधून-तारा-सय्यद-पठाण-जातात)

**निरोजी :** (मंद स्वरात) जा-ध-व-रा-व अखेर या निराजीची आहुती या संग्राम वेदीवर सांडली. मी पावन झालो. जाधव, पण मनी एकच शल्य बोचून राहिलं ...माझ्या देहावर या पापी सैतानानी हल्ला केला. क – म – ल येतो मी – माझ्या धर्मपत्नीला तिच्या लाडक्या निरोजीचा अखेरचा आशीर्वाद सांग, जा–ध–व–रा–व कनातीत जाऊन तिला – सांभाळ. महाराजांची भेट काही झाली नाही – पण गेला तर त्याना माझे शतशः प्रणाम सांगा. ये–तो – मी वेदना असह्य होतात. हळू – हळू – सारं शांत होतं )

**जाधवराव :** ( दुःखातिवेगानं ) नि ऽ रो ऽ जी ऽ ...

**कमल :** अरेरे ! केवढा विचित्र प्रसंग आला हा आमच्यावर !

**जाधवराव :** कमल, आता रडण्यात हशील नाही चल आपण निरोजीचा पार्थिव देह घेऊन कनातीकडे जावू. ( निरोजीचं प्रेत खांद्यावर घेऊन जाऊ लागतो – मागून कमल जाते )

## दृश्य ५ वे

**स्थळ :** प्रतापगडावरील शिवाजीचा खलबतखाना. पात्रे-शिवाजी-तानाजी-येसाजी कंक.

**शिवाजी :** येसाजी, खानाच्या छावणींत पाठविलेले आमचे वकील अजूनपर्यंत कसे बरं आले नाहीत ? आम्हाला असं वाटतंय की आमचा खलिता पाहून खान नक्कीच गोंधळून गेला असावा.

**येसाजी :** महाराज, पंताजी गोपीनाथ मोठे चतुर पुरुष आहेत, ते खानाच्या वकीलाशी बातचीत करूनच माघारी परतणार – ते येतील. पण महाराज, खानानं चालविलेले निर्घृण – पाशवी अत्याचार आपल्या कानी आले नाहीत का ?

**शिवाजी :** आज दिवसभरची खबर आम्हाला अजून समजली नाही — येसाजी. काही विशेष तर नाही ना घडलं ? आपण काही ऐकलंय का आज?

**येसाजी :** हाय महाराज, मी ज ऐकलंय ते तस विशेषच आहे. रात्रीच सर्जेरावानं बातमी आणलीय ....

**शिवाजी :** कोणती बातमी ?

**येसाजी :** हजरतीच्या पादशहातीला, तेथील अत्याचाराला कंटाळून दोन जोडपी आपल्या आश्रयाला येत होती, पण खानाच्या माणसानं त्यातल्या एका उमद्या वीराला ठार मारलं. बिचाऱ्याच्या धर्मपत्नीने कामांध राक्षसांच्या हाती सांपडू नये म्हणून पतीबरोबर सहगमन केलं.

**शिवाजी :** अरेरे ! फार वाईट बातमी आणलीत आपण येसाजी, पण हे तुम्हा आम्हाला रात्रीच का नाही सांगितलत ? आम्ही त्याकरता जातीनं हालचाल केली असती. आज काही भयकरच ऐकलं आम्ही- खानाने चालविलेले पाशवी अत्याचार आमच्या ध्यानी होतेच. पण त्यात दिवसे दिवस जास्तच भर पडत चाललीय. ज्यानी आमच्या आश्रयाचा हव्यास धरला- त्यांच्यावर असा जीवघेणा प्रसंग यावा ही केवढा खेदाची गाष्ट ?

**येसाजी :** या घटना एवढ्या चपळाईन घडतात की कधी काय होत याचा पत्ता देखिल लागत नाही.

**तानाजी :** महाराज, दिवसे दिवस खानाच्या अत्याचारान अलम मराठी रयतेला जबरदस्त तडाखा बसत चाललाय. एवढं खतरगण होतय की उघड्या डोळ्याना स्वकीयांच हाल पाहावत नाहीत. अशानं महाराष्ट्राच भवितव्य धोक्याच्या भयाण गर्तत जाण्याचा जास्त संभव आहे यासाठी जेवढ शक्य होईल तेवढ्या लवकर खानाचा बंदोबस्त करायला हवा.

**शिवाजी :** तानबा- आमच्या मनी आम्ही सगळ जाणून आहोत. ज्यानं विजापूराच्या गादीपुढे आम्हाला गिरफदार करण्याचा विडा उचललाय त्याची मर्दुमकी पाहायचीय आम्हाला. बादशहापुढ पैजेचा विडा उचलणं जेवढं सोप आहे, तवढं या शिवाजीच्या अगाला स्पर्श करणं सोप नाही ते जाऊ-दे, त्या जोडप्याच पुढं काय झालं येसाजी ?

**येसाजी :** निरोजी आणि त्याची धर्मपत्नी या दोघांचा असा दुःखद शेवट

झाल्यानंतर दुसरा पुरुष जाधवराव लुटारूंच्या तावडीतून निसटून वाट मिळेल तिकडं पळत सुटला, आणि त्याची बायको कमलाबाई खोगीर घातलेल्या घोड्यावर आरूढ होऊन दूर प्रदेशी निघून गेली.

**शिवाजी :** हर हर ! काय हा अनर्थ ? (सर्जेराव प्र. क.)

**सर्जेराव :** (मुजरा करून) महाराज, पंत येताहेत.

**शिवाजी :** त्यांच्याच आगमनाची आतुरतेनं वाट पाहातोय आम्ही.

**पंत गोपीनाथ :** (प्र क. मुजरा करतात) शिवाजी महाराजांचा जयजयकार असो.महाराज, आपला खलिता आम्ही खानाच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिला. त्यांच्या वकीलाकडेही बराच वेळ चर्चा करायला मिळाली. तेही आपल्या मुलाखतीला आलेले आहेत. पण अजूनपर्यंत अमूक एक निश्चित ठरलेलं नाही. तरीपण महाराजांनी निर्धास्त असावं खानाच्या वकीलाशी जे बोलायचं ते आम्ही बोलतो आहोत. आपणही आता बोलाच

**शिवाजी :** ठीक आहे ! आई तुळजा भवानीच्या मंगल आशिर्वादानं आमचं सदैव कल्याणच होणारेय. आमच्या मनी यत्किंचितही काळजी नाही. शत्रूची प्रबळ शक्ति ठोकरून नेस्तनाबूत करायची शक्ति आई भवानीनं आमच्या अंगी द्यावी हीच आमची तिच्या चरणी प्रार्थना आहे. पंत, त्या माणसानं भयंकरच अत्याचार करायला सुरुवात केलेली आहे. विजापूरहून आमच्या आश्रयाला येणाऱ्या कुणी निगोजी नामक पुरुषास काल त्याच्या मग्रूर माणसानी तडकाफडकी ठार मारलं.

**पंत गोपिनाथ :** त्याचे सहस्त्र अन्याय भरत येताहेत महाराज.

**शिवाजी :** होय पंत – आणि त्याच बरोबर त्या जावळीकरांच्या पोरीचेही.

**सर्जेराव :** महाराज आपणास कदाचित खोटं वाटेल, पण कालच्या हत्याकांडात त्याच बाईचा हात होता. खानाचे माणूस आणि जावळीकरांची पोर ह्या दोघांचं संगनमत आहे.

**शिवाजी :** (आश्चर्याने) काय ? काय म्हणताहा सर्जेराव (सारे आश्चर्याने पाहात असतानाच पडदा हळू हळू खाली येतो. )

● ●

# अंक २ रा

## दृष्य १ ले

**स्थळ :** प्रतापगडावरील शिवाजीचा खलबतखाना. शिवाजी महाराज अस्वस्थपणे येरझारा घालीत आहेत.

**शिवाजी :** (थांबून) महाराष्ट्राच्या देवते, किती वाईट वखत आणलास तू आमच्यावर ! आम्ही देशाच भलं करण्यासाठी अहोरात्र तळमळाव आणि मग्रूर अविंधानी आमची ससेहोलपट करावी ? यासारखं दुःख ते कोणतं ? आई तुळजा भवानी, यांतून तूच आमचं रक्षणकर्ती आहेस. तुझ्याच मंगल आशीर्वादाने आम्ही पुढचं पाउल टाकणार आहोत. सैतानानं केलेल्या पाशवी अत्याचाराचा जो जो आम्ही विचार करावा तो–तो– आमचं मस्तक भण भणून जातंय. तरी पण आमचा वज्रनिर्धार कायम आहे, कोणत्याहि वख्ती मुंडी खाली घालून आम्ही पादशहातीपुढे शरणांगती पत्करणार नाही. आम्हाला हिंदुपदपादशाहीची श्रीगणेशा करून स्वराज्याची मुहूर्तमेढ पक्की रोवायची आहे आणि ती आम्ही रोवणारच ! त्यासाठी लाख मोलाचा प्राण खर्ची घालावा लागला तरी हरकत नाही. पण हजरतीच्या शब्दाला वळी पडून इथलं साधं सुभेदारपद मात्र आम्ही कालत्रयीही स्वीकारणार नाही.

**सर्जेराव :** (प्र. क. मुजरा करीत) महाराज, आपल्या मुलाखतीसाठी खानाकडून वकील आले आहेत. पाठवू का त्याना आत ?

**शिवाजी :** बहुत आश्चर्याची खबर आहे ही सर्जेराव ! मघाशी पंतानी सांगितलं होतं आम्हाला, पण आम्ही मात्र आश्चर्यचकीत झालो.

**सर्जेराव :** यांत आश्चर्य कसलं महाराज ? ते जरी खानाचे वकील असले तरी त्यांच्या मनात आपल्या विषयी फार आदर आहे. आपलं भलं व्हावं अशीच इच्छा आहे त्यांची.

**शिवाजी** : सर्जेराव, आमचं भलं करणं किंवा बुरं करणं आतां कोणत्याही पुरुषाच्या हाती नाही. आमच्या भल्या-बुऱ्याची मदार आता सर्वस्वी आई भवानी मातेवर अवलंबून आहे माणसानं माणसाचं वाईट चिंतिलं तरी ज्याला परमेश्वर साहाय्य देणारा आहे त्याचा एकही बाल कुणी बांका करू शकणार नाही. चला– कृष्णाजी भास्कराना आत बोलवा. आम्ही त्याना आमची मुलाखत जरूर देवू.

**सर्जेराव** : (मुजरा करतो) जशी महाराजांची आज्ञा. (जातो)

**शिवाजी** : खानानं आमच्याकडे आपला वकील पाठवून आमचं मन वळविण्याचा प्रयत्न तर केला नसेल ना ? तरी पण आमची काही हरकत नाही आमच मन सदैव मोकळं आहे याची तरी खानाला कल्पना येवू दे.

( कृष्णाजी भास्कर व सर्जेराव येतात )

**कृ. भास्कर** : (मुजरा करून) महाराज, कृष्णाजी भास्कर आपल्या चरणी मानाचा मुजरा करीत आहे. शिवरायांची इच्छा असल्यास आम्ही थोड बोलणार होतो, तसदी बद्दल हुजुरास माफी असावी महाराज.

**शिवाजी** : माफीचा काहीच प्रश्न येत नाही पंत. आपल्याला आमच्याशी बोलायला काहीही हरकत नाही, आपण अफजुलखानाचे वकील आहात हे आम्ही जाणतो आणि असं असूनही आपला ओढा आमच्या बाजूनं आहे याचीही आम्हाला पूर्ण जाणीव आहे. जे बोलायचं असेल ते बोलायला आमची कोणतीच ना नाही क्षणभर आपण आमचा सलोखा दूर ठेवून जे असेल ते स्पष्ट बोलावे

**कृ. भास्कर** : महाराजानी एवढा मोका दिल्यावर आम्हाला खरोखरच फार आनंद झाला. महाराज आपण पाठविलेला खलिता खाविंदानी वाचून घेतला. आपल्या लिहिण्याचा रोख त्यानी ओळखला नाही असं नव्हे, पण खाविंद मोठे हट्टी स्वभावाचे, आणि दुराग्रही आहेत. विजपूरच्या पादशहानीच नमक त्यानी खाल्लेल असल्य मुळे त्याच्या स्वभावात फार हेकेखोरपणा भरलेला आहे. आपल्या खलित्यामुळे त्यांचा असा समज झालाय, की शिवाजी आपणाला भिवून वचकून आहे. पण हा सारा खाविंदाचा भ्रम आहे. हे आम्ही काही महाराजाना नव्यान सांगायला नको.

**शिवाजी :** पंत, अफजुल खानाच्या मनांत या घडीला आमच्याविषयी कोणते विचार चाललेले आहेत ? त्याना दगा द्यायची तर इच्छा नाही ना ?

**कृ. भास्कर :** अजून तरी खाविंदांच्या मनात तसं नाही. पुढे काय होईल ते आम्ही महाराजांच्या कानी अवश्य घालू. याबद्दल महाराजानी निःशंक असावं. सध्या तरी त्यांचा विचार एकच ठरलेला दिसतोय.

**शिवाजी :** कोणता ?

**कृ. भास्कर :** कोणत्याही परिस्थितीत खाविंद आपणाला हजरतीपुढं उभं करणार म्हणताहेत. पण त्याना वाटते तेवढी ही गोष्ट सोपी नाही.

**शिवाजी :** पंत, गोष्ट सोपी आहे किंवा नाही हे आम्ही का बोलावं ? आमच्या मनी आता कोणतीच चिंता नाही. आम्ही एवढंच जाणून आहोत की महाराष्ट्राचं भवितव्य आम्हाला घडवायचं आहे. आणि ते आम्ही घडविणारंच !

**कृ. भास्कर :** होय महाराज, महाराष्ट्राची शान आपल्यासारख्या थोर पुरुषामुळेच टिकून राहणार आहे, पण या गोष्टी बादशहाला कोण सांगेल? त्यांच्या बोलण्याचा होरा एकच आहे अन् तो म्हणजे महाराजानी इथलं मांडलिकत्व पत्करून राहावं

**शिवाजी :** ते आम्हाला कदापिही शक्य होणार नाही पंत. आमचा तो पिंडच नव्हे. आम्हाला स्वतंत्र राज्याची मुहूर्तमेढ रोवायची आहे. आम्ही जगणार ते राजा म्हणून आणि मरणारही राजाच्याच दिमाखाने !

**कृ. भास्कर :** महाराज, आपण एक गोष्ट अवश्य करून पहावी.

**शिवाजी :** कोणती ?

**कृ. भास्कर :** खाविंदाचा असा बेत आहे की आपण त्यांची छावणीत भेट घेऊन जे कांही बोलायचं असेल ते बोलावं, पण आम्हाला असं वाटतंय की यात दगाबाजी खास असणार. म्हणून महाराजानी खाविंदाच्या शब्दाला मात्र बळी पडू नये. यावेळी महाराजानी खाविंदास मोठेपणा देवून त्याच्या स्वागताची सरबराई करुन कोणत्याही परिस्थितीत प्रतापगडच्या पायथ्याशीच भेटीचा योग घडवून आणावा.

**शिवाजी :** आमच्या मनीही आम्ही तेच ठरवून ठेवलं आहे पंत. आम्ही

खानाच्या छावणीत मिध्यासारखे खाली मुंडी घालून कदापिही जाणार नाही. आमच्याशी बोलायचं असेल तर खानानंच आमच्या भेटीला यावं. त्याच्या स्वागताची आम्ही चांगली सरबराई करु.

सर्जेराव : महाराज, आपण ठरवित आहा त्याचप्रमाणं व्हायला हवं. अफझुलखान आपणास फसवू पाहतोय, पण त्याच्या शब्दाला अशा मोक्याच्या वेळी बळी पडून चालणार नाही.

शिवाजी : ते आम्ही आमच्या अंतरी जाणून आहोत सर्जेराव.ज्याला एवढ्या विशाल महाराष्ट्राची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेऊन वाहायची आहे. त्यानं असे मुंडी खाली घालून अपराध्यागत काहीही करता उपयोगाचं नाहीं. पंत, आपण आमची भेट घेऊन खानाच्या अंतरात उठलेल्या प्रलयंकारी वादळाचा आगाव इशारा आमच्या कानी घातल्याबद्दल आम्ही आपले अनंत आभारी आहो.

कृ. भास्कर : छे छे! असं काही तरी भलतंच काय म्हणताहां आपण महाराज ? उलट आम्ही तर असं म्हणू की आमचं महाराजानी शांतपणे ऐकून घेतल्या बद्दल आम्हीच आपले मनःपूर्वक आभार मानायला हवेत. येतो आम्ही महाराज, आईभवानी आपलं व आमचं सदैव भलं करो हीच इच्छा.

शिवाजी : पंत, असेच येत चला वारंवार.

कृ. भास्कर : ते आम्ही जाणत का नाही महाराज ? येतो आम्ही. (जातात)

शिवाजी : व्वा ! व्वा सर्जेराव पाहिलंस पंताचं मन ? आमच्या भल्याची किती काळजी आहे त्यानां ! सरळ पाहता ते खानाचे वकील, पण आमच्यावर त्यांची भारी मेहेर नजर.

सर्जेराव : महाराज, आपल्या अंगी माणसाचं मन घडविण्याचं सामर्थ्य आहे ... त्या अलौकिक सामर्थ्यांची जाण मात्र विजापूरकरांच्या ध्यानी येत नाही.

शिवाजी : सर्जेराव, कोळसा कितीही उगाळीत बसलं तरी तो काळाच राहणार. जसा त्याच्या गुणधर्मात फरक पडत नाही, तद्वतच विजापुरकरांची स्थिती आहे. त्याना वाटत असेल की शहाजीचा बच्चा आमच्या शद्बाबरहुकुम नाचेल. पण नाही-हा शिवाजी तसा नाचणार नाही. जोपर्यंत सामर्थ्य

आहे तोपर्यंत तो अशा बाहुल्याना स्वतःच नाचवीत राहील. चल सर्जेराव आपण जिजा माउलीचं दर्शन घेऊन अंबाबाईच्या मंदीरी जावूया. आमच्या ध्यानी मनी आतां फक्त आई भवानीचंच रूप दिसतंय. अशा या कठीण वख्ती आम्ही आम्हांवरच्या संकटाची जोखीम तिच्याच हाती देणार आहो· चल-निघूया-आपण.

सर्जेराव : चला महाराज– (दोघेही जातात)

## दृष्य २ रे

स्थळ : रस्ता. वेळ सकाळची. संतीणीच्या वेशात कमल प्र. क.)

पद

दावी तूं आई मार्ग मजला
ना तरी देई पदी मोक्षाला ।।धृ।।
पाहूं किती मी दैना आई
अजूनी कसा मम जीव न जाई
अंतरले मी शिव पदाला । १।।

कमल : आई माय भवानी, आता तूच या अभागिनीला सन्मार्ग दाखवायला समर्थ आहेस. मला निर्भय असा मार्ग तरी दाखव. अन्यथा तुझ्या चरणी अखेरची चिरनिद्रा तरी दे. माझ्या जीवनाची झालेली ही करूण शोकांतिका यापुढे किती दिवस मी पाहात राहू ? विजापूरच्या पाशवी अत्याचाराना कंटाळून आमच्या धन्यानी विजापूरचा त्याग केला यात आमचं काही चुकलंय का ? गो-ब्राह्मण प्रतिपालक शिवरायाच्या चरण दर्शनाचा हव्यास मनी धरला हे चुकलं का आमचं ? सांग माते, आमचं चुकलंय तरी काय ? शिव-प्रभूच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेल्या या मंगल भूमीत एका निरपराध कुटुंबाची झालेली ही शोकांतिका पाहून तुला बरं वाटलं का ? देवाच्या भेटीला राऊळात जात असताना राऊळच जर अंगावर कोसळलं तर ते दुःख कुणाला

सांगावं ? नाही आई माते, या कमलला कुणीही त्राता राहिलेला नाही या जगात ! पठाणांच्या पाशवी अत्याचारानं निरोजीसारख्या शूर वीराचं रक्त या भूमीवर सांडलं. ते दुःख अंतरी कायम सलत असताना आमच्या धन्याची अन् माझी ताटातूट झाली. मी एकीकडे तर ते दुसरीकडे अशी विचित्र स्थिती आमच्या नशीबी आली. तेव्हापासूनच मी या वेषांत फिरतेय. आता फक्त ध्यानी मनी तुझंच चिंतन ...... तुझाच ध्यास ! धनी दृष्टीआड झाले असता या पेटत्या वणव्यात माझ्यासारख्या तरुण स्त्रीनं जगाव तरी कसं ? म्हणून हा संतीणीचा वेष धारण केला. यामुळे माझ्याकडे मात्र कुठलाही उपटसुंभ ढुंकुन देखील पाहात नाही. एकार्थी हे बरंच झालं म्हणायचं ? पण आता या वेषात जायचं कुठे ? शिवरायांकडे जायची फार इच्छा आहे मनात, पण या घडीला तिकडे न गेलेलं बरं. सध्या या वेषात शिवरायाविरुद्ध चालणाऱ्या घडामोडीचं निरीक्षण करायचं. बस्स ! ठरला विचार. हेच आता या संतीणीचं कार्य. (दूर पहात) हा कोण बरं इकडे येतोय ? हा तर त्या हरामखोर खानाचा मग्रूर चाकर......यानं आपल्याला नाही ओळखलं म्हणजे मिळविली (सय्यद बंडा प्र. क.)

सय्यद : (एकीकडे थांबून) ही कुणीतरी साधुसंताच्या सांप्रदायातील दिसतेय असल्या संत लोकाकडून त्या शिवाजीला बऱ्याच गोष्टी समजतात. कुठं काय चालतंय, कोण काय बोलतोय, हे ह्या माणसाकडून त्याच्या कानी जातं. प्रथम ही कुठल्या पंथाची आहे ते तरी पाहूया (जवळ येत) काय ग संतीण बाई, कुठं निघालीस या राजरस्त्यानं ? आपल्यासारख्या वैराग्यपूर्ण संतानी उंच उंच गिरिशिखरं सोडून असं राजरस्त्यावर हिंडू नये.

कमल : वत्सा, आमच्यासारख्या संताना जगाच्या दाही दिशा मोकळ्या असतात संचार करायला. आम्ही कुठही हिंडत असलो तरी आमचा हेतू एकच असतो.

सय्यद : कोणता हेतू असतो तुमचा ?

कमल : परमात्म्याच्या पदाची प्राप्ती.

सय्यद : खरं बोलतेहेस ना तू ? की दगाबाजी करतेहेस ? जर तसं काही करण्याचा प्रयत्न केलास तर याद राख माझ्याशी गाठ आहे. प्रथम तू कोण

आणि अशी भरकटल्यासारखी का फिरतेहेस ? हे सर्व मला कळलं पाहिजे. त्या निमकहराम शिवाजीची हेर असशील तर परिणाम फार वाईट होईल. मला ओळखलंस का तू ?

कमल : नाही– मी ओळखलं नाही आपल्याला. आम्हा संताना तुमच्यासारख्यांची ओळख कुठून असणार ? कोण आहात आपण ?

सय्यद : अफझुलखान साहेबांचा माणूस आहे मी. मला सय्यद बंडा म्हणतात, पण तू कोण आहेस ? संताच्या नावाखाली भोंदूगिरी करणारी तर कुणी नाहीस ना ?

कमल : नाही सय्यदराव, मी हेर नाही किंवा संताच्या नावाखाली भोंदूगिरी करणारी बाई नाही. आपण उगाच शंका घेताहा, पण मी तशी कुणीही नाही. मी खरोखरच ईश्वराची उपासक आहे.

सय्यद : तुझा गाव कोणता ?

कमल : विजापूर

सय्यद : विजापूर ?

कमल : होय सय्यदराव

सय्यद : मग विजापूर सोडून हा पंथ का स्वीकारलास ?

कमल : सय्यदराव, विजापुरातून अफजुलखान शिवाजीला जिवंत पकडून न्यायचा विडा उचलून इकडे आले आहेत, तेव्हां त्यांच्या कार्यात ईश्वराचं सहाय्य मिळावं या हेतूनं मी रात्रंदिवस त्या परमात्म्याची प्रार्थना करीत असते.

सय्यद : व्वा ! व्वा ! बहोत अच्छा ! हे तू एवढा वेळ का नाही सांगितलंस मला ? ठीक आहे ! मग मला असं सांग 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणविणाऱ्या त्या हरामखोर शिवाजीबद्दल तुझं काय मत आहे ?

कमल : सय्यदराव, आमच्यासारख्या संतानी राजकारणात पडू नये, आम्ही फक्त ईश्वरोपासक आहो. राजकारणातला गंधही माहित नाही आम्हाला, पण मी एवढंच सांगू शकेन की स्वतःला 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणवून घेणारा तो बंडखोर शिवाजी विश्वासघातकी नक्कीच आहे.

सय्यद : शाब्बास रे शाब्बास ! आम्हांला हेच हवं होतं. त्यामानानं तुझा अभ्यास दांडगा आहे. तुझ्यासारखी चतुर संतीण जर आमच्या खानसाहे-

बांच्या पदरी राहील तर जीवाचं सोनं करून घेईल. येतेस का खानसाहेबां-कडे ? त्याठिकाणी मी तुझी चांगली शिफारस करीन. वाटल्यास कायमची नोकरीवर ठेवीन.

कमल : माफ करा सय्यदराव. आम्हाला प्रभूच्या सेवेशिवाय अन्यत्र कुठेही करमत नाही. आपली तशी इच्छाच असेल तर आपल्याला मी थोडं सहकार्य देवू शकेन पण कुणाच्याही पदरी राहाणं जमणार नाही.

सय्यद : कुणाच्याही पदरी न राहता तू आम्हाला सहकार्य दिलंस तरी फार झाल मी तुला एका महत्त्वाच्या कामगिरीवर पाठविण्याचं मनात ठरवलं आहे.

कमल : बोला सय्यदराव, आपलं कोणतंही काम करायला मी सदैव तयार आहे. मुखानं प्रभूचं नाव आणि हातानं आपल्यासारख्यांचं काम करणं मला जास्त आवडेल, पण सय्यदरावानी एवढीच कृपा करावी ... मला खानसाहेबाकडे नेवू नये. मी जरी त्यांच्या कल्याणासाठी झटत असले तरी त्यांच्या पदरी रहायला मला फार भिती वाटते.

सय्यद : कांही हरकत नाही. खानसाहेबांच्या पदरी कशाला राहायला हवं ? कसंही करुन खाविंदाच्या मनाला समाधान वाटलं की झालं.

कमल : मग सांगा सय्यदराव, मी कोणतं कार्य करावं अशी इच्छा आहे आपली ?

सय्यद : तुला सारं काही सांगतो; पण लक्षात ठेव. या गोष्टीची कुठेही वाच्यता होता कामा नये. काम एवढं महत्त्वाचं आहे की तुला डोळ्यात तेल घालूनच त्या ठिकाणी राहिलं पाहिजे .

कमल : सय्यदरावानी पूर्ण विश्वास ठेवावा माझ्यावर.

सय्यद : ठीक आहे ! तर मग ऐक (दाखवीत) ते समोरचं वळण दिसतंय ना ? त्या वळणावरूनच जंगलात जायचा मार्ग आहे.

कमल : बरं, मग ?

सय्यद : त्या मार्गानं सरळ वर जायचं ... आजूबाजूला विस्तीर्ण जंगल लागल. बरंच पुढं गेल्यावर वाटेच्याच कडेला एक झोपडी दिसेल. त्या झोपडीपलिकडे एका झाडाखाली महान सामर्थ्यवान अशी एक संतीण

प्रभूच्या नामस्मरणात मग्न असलेली तुला दिसेल. तिच्याकडे जायचं व नमस्कार करायचा. वर माग म्हणताच 'आपल्या सेवेला आलेय' असं सांगायचं. जा - नीघ - लवकर.

कमल : सय्यदराव, आपण मुळीच काळजी करू नये. जसं आपण सांगितलंत त्याच प्रमाणे मी आपल्या कार्याचा श्रीगणेशा करीन. आपण निर्धास्तपणे जावू शकता, मनी कसलाही संशय न धरता !

सय्यद : शाब्बास ! आम्हाला योग्य अशीच मिळालीस तू. एकदा का आमच्या शत्रूचा समूळ नायनाट झाला की मग काय विचारतेस आपली बडदास्त .. ? अंगावरचे हे भगवे कपडे-ह्या माळा. सगळ सगळ काही बदलून जाईल. अन् त्या जागी भरजरी शालू-पैठण्या हिरे माणकांचे दागिने येतील. जा ताबडतोब आपल्या कार्याला लाग. येतो मी (जातो)

कमल : वारे तुझी, दगलबाज माणसा ! शत्रूचा समूळ नायनाट करायचाय का तुला ? ठीक आहे ! आता चांगलंच नाटक रंगवते... ( जाते )

## दृश्य ३ रे.

स्थळ : जंगलवजा भाग : वेळ- सकाळची. तारा एका आसनावर ध्यानस्थ बसलेली आहे. थोड्या वेळाने बाजूने कमल प्र. क.

कमल : सय्यद बंड्यानं सांगितलेल्या मार्गानं इथपर्यंत येवून या संतीणी जवळ तर पोंचले. आता अगोदर हिला नमस्कार करावा हेच खरं; पण ही तर डोळे मिटून ध्यानांत निमग्न आहे. प्रथम मोठ्यानं जयजयकार करून हिला जागृत करावं. सकल मनोरथ परिपूर्ण करणाऱ्या आईचा जयजयकार असो.

तारा : ( डोळे उघडून ) कुणी केला माझ्या ध्यानाचा भंग ? आम्ही देवाच्या नामस्मरणांत निमग्न झालो असता आमच्या ध्यानाचा भंग करण्याचं सामर्थ्य झालं तरी कुणाला?

कमल : शांत व्हा देवी... आम्ही आपल्या ध्यानाचा भंग होईल या या उद्देशानं जयजयकार केला नव्हता.

तारा : ( उठून ) कोण आहेस तू ?

कमल : मी आपणाला शरण आले आहे, माझं रक्षण व्हावं. आपल्या सानिध्यात राहून मी आपली सेवा करू इच्छित आहे.

तारा : (हंसत) आमची सेवा ! पण तू कोण कुणाची ? आलीस कुठून ? आमची सेवा करून राहण्यामागचं प्रयोजन तरी काय ?

कमल : देवी, माझ्यावर जे महान संकट आलं आहे त्याचं आपण निरसन करावं.

तारा : असं कोणतं संकट कोसळलंय तुझ्यावर ?

कमल : कोणत्या तोंडानं सांगू मी देवी ? मला सांगवत देखिल नाही.

तारा : पण सांगितल्याशिवाय कसं कळणार मला ?

कमल : सांगते–सारं–सारं काही सांगते मी आपणाला. मी मुळची विजापूरची, अफझुलखान साहेबाबरोबर इकडे आले. खाविंदाना विजयश्री प्राप्त व्हावी म्हणून प्रभूचं नामस्मरण करीत रोज या प्रदेशांत फिरते. एक दिवस त्या बंडखोर शिवाजीच्या मग्रूर सैनिकानी माझी अब्रू लुटण्याचा प्रयत्न केला.

तारा : ( स्वगत ) ही बाई मोठी धूर्त दिसतेय. शिवाजीविरुद्ध बोलून माझ्याशी सलगी करू पाहातेय... हिला मी प्रथमच ओळखलीय... पण आता थोडंसं हिच्याच कलानं घेऊन बघावं. ( प्रगट ) अस्सं काय ! पण काय ग तू आमची कोणती सेवा करशील ?

कमल : आपण जे सांगाल ते करायची तयारी आहे माझी.

तारा : ठीक आहे ! पण आमची एक अट आहे.

कमल : कोणती ?

तारा : तू आम्हाला वचन द्यायला हवंस.

कमल : वचनच काय पण प्रसंगी पंचप्राण द्यावे लागले तरी ते मी द्यायला तयार आहे. आपणास मी प्रतिज्ञापूर्वक सांगते की माझ्याकडून आपल्या मनाविरुद्ध एकही गोष्ट केली जाणार नाही. आणखी वेगळं वचन हवंय का आपल्याला ?

तारा : नको. तूर्त एवढी प्रतिज्ञा पुरेशी आहे; पण लक्षांत ठेव–आमचं कार्य सिद्धीला जाईपर्यंत तू हे ठिकाण सोडून अन्यत्र कुठेही जाता कामा नये. विश्वासघात करून जर पळालीस तर आमच्याशी गाठ आहे.

कमल : नाही. मी आपले पाय सोडून कुठेही जाणार नाही. मी आजपासून सर्वस्वी आपलीच आहे. आपण सांगाल ते करणार व पाठवाल तिकडे जाणार. एखादं काम सांगून तरी बघा, परीक्षा तरी दुसऱ्या कशा रितीनं होणार ?

तारा : आमच्या इच्छेसारखी जर आम्हाला सिद्धी मिळाली तर आमच्या सारखी दुसरी सुखी व्यक्ति या जगात आहे कोण ? त्या दुष्टाने जसा माझा विश्वासघात केला, तसाच विश्वासघात करून मला त्याचा सूड घ्यायचा आहे. ज्यानं माझ्या जन्मदात्याचा खून केलाय त्याच्या देहाचे राई-राई एवढे तुकडे करून या जंगलातील हिंस्र श्वापदाना खावू घालणारेय मी ! नागाचं वारुळ खणून टाकताना नागाचं एक पिलू हातचं निसटून गेलं ते कुठं आहे त्याच्या लक्षात ? बस्स ! झालं ते झालं... आता आमच्या मनी एकच निर्धार एकच ईर्ष्या .. सूड –सूड– आणि सूड –

कमल : काय ? आपल्या जन्मदात्याचा खून झाला ? कुणा चांडाळाचे हात सरसावले हे दुष्ट कृत्य करायला ? सांगा- आपण– नुसतं त्या चांडाळाचे नाव सांगा. अशीच धावत जावून कलेजा बाहेर काढते त्याचा.

तारा : समजल सार– समजेल तुला. आतांच नको ते– समजावून घ्यायला प्रत्यक्ष ज्या गोष्टी घडतील त्यावरून सारं कळेल तुला. हे बघ, मी आता थोडावेळ माझ्या कामावर लक्ष देवून येते, तोपर्यंत तू इथून कुठेही जायचं नाही. कुणी आलाच तर सरळ या मार्गानं आंत येवून मला हांक मारायची.

कमल . जशी आपली आज्ञा. ( तारा जाते ) हर ! हर ! शिवराया, काय हे आपल्या नाशासाठी आरंभलंय या बाईनं ? मला वाटतं ही कुणी तरी ढोंगी संतीण महाराजांच्या नाशासाठी वावरत असावी; पण महाराज मी आपल्या आश्रयाला येत असलेली एक सामान्य अबला आहे. माझ्या दैवगतीनं मला दुःखी केलं असलं तरी मला त्या दुःखाची बिलकूल पर्वा नाही. ह्या ढोंगी सतीणीच्या सान्निध्यांत राहून ही कोणतं कारस्थान रचू

पाहातेय याचं सूक्ष्म निरीक्षण करायला हवं. आई माय भवानी शिवरायावर आलेलं संकट दूर करण्यासाठी तूच मला शक्ति आणि बुद्धि दे.

॥ पद ॥

दे मजला अवसान भवानी
लोळविन मी रिपूला अवनी ॥ धृ ॥
ध्यास लागला शिव पदाचा
पाठलाग मी करीन अरिचा
हीच आस मज रात्रंदिनी ॥ १ ॥

( कमलचं गाणं संपताच तारा प्र. क. )

**तारा :** कुणी आलं नाही ना इकडे ?

**कमल :** नाही, देवी कुणीही आलं नाही.

**तारा :** अशी जवळ ये माझ्या. ( ती जवळ येते ) आता तुला मी माझ्या कार्याची रूपरेषा सांगते, ती नीट ऐकून घे आणि त्याप्रमाणे वाग. जर का थोडाही गाफीलपणा करशील तर तूच शेवटी तुझ्या प्राणाला मुकशील एवढं लक्षात ठेव. ( बाजूला दाखवित ) ती पलीकडे झोपडी पाहिलास ?

**कमल :** (पाहून) होय – पलिकडे दिसतेय खरी एक जुनाट झोपडी !

**तारा :** तीच तिच्या आतच विवरात जाण्यासाठी गुप्त माग आहे. विवराच्या तळघरात खच्चून दारू सामान भरलेलं आहे.

**कमल :** (आश्चर्यानें) काय ? दारु सामान ? आणि ते कशाकरिता ?

**तारा :** अगोदर सारं ऐकून घ्यायच, मध्येच भलत्या शंका विचारायच्या नाहीत. आम्ही आमच्या शत्रूला कट करून त्या विवरात आणणार आहोत. त्या सैतानाला आणण्याची संपूर्ण जबाबदारी एका खास माणसावर सोपवलेली आहे. शत्रू विवराच्या दारी यताच तू त्याला घेऊन आंत जायचं. आत सर्वत्र निबिड अंधकार दाटलेला आहे. यासाठी हातात पेटता पलीता घेऊन तू त्याला आत न्यायचं, आणि तो विवराच्या एन मध्यावर पोचला की शिताफीने हातातला पेटता पलीता दारूच्या कोठाराना लावायचा व नाकासमोरच्या मार्गानं जीव मुठीत घेऊन पळत सुटायच, पण

लक्षात ठेव जर का फंद फितूरीच्या भानगडीत पडून आमचा डाव उधळून लावण्याचा प्रयत्न करशील तर आमच्याशी गाठ आहे एवढं पक्कं ध्यानात ठेव.

कमल : बापरे ! त्यामानानं आपलं कार्य बरंच भयंकर दिसतंय, पण काय हो, असा ह्या उन्मत्त शत्रू तरी कोणता ?

तारा : तो अस्सल मराठा आहे एवढंच या घडीला मी सांगू शकेन तुला. याउप्पर तू आम्हाला त्याच्याविषयी काहीही विचारू नये.

कमल : माझा विचारायचा हेतू तसा काही निराळा नव्हता. आपल्या जन्म-दात्याचा ज्यानं निर्घृण खून केला त्या सैतानाचं फक्त नावच ऐकणार होते मी.

तारा : आग लागो त्याच्या नावाला त्या चांडाळाचं नांव घेऊन जीभ मात्र विटाळेल आमची. ज्यावेळी त्याच्या देहाची राख झालेली मला दिसेल त्याच वेळी मन शांत होईल माझं. चल आता वेळ दवडून उपयोग नाही. तुला विवरातील भाग फिरून दाखविते. उद्या रात्री आमचा खास माणूस शत्रूला घेऊन येईल. तो येतांच सांगितलेल्या शब्दाबरहुकूम काम फत्ते झालं पाहिजे.

कमल : देवी आपण कसलीच काळजी करू नका. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा. मीआपला कदापिही विश्वासघात करणार नाही.

तारा : आणि केलास तर सुटशील तरी का आमच्या हातून ? जिथं मिळ-शील तिथून मुसक्या बांधून घेऊन येईन तुला, आणि समशेरीनं लाख तुकडे पाडीन तुझ्या देहाचे.ही संतोष म्हणजे साधीसुधी बाई नव्हे एवढं लक्षात ठेव. माझ्या अंगी केवढं सामर्थ्य आहे याची प्रचिती येईलच तुला.

कमल : आपल्या अंगी अतुल सामर्थ्य व अद्भुत सिद्धी आहे हे चांगलं माहित आहे मला. सय्यदराव जर मिळाले नसते तर या अभागिनीला आपल्या चरणकमलांचं दर्शन कसं झालं असतं ?

तारा : चल, आता निरर्थक गोष्टी बोलत राहायचं नाही. सगळं काही नंतर समाधानानं बोलू आपण. अगोदर तू विवरांतील जागा पाहून घे म्हणजे पुढे तुला आंत वावरणं सोपं जाईल.

कमल : होय खर आहे आपलं म्हणणं.
तारा : मग चलतर माझ्या मागून.
कमल : चला- जशी आपली आज्ञा (दोघी जातात)

## दृष्य ४ थे

स्थळ : अफजुलखानाची छावणी. पात्रे- अफजुलखान, सय्यद बंडा.

अफझुल : सय्यद हम कभी डर नही सकते है, समझे ? आम्ही त्या दगाबाज सेवाजीच्या मुसक्या बांधून जहाँपन्नाह आदिलशहाके सामने खडा करूंगा. आता खलिते पाठवून काही उपयोग होणार नाही.

सय्यद : खाविंद, लेकिन सेवाजी आपणाला फारच भिवून वागतोय.

अफझुल : वागणारच ! अरे तो सेवाजी भ्याड आहे म्हणून तर त्या दगल-बाजानं आमची भेट टाळली आणि खलिता पुढे केला.

सय्यद : खाविंद, आपणाला अल्ला यश दिल्यावाचून राहणार नाही. माझी पूर्ण खात्री आहे की खाविंद या संग्रामातून विजयी मुद्रेनं विजापुरी जातील.-

अफजुल : वाहवा ! तेरे मुहमे घी शक्कर ! अरे त्या पत्थरांतल्या अल्लाला देखिल माझी भिती वाटतेय. विजापुरातून येताना थोड्या देवळांचा का विध्वस केला आम्ही ? (हंसतो) त्या निर्जीव पत्थरांतले बिचारे देव कायमचे डोळे मिटून पडले.

सय्यद : खाविंद, वकीलजीचा कुठं पत्ता नाही अजून ?

अफजुल : मैं भी यह सोच रहा हूँ. बराच वेळ झाला वकीलजीना जावून ! लेकिन वो बहोत चालाख आदमी है, सेवाजीशी योग्य अशी बातचीत करूनच ते माघारी परततील.

कृ. भास्कर : ( प्र. क. ) शुक्रिया ... खाविंद आपका सब भला होगा.

अफझुल : अरे वा ! वकीलजी आलेसुद्धा ... आयीये - आयीये वकीलजी, क्या कहा हमारे दुष्मनने ? तो आमची भेट या छावणीत घ्यायला तयार आहे की नाहीं ?

कृ. भास्कर : खाविंद, तो आपली भेट या छावणीत घ्यायला फार घाबरतोय.
अफजुल : ( हसून ) क्या कहा वकीलजो ? वो डरता है ? क्यो ? त्याला एवढं घाबरायचं कारण काय ? बऱ्या बोलानं आमच्याशी सलोखा केल्यास आम्ही त्याचं काहीही अनहित करणार नाही.
कृ. भास्कर : पण तो फार भित्रा आहे. खाविंद. त्यापेक्षा तो जे काय ठरवतोय त्याप्रमाणे होऊंदे.
अफजुल : क्या है अुसकी राय ?
कृ. भास्कर : खाविंदानीच आपणाला प्रतापगडाच्या पायथ्याशी भेटावं असं म्हणणं आहे त्याचं. खाविंदाचा निरोप घेऊन मी पंताजी गोपीनाथाना भेटलो व तियून त्यांचे सोबत जावून प्रतापगडी शिवाजीची भेट घेतली.
अफजुल : वकीलजी, आम्ही त्या हरामखोराला कदापिही सामोरे जाणार नाही.
कृ. भास्कर : पण खाविंद, असं म्हणून कसं होणार ? थोडंसं त्याच्याच कलानं घेणं बरं होईल,
अफझुल : नही–नही ऐसा कभी नही हो सकता वकीलजी. आम्ही त्याला सामोरे जाणार नाही. त्याच हैवानानं इथं येवून आमचे पाय धरले पाहिजेत. वाटल्यास आम्ही त्याच्याशी अगदी सरळपणानं वागू. तो दुर्बल आहे. त्यानं विनाकारण दांडगाई तरी का करावी ? झाल्या गेल्या गोष्टीबद्दल आम्ही त्याला हजरतीकडून माफी करून देवू आणि इकडच्या सुभ्याचा सुभेदार करू. मात्र त्याने हजरतीचा इमानी नौकर राहाण्याबद्दल कसम खाल्ली पाहिजे. अगर यह मंजूर किया तो उसका बाल भी कोई बाका नही कर सकेगा. तो हरकामी हुशार माणूस आहे तेव्हा त्याला नाहीसा करण्यापेक्षा आपलासा करण्यातच जास्त फायदा आहे. त्यानं आपणहून आमचं म्हणणं धुडकावून लावलं तर आमचा इलाज नाही.
कृ. भास्कर : मला वाटतं तो हे सर्व ऐकेल. त्याच्याजवळ पुरेसं सैन्य तरी कुठं आहे ? आपल्या जवळ तर भरपूर सैन्यबळ आहे. तेव्हा खाविंदानी त्याच्या भेटीला जाणंच हितावह आहे.
अफजुल : वकीलजी, आम्ही त्याची भेट घेऊ पण ती दोन अटीवर.

कृ. भास्कर : कोणत्या दोन अटी ?

अफजुल : त्याने आमच्याबरोबर विजापुरास आलं पाहिजे आणि दुसरी अट त्यानं तख्ताचा नोकर म्हणून इकडे वहिवाट केली पाहिजे. त्याला हवी असल्यास आम्ही इकडच्या प्रांताची सुभेदारी देखिल देवू.

कृ. भास्कर : शिवाजी आपलं म्हणणं कबूल करील यांत मुळीच शंका नाही. पण आपल्याकडून बोलल्याप्रमाणे वागणे होईल की नाही याची शंका जर त्याला आली तर त्याची काय वाट ? 'खाविंदाच्या म्हणण्याप्रमाणे आपण गेलो आणि फसून कैद झालो " असं जर त्याला वाटेल तर मग पुढे काय ? कैदेत ठेवाल तर ' सुटून येईन ' अशी तरी आशा तो बाळगील. पण जर त्याच्या जीवाचं काही बरं वाईट झालं तर त्याला जबाबदार कोण ?

अफजुल : आम्ही इतकं आश्वासन देऊनही जर तो आमच्यावर विश्वास ठेवायला तयार नसेल, तर आम्हीही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवू शकणार नाही. आम्ही तरी त्याच्या सांगण्यावर भरोसा कां ठेवावा ?

कृ. भास्कर : एकमेकावर एकमेकांचा विश्वास नसला तर काय होणार ? कोणतीच गोष्ट कधीही तडीस जाणार नाही. तेव्हा त्यानं आपल्यावर व आपण त्याच्यावर विश्वास हा ठेवलाच पाहिजे.

अफझुल : सच है वकीलजी, आता आमचे म्हणणे एकच. आम्ही म्हणतो त्याप्रमाणे त्याने विजापुरास येवून हजरतीपुढे विजापूरच्या तख्ताचे बंदे नोकर म्हणून शपथ घ्यावी. आणखी इकडच्या प्रांताच्या सनदा घेऊन परत येवून इथली सुभेदारी करावी. एवढी गोष्ट कबूल करून तो आमच्या बरोबर यायला तयार झाला, म्हणजे सर्व काही त्यात आले. मग त्याने आम्हाला एकट्याला जरी भेटीला बोलावले तरी आमची जायची तयारी आहे. अगदी एकटा, हातात काही एक शस्त्र न घेता येईन. आम्ही असं म्हणत आहो म्हणून सांगा त्या निमकहराम सेवाजीला. त्याचा जर होकार असला तर आम्ही पुढे पाहू. नसला तर आमचा आम्ही विचार करू, त्याचा त्याने करावा. लेकिन मग मात्र आम्ही कोणत्याही प्रकारची तहाची बोलणी एकून घेणार नाही.

कृ. भास्कर : खाविंदाचा तसाच जर हुकूम असला तर आम्ही तो शिवाजीच्या कानी आवश्य घालू. आम्हालाच काय तो पुन्हा एकदा हेलपाटा पडेल
अफजुल : वकीलजी, आप जरूर जाना चाहिए. यह हमारी आखरी जवाब है असे त्या दगेखोराला निक्षून सांगा. आमच्या मनांतून आपणाला हा निरोप घेऊन पुन्हा तिकडे पाठवायचे नव्हते. त्याच्या वकीलामार्फतच आम्ही हा निरोप पाठवायचा ठरविला होता, लेकिन आता असे वाटले आपणालाच पुन्हा पाठवावे. आपण जा आणि पुन्हा एकदा त्या बंडखोराला साऱ्या गोष्टीची समज द्या. त्याला असं सांगा की तू दुर्बल आहेस. तुझ्या हातून खाविंदापुढे निभाव लागणार नाही. करितां, आम्ही म्हणतो तेच कबूल कर. यांतच तुझे खरे कल्याण आहे. उगाच ओढून घरशील तर विनाकारण मरशील. तुझ्या कारभाराच्या आड येत नाही, लेकिन तू तख्ताचा पिढीजाद नौकर आहेस, आणि त्याच तख्ताला धाब्यावर बसवायला पहातोहेस हे बरं नाही. वाटले तर ऐकून घेईल नाहीतर नाही म्हणेल त्याची आम्हाला बिलकुल पर्वा नाही.
कृ. भास्कर : खाविंद, मी अत्ताच जावून शिवाजीच्या कानी ही गोष्ट घालतो आणि त्याचा नक्की विचार काय आहे हे पाहून लागलीच खाविंदांच्या सेवेस हजर होतो.
अफझुलखान : चलो-वकिलजी, आप जा सकते हो. त्या बेरडाची भेट घ्या आणि आमचा असा निरोप कळवा त्याला.
कृ. भास्कर : जशी खाविंदांची आज्ञा. ( जातो )

## दृश्य ५ वे

स्थळ : प्रतापगडावरील शिवाजीचा खलबतखाना. पात्रे– शिवाजी – सर्जेराव – तानाजी.

शिवाजी : सर्जेराव, जावळीकरांची पोर असा कुटील डाव रचील याची स्वप्नातही कल्पना नव्हती आम्हाला ! तिनं आम्हाला विवरात जीवंत पेटवून लावण्याचा बेत रचला होता, पण आमचं आई तुळजाभवानीनं

रक्षण केलं. शत्रूचा हात मारण्यासाठी असतो पण तारणं देवाच्या हाती असतं ! ती मराठयांची पोरगी कोण कुणाची . पण जणू आई भवानीच आल्याचं भासलं मला. ती जर ना येती तर आमचं बरं वाईट व्हायला क्षणाचाही विलंब लागला नसता. वा ! वा ! आई तुळजाभवानी, एवढं जरी तू आमचं रक्षण केलंस तरी फारं झालं.

**सर्जेराव :** पण महाराज, जावळीकरांच्या पोरीनं मांडलेला कुटील डाव आपण तात्काळ ओळखायला पाहिजे होता. तिनं पाठविलेल्या साध्या निरोपामागे आपण का धावत गेलात तेच आम्हाला समजत नाही.

**शिवाजी :** आम्हाला आलेला निरोप एका महान संतीणीचा होता सर्जेराव. मोऱ्याची पोरगी संतीणीच्या वेषात ढोंग करून ह्या एवढ्या मोठ्या कारस्थानामागे असेल याची आम्हाला मुळीच कल्पना नव्हती.

**सर्जेराव :** दिसतं तस नसतं महाराज, अशा या कठीण वख्ती महाराजांच्या जीवाला काही धोका झाला असता तर ? आम्ही पाठीला पाठ देवून रात्रं दिवस महाराजांच्या सान्निध्यात आहोत त्याचा काय उपयोग ? कठीण वख्ती आपण असा जीव धोक्यांत घालणं बरं नव्हे.

**तानबा :** आम्हीही तेंच सागत होतो महाराजाना, पण महाराज आमचं ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. शत्रू कधी अन् कसं कारस्थान रचिल हे सांगता सुद्धा यायचं नाही.

**शिवाजी :** तानबा, सर्जेराव-आम्ही या साऱ्या गोष्टी अंतरी जाणून आहोत. आपण जरी आमची चाकरी करुन रहात असला तरी आम्हाला आपण घरांतल्या माणसां इतकेच प्रिय आहांत. मग आपण गेलात काय किंवा आम्ही गेलो काय. दोन्ही एकच.

**सर्जेराव :** तरी पण महाराजानी सध्याचा वाईट वखत टाळला पाहिजे.

**शिवाजी :** नाही सर्जेराव, ज्या गोष्टी आम्हाला जातीनं पाहाव्याशा वाटतात त्या आम्ही जरुर पाहाणार.

**सर्जेराव :** आमच्या सारख्यानी आणखी ज्यास्त तरी काय बोलावं ?

**तानबा :** हो-आम्ही तरी आणखी जास्त काय सांगणार महाराजाना, पण महाराज, असल्या जिवावर बेतणाऱ्या कामासाठी आम्ही आमचं शीर तळहातावर घेऊन सदैव जागरूक आहो याची मनी खातरी बाळगावी

शिवाजी : आपल्या अतूल पराक्रमाची आम्हाला जाणीव आहे तानबा. तुमचा एवढा धीर आमच्या पाठीशी सदैव असताना आम्ही मुळीच डगमग- णार नाही काहीका असेना पण आम्ही एका महान संकटातून सहीसलामत तर बचावलोच. आता दुसरं संकट सामोर येतंय त्याचा समाचार घेण्या- साठी सदैव जागरूक राहिलं पाहिजे.

शिपाई : ( प्र. क. मुजरा करतो ) महाराज, बाहेर खानाकडून वकील- साहेब आले आहेत. आपली भेट घ्यायची आहे असं म्हणतात.

शिवाजी : खानाकडून पुन्हा वकील ? तो खान असे वकील पाठवतोय तरी किती वेळा ? ठीक आहे ! त्याना आमच्या मुलाखतीकरता पाठवून द्या.

शिपाई : जशी महाराजांची आज्ञा. ( मुजरा करून जातो )

सर्जेराव : खानाच्या पापाचे घडे दिवसे दिवस भरत चालले आहेत. पण महाराज, कोणत्याही प्रकारे त्या दुष्ट हैवानाची गय मात्र करता उपयोग नाही. दुष्टाला शासन हे मिळालंच पाहिजे.

तानबा : नाही म्हटलं तरी तो आपल्याला फार मोठा शक्तिवान समजतोय.

शिवाजी : आम्ही सुद्धा शक्तिवानच आहोत तानबा. जोपर्यंत आपल्यासारखे खंदे शूर वीर आमच्या पाठीशी आहेत आणि आई भवानीचं कृपाछत्र आहे तोपर्यंत आमची शक्ति अविधाना पुरून उरेल एवढीच आहे. कोणत्याही वख्ती आम्ही मोडू पण वाकणार नाही. ( बाहेरून कृ. भास्कर प्र. क. )

कृ. भास्कर : ( मुजरा करून ) महाराजांचा विजय असो.

शिवाजी : पंत– असं तडका फडकी येण्याचं प्रयोजन तरी काय ?

कृ. भास्कर : महाराज, खाविंदांच म्हणणं आपल्या कानी घालण्यासाठीच आम्ही प्रतापगडी येणं केलं. खाविंद आपली भेट घ्यायला तयार आहेत पण त्यांच्या दोन अटी पुऱ्या केल्या पाहिजेत आपण–

शिवाजी : कोणत्या अटी घातल्याहेत अफझुलखानानं ?

कृ. भास्कर : आपण हे सर्व सोडून विजापुरात यावं, नपेक्षा इथलं सुभेदारपद तरी सांभाळावं.

शिवाजी : शक्य नाही पंत, त्रिवार शक्य नाही. आणखी काय वाटेल ते सांगा, पण आम्ही पुन्हा विजापुरी येणार नाही आणि इथले मांडलिकत्वही

सांभाळणार नाही. आम्हाला नवराज्य निर्माण करायचं आहे. उगवत्या सूर्याची सोनेरी किरणं आम्ही आमच्या डोळयानी पाहणार आहोत."

कृ. भास्कर : पण यामुळे महाराजांच्या जीवास धोका आहे. म्हणून म्हणतो महाराज, आपण एकवार खाविंदाचं म्हणणं मान्य करून विजापुरात जाऊन यावं. समजा आपणाला त्या ठिकाणी कांही दगा फटका झाला तर आपण कोणत्याना कोणत्या उपायाने सुटूं शकाल, पण इथं राहून जर जीवाचं काही बरं वाईट झालं तर ते आम्हाला कसं पाहावणार महाराज?

शिवाजी : पंत, आम्ही जन्म घेतलाय तो मरण्यासाठीच. मरणाचं दुःख आमच्या सारख्या पुरुषानी बाळगून चालणार नाही. देशासाठी आत्मसमर्पण करायची आमची एका पायावर तयारी आहे, आम्ही मरूं ते मानानं! लाचारीनं दुसऱ्याचे गुलाम होऊन नव्हे.

कृ. भास्कर : महाराज, महाराष्ट्रावरलं आपलं प्रेम आम्ही जाणत का नाही? आम्हाला आपल्या शौर्याची - पौरुषत्वाची-पूर्ण-जाणीव आहे, पण आम्ही यावेळी दुसऱ्याचे गुलाम आहो.

शिवाजी : अफझुलखानाचा निरोप आमच्या कानी घालण्यासाठी आपण आला आहात म्हणून आम्ही आपणाला उण्या-अधिक- शब्दानं मुळीच बोलणार नाही. आम्ही अनभिज्ञ असलो तरी पूर्ण सूज्ञ आहोत पंत. स्वराज्याच्या प्राप्ती खातर आमचं रक्त या मातीत सांडलं तरी आम्ही त्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून कृतार्थतेनं सदैव हसत राहू, पण तेच रक्त जर विश्वासघातानं, गनिमीकाव्याच्या लत्ता प्रहारानं सांडलेलं असेल तर आमच्या प्रत्येक रक्ताच्या थेंबातून अविश्वाच्या नावानं कर्ण-कर्कश किंकाळयाच ऐकू येतील.

कृ. भास्कर : आम्ही आणखी तरी काय बोलाव महाराज? बरं- निघतो आम्ही. आपला निर्धार कायम आहे असं सांगतो आम्ही खाविंदाना. देवाच्या मनात आणि आपल्या दैवात जे आहे तेच होऊंदे.

शिवाजी : पंत, आपण या बाबतीत मुळीच जीवाला लावून घेऊ नका. आपण खाविंदाचे चाकर आहांत हे आम्ही जाणतो. धन्याचा जसा हुकूम होईल तसंच वागायला हवं आपणाला. यांत आम्ही आपणाला मुळीच दोष देणार नाही.

शिवाजी : आपल्या अतूल पराक्रमाची आम्हाला जाणीव आहे तानबा. तुमचा एवढा धीर आमच्या पाठीशी सदैव असताना आम्ही मुळीच डगमगणार नाही काहीका असेना पण आम्ही एका महान संकटातून सहीसलामत तर बचावलोच. आता दुसरं संकट सामोर येतंय त्याचा समाचार घेण्यासाठी सदैव जागरूक राहिलं पाहिजे.

शिपाई : ( प्र. क. मुजरा करतो ) महाराज, बाहेर खानाकडून वकीलसाहेब आले आहेत. आपली भेट घ्यायची आहे असं म्हणतात.

शिवाजी : खानाकडून पुन्हा वकील ? तो खान असे वकील पाठवतोय तरी किती वेळा ? ठीक आहे ! त्याना आमच्या मुलाखतीकरता पाठवून द्या.

शिपाई : जशी महाराजांची आज्ञा. ( मुजरा करून जातो )

सर्जेराव : खानाच्या पापाचे घडे दिवसेदिवस भरत चालले आहेत. पण महाराज, कोणत्याही प्रकारे त्या दुष्ट हैवानाची गय मात्र करता उपयोग नाही. दुष्टाला शासन हे मिळालंच पाहिजे.

तानबा : नाही म्हटलं तरी तो आपल्याला फार मोठा शक्तिवान समजतोय.

शिवाजी : आम्ही सुद्धा शक्तिवानच आहोत तानबा. जोपर्यंत आपल्यासारखे खंदे शूर वीर आमच्या पाठीशी आहेत आणि आई भवानीचं कृपाछत्र आहे तोपर्यंत आमची शक्ति अविधाना पुरून उरेल एवढीच आहे. कोणत्याही वक्ती आम्ही मोडू पण वाकणार नाही. ( बाहेरून कृ. भास्कर प्र. क. )

कृ. भास्कर : ( मुजरा करून ) महाराजांचा विजय असो.

शिवाजी : पंत– असं तडका फडकी येण्याचं प्रयोजन तरी काय ?

कृ. भास्कर : महाराज, खाविंदांच म्हणणं आपल्या कानी घालण्यासाठीच आम्ही प्रतापगडी येणं केलं. खाविंद आपली भेट घ्यायला तयार आहेत पण त्यांच्या दोन अटी पुऱ्या केल्या पाहिजेत आपण–

शिवाजी : कोणत्या अटी घातल्याहेत अफझुलखानानं ?

कृ. भास्कर : आपण हे सर्व सोडून विजापुरात यावं, नपेक्षा इथलं सुभेदारपद तरी सांभाळावं.

शिवाजी : शक्य नाही पंत, त्रिवार शक्य नाही. आणखी काय वाटेल ते सांगा, पण आम्ही पुन्हा विजापुरी येणार नाही आणि इथले मांडलिकत्वही

सांभाळणार नाही. आम्हाला नवराज्य निर्माण करायचं आहे. उगवत्या सूर्याची सोनेरी किरणं आम्ही आमच्या डोळयानी पाहणार आहोत.

कृ. भास्कर : पण यामुळे महाराजांच्या जीवास धोका आहे. म्हणून म्हणतो महाराज, आपण एकवार खाविंदाचं म्हणणं मान्य करून विजापुरात जावून यावं. समजा आपणाला त्या ठिकाणी कांही दगा फटका झाला तर आपण कोणत्याना कोणत्या उपायाने सुटू शकाल, पण इथं राहून जर जीवाचं काही बरं वाईट झालं तर ते आम्हाला कसं पाहावणार महाराज?

शिवाजी : पंत, आम्ही जन्म घेतलाय तो मरण्यासाठीच. मरणाचं दुःख आमच्या सारख्या पुरुषानी बाळगून चालणार नाही. देशासाठी आत्मसमर्पण करायची आमची एका पायावर तयारी आहे, आम्ही मरू ते मानानं ! लाचारीनं दुसऱ्याचे गुलाम होऊन नव्हे.

कृ. भास्कर : महाराज, महाराष्ट्रावरलं आपलं प्रेम आम्ही जाणत का नाही? आम्हाला आपल्या शौर्याची . पौरुषत्वाची-पूर्ण-जाणीव आहे, पण आम्ही यावेळी दुसऱ्याचे गुलाम आहो.

शिवाजी : अफझुलखानाचा निरोप आमच्या कानी घालण्यासाठी आपण आला आहात म्हणून आम्ही आपणाला उण्या-अधिक-शब्दानं मुळीच बोलणार नाही. आम्ही अनभिज्ञ असलो तरी पूर्ण सूज्ञ आहोत पंत. स्वराज्याच्या प्राप्ती खातर आमचं रक्त या मातीत सांडलं तरी आम्ही त्यां रक्ताच्या प्रत्येक थेंबातून कृतार्थतेनं सदैव हसत राहू, पण तेच रक्त जर विश्वासघातानं गनिमीकाव्याच्या लत्ता प्रहारानं सांडलेलं असेल तर आमच्या प्रत्येक रक्ताच्या थेंबातून अविधाच्या नावानं कर्ण-कर्कश किंकाळयाच ऐकू येतील.

कृ. भास्कर : आम्ही आणखी तरी काय बोलाव महाराज ? बरं- निघतो आम्ही. आपला निर्धार कायम आहे असं सांगतो आम्ही खाविंदाना. देवाच्या मनात आणि आपल्या दैवात जे आहे तेच होऊंदे.

शिवाजी : पंत, आपण या बाबतीत मुळीच जीवाला लावून घेऊ नका. आपण खाविंदाचे चाकर आहांत हे आम्ही जाणतो. धन्याचा जसा हुकूम होईल तसंच वागायला हवं आपणाला. यांत आम्ही आपणाला मुळीच दोष देणार नाही.

**कृ. भास्कर :** महाराज येतो आम्ही. आपलं रक्षण करायला मायभवानी सदैव खंबीर आहे.

**शिवाजी :** या पंत सुक्षेम असा (कृ. भास्कर जातात) पाहिलंस गर्जेराव खानाचं कृष्णकारस्थान ?

**सर्जेराव :** त्यानं कितीही कृष्णकारस्थानं रचण्याचा प्रयत्न केला तरी त्याची डाळ मुळीच शिजणार नाही. आम्ही एकापेक्षा एक धुरंधर शूरवीर आपल्या पाठीशी असताना तो हरामखोर हैवान काय करील आमचं ?

**शिवाजी :** आपल्यासारख्याचं पाठबळ असताना कोण घाबरतोय त्या शेळ-पट लांडग्याला. आम्ही तर भय भिती सारं काही सोडूनच दिलंय हल्ली. या गोष्टी बोलण्यातच वेळ निघून गेली. तानबा आत जावून त्या बाईला आम्ही बोलावतोय म्हणून सांगा. साऱ्या गडबड गोंधळात आम्हाला पुरतं बोलायलासुद्धा मिळाल नाही तिच्याशी. चल – – लवकर.

**तानबा :** जशी महाराजांची आज्ञा. ( आत जातो )

**सर्जेराव :** महाराज, त्या बाईची संपूर्ण व्यथा आपण सहानुभूतीन जाणून घ्यायला हवी.

**शिवाजी :** आम्ही कुणाशीही कृतघ्न होणार नाही सर्जेराव, ज्यानी जसं आम्हाला दिलं तसं आम्ही त्याना साभार परत करणारच. त्या बाईच्या ऋणाचं ओझं आमच्या मस्तकी आहे. आम्हाला तिची व्यथा नुसती ऐकून घ्यायची नाही तर त्या व्यथेला सहानुभूतीचा हात द्यायचा आहे. (आंतून कमल संतीणीच्याच वेषांत तानाजी सोबत प्र. क. )

**कमल :** ( पायाला हात लावून ) सकल मनकामना पूर्ण करणाऱ्या महाराष्ट्राच्या भावी राजराजेश्वरांच्या चरणी ही अभागिनी मानाचा मुजरा करीत आहे.

**शिवाजी :** (उठवीत) अखंड सौभाग्य लाभो तुम्हाला. तुमचे चुडे अक्षय्य टिकोत.

**कमल :** महाराज, आपण आशिर्वाद दिलात पण–

**शिवाजी :** आमच्या मुखातून जे आले ते आलं त्याला कधीही बाधा येणार नाही. पण बाई आपण असा प्रश्न का विचारलात आम्हाला ?

कमल : महाराज आपण माझी व्यथाच ऐकून घ्यावी.

शिवाजी : सांगा. आम्ही फार उत्सुक आहोत ऐकायला.

कमल : आम्ही चार माणसं विजापूरहून आपल्या आश्रयाला येत होतो, पण आमच्या दैवयोगानं आम्हाला वाटेत दगा दिला. लुटारूंच्या चकमकीत आमचा एक शूर इसम मारला गेला. आमची आणि आमच्या धन्याची ताटातूट झाली. लुटारूंना घाबरून ते आपला जीव घेऊन पळाले ... आणि मी त्या पश्चात्तापाने बैरागी बनले.

शिवाजी : सर्जेराव, म्हणजे आपण ज्या चौघाबद्दल बातमी आणली होतीत त्यापैकीच ही बाई दिसतेय.

सर्जेराव : आम्हालाही तीच शंका येतेय महाराज.

शिवाजी : बाई, आपल्या प्रारंभीच्या चार शब्दावरून आम्हाला आपल्या व्यथेची कल्पना आली. आमच्यासाठी आपलं दुःख विसरलांत. साक्षात मृत्यूच्या भयाण दाढेतून आपण आमची मुक्तता केलीत. आपले उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत आम्हाला पुनर्जन्म देवून आपण पुण्याच्या वाटेकरी झालांत. आपल्या रूपान जणु आई भवानीच आमच्या रक्षणासाठी धावून आली. बाई आपला धनी कुठे आहे. कसा आहे याची आम्ही खास हेर पाठवून चौकशी करू. आपण त्या विषयी मुळीच चिंता करु नये. ज्या मायेनं आपण आमचे पंचप्राण वाचविलेत त्याच मायेनं आपणाला इथं वागवणार आहोत.

कमल : महाराज, मला चैन पडणार नाही इथं. आपण मला मंगल आशीर्वाद द्या. मी निघते इथून.

शिवाजी : कुठं जाणार आहात आपण ?

कमल : दूर कुठे तरी—एकांतवासात,

शिवाजी : निदान चार दिवस तरी आपली पावलं इथं थांबू देत. वाटल्यास मग खुशाल चला एकांतवासात.

कमल : महाराज आपली इच्छा मोडता येत नाही मला. आपला आग्रहच झाला म्हणून मी चार दिवस राहीन इथं. नंतर मात्र मला प्रभूच्या सेवेसाठी एकांतवासात जावू दे.

शिवाजी : आम्ही आपल्या इच्छेविरुद्ध जाणार नाही, पण या घडीला आमच्या मनी एक महान इच्छा आहे. ती पूर्ण कराल का आपण ?

कमल : कोणती इच्छा आहे महाराजांच्या मनात ?

शिवाजी : पण ती पूर्ण कराल ना ?

कमल : महाराजांची कोणतीही इच्छा पूर्ण करायला मी सदैव तयार आहे.

शिवाजी : (पायाना हात लावून) वा वा ! धन्य – धन्य आहात तुम्ही !

कमल : अगबाई ! हे काय करताहा महाराज ? माझ्यासारख्या अभागिनीनं आपले चरण स्पर्शावे – पण आपण तर –

शिवाजी : आम्हाला आमचे पंचप्राण मिळवून दिल्याबद्दलची ही अंशतः फेड आहे त्या उपकारांची ! आपल्यासारख्या माऊलीच्या मंगल आशीर्वादानंच आमचं सदैव कल्याण होणारेय.

कमल : (उठवीत) उठा– महाराज, महाराष्ट्राची माय भवानी आपलं आणि आपल्या अलम मराठी रयतेच सदैव कल्याण करो.

● ●

# अंक ३ रा

## दृष्य १ ले

**स्थळ :** जंगलाचा परिसर. तारा एका आसनावर ध्यानस्थ बसली आहे.

**तारा :** ॐ नमः शिवाय– ॐ नमः शिवाय– ॐ नमः शिवाय ( नामस्मरण चालू असतानाच जाधवराव फकीराच्या वेषात प्र. क. )

**जाधवराव :** किती दिवस असा भटकत राहणारेय मी ? महाराष्ट्राच्या देवते अजून किती काळ दुःखाचा वणवा भडकत राहणारंय माझ्या जीवनात ? शिवरायाचा नावलौकिक ऐकून आम्ही त्यांच्या आश्रयाचा हव्यास धरला पण आमचं दैव आडवं आलं आणि आमच्या माणसांची होळी झाली. त्या प्रसंगाची आठवण आली की अजूनही नेत्रावाटे अश्रूंच्या धारा वाहू लागतात. निरोजींनी मरता मरता फोडलेला टाहो अजुनही ऐकू येतोय मला. बिचारा लढला प्राणाची पर्वा न धरता, पण अखेर स्वतःचे प्राण गमावून बसला. अरेरे ! देवा, असा प्रसंग वैऱ्यावर सुद्धां येवू नये ! तुझ्यासाठी मी कांही करूं शकलो नाही रे निरोजी,...कांही करूं शकलो नाही. तुम्हाला उभयतांच्या धगधगत्या चितेजवळ उभा राहून रडण्यापलीकडे या जाधवनं काही केलं नाही.

**तारा :** (मोठ्यानं) ॐ नमः शिवाय... ॐ नमः शिवाय ...

**जाधवराव :** कोण बरं असावी ही ? (पहात) ही त्यादिवशी मिळालेली ढोंगी संतीण तर नव्हे ना ? (जवळ जात) होय तीच ही ! आमच्या शिवरायांची कट्टर दुष्मन ! माझ्या या फकीरी वेषामुळे कदाचित प्रथम दर्शनी ही ओळखू शकणार नाही मला. पाहूया तरी ही काय करते ते ?

**तारा :** (उठत) कोण विचित्र आवाज करतोय माझ्या तपोभूमीवर ?

जाधवराव : (हात जोडीत) सकल मनोरथ पूर्ण करणाऱ्या तपस्विनी, हा दास आपल्या पदी लीन होवून प्रार्थना करतो आहे. आपल्यासारख्या थोर संताचा मंगल आशीर्वाद मला प्राप्त झाला तर फारच आनंद होईल. कृपा करून या दासोला आपल्या कृपाछत्राखाली अक्षय्य आश्रय द्यावा.

तारा : बेटा, तू असा कशानं आर्त झाला आहेस ? तू दुःखी होऊ नकोस, तुझी सर्व दुःखे आजपासून लयाला गेली असं समज. बोल –कोण आहेस तू ? आणि या घनघोर अरण्यात येण्याचं कारण काय ? जे काही असेल ते सत्य सांग. माझ्यासारख्या तपस्विनीशी प्रतारणा करशील तर रौरवाचा धनी होशील. बाल, कोण आहेस तू ?

जाधवराव : आपल्यासारख्या वैराग्यपूर्ण तपस्विनीशी मी काय म्हणून प्रतारणा करीन ? नाही – माझ्या हातून असला प्रमाद कधीही घडणार नाही.

तारा : ठीक आहे, मग सांग बेटा असं कोणतं संकट आलंय तुझ्यावर ?

जाधवराव : सारं काही सांगतो मी आपल्याला. एक अक्षरही लपवून ठवणार नाही मी आपल्यापासून. मी विजापूरचा एक गरिब नागरीक. विजापूरकर बादशहाचा पिढीजात नोकर, आमच्या घराण्यावर हजरतीची फार मर्जी, पण सध्याचा काळ आम्हाला चांगला नाही. विजापुरात सगळाच कारभार विचित्र चाललाय. दिवसे दिवस हिंदूंचा छळ करण्याकडे सगळ्यांची प्रवृत्ती वळली आहे. पिढीजाद नोकरांच्या जागी मुसलमानांची भरती चालली आहे. आणि मराठ्यांचा जेवढा फजितवाडा करता येईल तेवढा करण्याचा प्रत्येकाने जणू चंगच बांधला आहे. मला बादशहांची ही करणी आवडेना, म्हणून मी विजापुरचा त्याग करून इकडे अशा या फकीराच्या सोंगात वणवण फिरतोय. काही झालं तरी पुन्हा त्या घातकी बादशहाचे पाय धरायला जाणार नाही.

तारा : अस्सं ! म्हणजे तू विजापूरकर बादशहाचा नोकर आहेस तर ! पण कायरे बेटया, ज्याचं अन्न खावून एवढा मोठा झालास त्याच्याशी, अशी प्रतारणा करतोस ?

जाधवराव : तपस्विनी अन्नदाताच जर कृतघ्न निघाला तर काय उपयोग त्याचा ? आमच्या आया-बहिणीवर दिवसाढवळ्या पाशवी अत्याचार होत असताना, आम्ही अन्नदात्याशी एकनिष्ठ रहायचं ?

तारा : अरे पण असं करणं बर नव्हे. दुसऱ्यानं गाय मारली म्हणून आपण वासरू मारू नये. जरा विचार करायला हवा होतास तू...

जाधवराव : मला असला मिंधेपणा पत्करून राहायचं नाही बादशहाकडे. त्यापेक्षा दारोदार भिक्षा मागणं काय वाईट ? एकदा कुठल्याही गोष्टीचा त्याग केला की, पुन्हा तिचा स्वीकार करणं आम्हां मराठ्याना मुळीच जमणार नाही. आम्ही एकवेळ मोडू पण वाकणार नाही.

तारा : अरे पण या आपत्काळी कोण संरक्षण देईल तुला ?

जाधवराव : इकडच्या प्रांतात शिवाजी महाराज गोरगरिबांच्या रक्षणासाठी रात्रंदिवस तळमळत असतो. असं ऐकलंय मी. तेव्हा अशा या संकट वेळी त्यांचाच आश्रय घेतलेला बरा.

तारा : ( कुत्सितपणे ) वारे शिवाजीच्या कैवाऱ्या ! गोरगरिबांचा रक्षणकर्ता म्हणे ! हं– तो कसलं करणारेय गरिबांच रक्षण ? स्वतःच्या मालकाशी निमकहरामी करून– त्याची कुळी वाचून–इथल्या हरामखोर दगलबाज हैवानाचे पाय चाटायला तयार झालास ? अरे–निर्लज्जा–असा अविचार करूं नकोस.

जाधवराव : असं कां म्हणताहा आपण ? शिवाजीच्या नांवलौकिकाविषयी आपणांस काही माहिती नाही असं वाटतं.

तारा : अरे बेटचा, जेवढी तुला त्याची माहिती नाही तेवढी मला आहे. मी त्रिकालज्ञानी तपस्विनी आहे. स्वतःला गोब्राम्हण प्रतिपालक म्हणवून घेणाऱ्या त्या बडखोर शिवाजीला मी पुरती ओळखून आहे.

जाधवराव : हां खबरदार- आमच्या शिवरायांविरुद्ध एकही शब्द उच्चाराल तर ! तपस्विनीच्या नकली बुरख्याखाली दडलेलं आपलं रूप चांगलं परिचयाचं आहे माझ्या.

तारा : काय म्हणालास ? माझं रूप तुझ्या परिचयाचं आहे ? स्वप्नातल्या गोष्टी तर सांगत नाहीस ना तू ?

जाधवराव : तपस्विनी बाई, स्वप्नांतल्या गोष्टी नाही सांगत मी. माझ्या चेहऱ्याकडे जरा निरखून बघा, मिळतेय का माझी ओळख ?

तारा : नाही.

जाधवराव : मागे काही दिवसांपूर्वी मी, माझी बायको, आणि माझा एक मित्र या ठिकाणी आलो होतो. काही क्षणातच नंतर या जागेला रणांगणाचं रूप आलेलं होतं. अचानक गिधाडागत आलेल्या शत्रूच्या समशेरीला माझा मित्र हकनाक बळी गेला होता. आठवताहेत आपणाला या गोष्टी ?

तारा : अं... होय – आता पटली तुझी ओळख. अरे तुझ्या या फकीरी वेषात ओळखलंच नाही मी तुला. पण बेटचा असा फकीरी वेषात का फिरतोहेस तू ?

जाधवराव : वेष करून फिरणं आणि प्रत्यक्ष हलाखीचं जीवन जगणं यात पुष्कळ अंतर असतं तपस्विनीबाई. मी मुद्दाम फकीर बनलो नाही तर नशीबानंच मला फकीर बनवलाय.

तारा : म्हणजे तुझ्या बोलण्याचा अर्थ तरी काय ?

जाधवराव मागे त्या दुष्ट हल्लेखोरानी केलेल्या पाशवी हल्ल्यांत माझी बायको सांपडली असावी असा माझा अंदाज आहे. हल्ला झाल्यानंतर मी काही वेळाने शुद्धीवर आलो तर माझी बायको आसपास कुठेही दिसत नव्हती. इथून आम्ही गेल्यानंतर कनातीपाशी त्यानी आमच्यावर हल्ला केला होता. त्या दिवसापासून मी माझ्या कमलेच्या शोधार्थ रानोमाळ भटकतोय, पण अजूनपर्यंत माझी कमल मला सांपडली नाही

तारा : बेटा, तू इतकं मन मोकळं करून हकीगत सांगतो आहेस हे पाहून आमचा आत्मा संतुष्ट झाला. इतक्या संकटातून तुला त्या शंकराने ज्याअर्थी सुखरूप ठेवला त्याअर्थी तुझ्या हातून काही ना काही तरी त्याला करून घ्यायचं आहे. बर, आता तू मला सांग, तुझी बायको कशी काय होत' दिसायला ?

जाधवराव . तिचं वर्णन करून काय उपयोग होणारेय आता ? ती या जगात जिवंतच नसणार ! त्या हरामखोर कामांध राक्षसानी तिच्यावर अमानुष अत्याचार करून तिला ठार मारली असणार. ती वीराची वीरांगना होती पण आता काय उपयोग त्यागोष्टीचा ?

तारा : बेटचा, अरे ती वीरपत्नी या संग्रामातून जिवंत राहिली नसेल

कशावरून ! उगाच तिचा अंत झाला असं म्हणण्यात काय अर्थ आहे ? मला वाटतं ती अजूनही कुठे तरी जिवंत असणार.

जाधवराव : नाही मला नाही हे खरं वाटत.

तारा : अरे ती तुझ्या शोधासाठी हिंडत नसेल कशावरून ? आणि हिंडून हिंडून तुझा शोध लागला नाही म्हणून तूंही जीवंत नाहीस अस समजून तिने दुसरा काही विचार केला नसेल कशावरून ?

जाधवराव : दुसरा काही विचार ? नाही– दुसरा विचार ती मुळीच करणार नाही. मी जीवंत नाही असं समजून आपलेही प्राण गमवील ती; पण जिवंत राहून शत्रूच्या हाती सांपडणार नाही.

तारा : अरे प्राण देणं एवढं जर का सोपं असतं, तर जगांत एकही विधवा राहिली नसती. एकसुद्धा पुत्रशोकानं होरपळलेली आई राहिली नसती, अरे शोक हा तेवढ्याच वेळेपुरता असतो, परंतु थोडा काळ गेला की आपला प्राण कसा वांचेल याचीच तजवीज करीत असतो माणूस.

जाधवराव : म्हणजे आपणाला म्हणायचंय तरी काय ?

तारा : मी सांगितलेलं ऐकशील तर बेटया साऱ्या अंगाचा तिळपापड होईल तुझ्या. अरे ज्याला तू गरिबांचा कैवारी म्हणून ओळखतोस त्याच सैतानाच्या पदरी तुझी बायको लाचारीनं दिवस कंठीत आहे. कदाचित एव्हाना त्या हैवानानं तिची अब्रू देखिल लुटली असेल.

जाधवराव : ( आवेगाने ) काय ? काय ऐकतोय मी हे ? माझी कमल शिवाजीनं लुटली ? नाही – नाही हे खोटं आहे. धादांत खोटं आहे.

तारा : त्या सैतानाच्या मगरमिठीतून तुझ्या बायकोला सोडवायची धमक तुझ्यात नाही, म्हणूनच तू हे सर्व खोटं म्हणतोहेस, पण मूर्खा जर सांबाचा अवतार घेऊन राहशील तर हकनाक फसशील. तुझ्या बायकोचं शील तुला राखायचं असेल तर हाती समशेर घे आणि विचार जाब त्या निमकहरामाला.

जाधवराव : अरेरे ! शेवटी ज्याच्या आश्रयाची आस धरली व विजापूर सोडून इकडे आलो त्या सैतानाच्या हृदयात शेवटी अवसेचा निबिड अंधःकारच दिसला मला. असं होईल याची स्वप्नांत देखील कल्पना नव्हती.

तारा : बेटा– दिसतं तसं नसतं या जगांत. माझं खोटं वाटत असेल तर स्वतः जावून खात्री करून घे.

**जाधवराव :** ठीक आहे. सत्य सांगून मला मार्ग दाखविल्याबद्दल अत्यंत ऋणी आहे मी आपला. येतो मी आता. या जाधवरावाच्या मनी एकच निर्धार. शिवाजीचा सूड ( जातो )

**तारा :** ( हंसून ) दुष्ट कमले. संतीणीचं रूप घेऊन माझ्या कारस्थानावर विश्वासघाताचं झाकण घातलंस काय ? आतां पाहा कशी ठिणगी उठते ती-कैलासनाथा– श्री शंकरा- यांत तरी तू मला सुयश दे

॥ पद ॥

श्रीशंकरा गिरीजावरा
रुद्रेश्वरा करुणाकरा ॥ धृ ॥
वृषभारुढा कमलेश्वरा
अरि हंतका अंबा वरा ॥ १ ॥

## दृष्य २ रे

**स्थळ :** रस्ता, मीर गुलाम प्र. क.

**मीर गुलाम :** या अल्ला ! या परवर दिगा ! त्या दिवशी हातचं पाखरू सुटलं. तो सर्जेराव मरगठ्ठा जर आला नसता, तर त्या खुबसुरत बिजलीची मला प्राप्ती झाली असती. लेकिन आमचं कंबख्त सालं फुटकं म्हणायचं (पाहात) हा कोण बरं येतोय या बाजूनं ? मला वाटतं हा नक्कीच त्या सेवाजीचा जासूद असावा. पाहूया तरी काय म्हणतोय ते. (बाजुला होतो)

**जाधवराव :** (प्र. क.) हा कोण बरं ? (पुढे येवून) काय रे बाबा, कोण आहेस तू ?

**मीर गुलाम :** क्यो ? मेरे पास क्या काम है तुम्हारा ? मी असेनाका कोणी ? तुला काय करायचंय ?

**जाधवराव :** अरे असा रागावतोस का माझ्यावर ?

**मीर गुलाम :** अरे बाबा मी तुझ्यावर नाही रागवत... माझ्याच नशीबावर कावतोय मी !

जाधवराव : नशीबावर ?
मीर गुलाम : होय –होय– होय – तुला कशाला हव्याहेत चांभार चौकशा ?
जाधवराव : रागावू नकोस .. तू तुझी ओळख करून देशील तर – मी माझी ओळख देईन तुला
मीर गुलाम : माझी ओळख काढून क्या करना चाहते है तुम ?
जाधवराव : तुझ्या नशीबांतले काही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीन मी.
मीर गुलाम : तो तुम ज्योतिषी है क्या ?
जाधवराव : छे छे ! मी ज्योतिषी नाही सध्या माझंच ज्योतीष कुणी सांगितलं तर फार बरं वाटेल मला.
मीर गुलाम : अरे मग तूं काय सोडविणारेस माझे प्रश्न ? तूसुद्धां माझ्यासारखाच झपाटलेला दिसतोहेस.
जाधवराव : दोस्त–माझ्या डोक्यात सध्या हजारो विचारांचं थैमान चाललं आहे.
मीर गुलाम : लेकिन तुम कहो तो सही–ऐकूया तरी तुझी हालत.
जाधवराव : प्रथम तू कोण आहेस ते सांग मला.
मीर गुलाम : अरे यार–मैं अफजुलखान साहेबका वडा सरदार हूँ. मेरा नाम मीर गुलाम है– समझे ?
जाधवराव : असं! म्हणजे तू खानाचा माणूस आहेस, पण काय रे मीर गुलाम, तो अफजूलखान इकडे का आलाय विजापूर सोडून ?
मीर गुलाम : यह बात पुछना मनाई है बाबूजी. तुला कशाला हव्याहेत या गोष्टी ? तू सेवाजीचा हेर तर नाहीस ना ?
जाधवराव : नाही-मीर गुलाम, मी कुणाचाही हेर नाही. शिवाजीच्या आश्रयाला म्हणून आलो होतो पण-
मीर गुलाम : कहो-कहो-यार फीर क्या हुआ ?
जाधवराव : ज्याला मी गोरगरिबांचा कैवारी म्हणून समजत होतो तो एवढा सैतान असेल याची खात्री नव्हती मला.
मीर गुलाम : म्हणजे तुझ्या बोलण्याचा अर्थ तरी काय समजावा ?
जाधवराव : दोस्त सारं सांगतो तुला. आता मला असं वाटायला लागलंय की विजापूरच्या हजरतीचीच सेवा करून राहिलो असतो तर बरं झालं

असतं. कुठली झक्मारली आणि या शिवाजीच्या आश्रयाची आशा धरली. मित्रापरी मित्राला मुकलो. बिचाऱ्याची बायकोही सती गेली. आणि मी तर स्वत:च्या बायकोलाही अंतरलो. या शिवाजीच्या राज्यात यावं आणि जीवनाची अशी शोचनीय स्थिती व्हावी. गोरगरिबांच्या रक्षणासाठी धांवून जाणारा शिवाजी असलं नीच कृत्य करील याची स्वप्नातही कल्पना नव्हती मला.

**मीर गुलाम :** क्या किया सिवाजीने ?

**जाधवराव :** त्यानं माझ्या कमलला भ्रष्ट केली, पण तो नीच माझ्या हातून आतां मूळीच जिवंत सुटणार नाही.

**मीर गुलाम :** पाहिलीस ना सेवाजीची प्रतिष्ठा ? अरे यार, उगाच नाहीं बादशहाच्या दरबारी पैंजेचा विडा उचललाय खाविंदानी ! आता एकदा त्याच्या मुसक्या बांधल्या की नीट वठणीवर येईल तो. एक दिन ऐसा आयेगा कि उस दिनमे वह बंडखोर सेवाजीकी लाश हमारे सामने नजरा आयेगी.

**जाधवराव :** ज्यानं माझ्या कमलच्या अब्रूवर दरवडा घातला त्याला कुत्र्याच्या मौतीनंच ठार मारलं पाहिजे.

**सर्जेराव :** (प्र. क.) हा– खबरदार, हरामखोर माणसा. कुणाच्या नाशाचे घाट रचतोहेस ?

**जाधवराव :** ज्यानं आमच्या सर्व नाशासाठी पाऊल उचललंय आणि जो स्वत:ला सज्जनाचा पुतळा समजतोय त्या हरामखोर शिवाजीचा नायनाट करणारेय मी.

**सर्जेराव :** गोब्राम्हण प्रतिपालक असा ज्याचा नांवलौकिक,साऱ्या महाराष्ट्रांत चंदनाच्या सुगंधाप्रमाणे दरवळतोय, त्या हिंदूपदपादशाहीच्या भावी राजानं तुझ्या नाशासाठी पाऊल उचललंय ? तुला वेड तर लागलं नाही ना ? लक्षांत ठेव. पुन्हां जर का महाराजांविरुद्ध बोलशील तर कसलाही विचार न करतां समशेरीच्या एकाच वारानं जीभ मुळासह छाटली जाईल.

**जाधवराव :** ही मर्दाची अवलाद मरणाला घाबरून कधीच माघार घेणार नाही. ज्याच्या नांवलौकिकतेचा सुगंध चौफेर दरवळतोय त्याच नीच माणसानं माझ्या खानदानी घराण्याची अब्रू लुटली आहे.

सर्जेराव : काय असेल ते स्पष्ट बोल. उगाच पराचा कावळा करून महाराजाविरुद्ध वेडेवाकडे शद्व उच्चारू नकोस.

जाधवराव : अरे जारे महाराजाच्या कैवाऱ्या, कोण घाबरतोय तुझ्या महाराजाना आणि तुलाही. त्याला जर स्वतःच्या थोरवीची किमत कळती तर तो असा दुसऱ्यांच्या बायकांची अब्रू लुटायला तयार झाला नसता, ज्याला आम्ही चंदनाचं झाड म्हणून मिठी मारायला गेलो, ते झाड चंदनाचं नसून विषारी आहे याची कल्पना आली नाही आम्हाला.

सर्जेराव : तुझ्या बोलण्याचा अर्थ अजूनही ध्यानी आला नाही माझ्या.

मीर गुलाम : कहो यार– सब कुछ बताओ उसको.

सर्जेराव : मला वाटतं आपण दोघेही महाराजाविरुद्ध कसला तरी अघोरी डाव रचताहा. पण ध्यानी ठेवा, महाराजाविरुद्ध खेळणं तेवढं सोपं नाही.

जाधवराव : आम्ही काही बांगडया भरल्या नाहीत आमच्या हातात.आम्हाला सुद्धा ताकद आहे त्याच्याशी मुकाबला करायची. ज्यानं माझ्या कमलचं शील भ्रष्ट केलंय त्याला कुत्र्याच्या मौतीनंच ठार मारणारेय मी.

सर्जेराव : ही कमल कोण ?

जाधवराव : माझी धर्मपत्नी

सर्जेराव : (कानावर हात ठेवीत) हर ! हर ! काय हा आरोप ? तुझ्या धर्मपत्नीचं शील महाराजानी भ्रष्ट केलंय ?

जाधवराव : होय......

सर्जेराव : शिव शिव ! अरे ही बातमी दिली तरी कुणी तुला ? महाराजाना जर ही गोष्ट कळेल तर देहाच्या चिंध्या लोंबतील तुझ्या. बोललास तेवढं फार झालं, पण यापुढे तरी स्वतःच्या जीभेला लगाम घाल. आणि एक गोष्ट चांगली ध्यानांत ठेव की महाराज कोणत्याही परस्त्रीला आपल्या मातोश्रीसमान मानतात. मग ती स्त्री तरुण असो अथवा सधवा-विधवा असो.

जाधवराव : अरे उगाच कां म्हणून तू स्तुती करतोहेस त्या विश्वासघातकी शिवाजीची ? तू त्याचा नोकर आहेस वाटतं– म्हणूनच त्याच्याविरूद्ध बोललेलं सहन होत नाही तुला.

सर्जेराव : मी त्यांचा नोकर असली तरी त्यांच्या सद्गुणाबद्दल योग्य तेच बोलेन. महाराजाशी बेईमान होणं म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराशीच प्रतारणा केल्यासारखं होईल.

जाधवराव : अस्सं ! म्हणजे हे सारं ऐकूनसुद्धा मी गप्प बसू ? वारे तुझ्या अकलेची ! अरे जसा राजा तशी त्याची प्रजा !

सर्जेराव : उगाच भलतं सलतं बोलून वादंग माजवू नकोस. कुणा तरी दुष्टानं ... महाराजांच्या हाडवैऱ्यानं – खोटं नाटं सांगून कान भरवले आहेत तुझे, पण कोणतीही गोष्ट आपण स्वतःच्या डोळ्यानी पाहूनच खरी अथवा खोटी ठरवावी. जोपर्यंत तू ही गोष्ट प्रत्यक्ष पाहूं शकत नाहीस तोपर्यंत महाराजाविरुद्ध एकही घृणास्पद अक्षर मुखावाटे बाहेर काढूं नकोस. तू जे ऐकलं आहेस ते सर्व खोटं आहे. त्याच्या मागे सत्याचा लवलेशही नाही. माझ्या सांगण्यावर तुझा विश्वास असेल तर मी सांगतो ते ऐक, तुझी धर्मपत्नी महाराजांच्या दरबारी सुक्षेम आहे. तिला आई भवानीच्या मोलानं मानताहेत महाराज. जिनं महाराजांचे प्राण वांचविले त्या साध्वीच्या अब्रूवर ते दरवडा घालतील असं वाटतंय का तुला ?

जाधवराव : म्हणजे मी सत्य धरायचं तरी कुणाचं ?

मीर गुलाम : अरे यार,या मरगठ्ठ्याच काय ऐकत राहिलाहेस तुं? वहाँ जाके खुद अपने आँखोसे देखो, और बात फैसला करो. उसके उपर हम कैसे यकीन रखेंगे ?

सर्जेराव : खात्रीच करायची असेल तर स्वतःच महाराजांची भेट घेणं योग्य आहे.

जाधवराव : ठीक आहे ! चल तर आत्तांच्या आत्तांच त्यांची भेट घेऊन सत्यासत्यतेची खात्री करूया.

सर्जेराव : चल-शुभश्च शीघ्रम्–(दोघेही जातात. मीर गुलामही जातो.)

## दृष्य ३ रे

स्थळ : खानाचा शामियाना.

कृ. भास्कर : खाविंद आपण समजता तेवढा शिवाजी भोळा-भाबडा नाही.

अफझुल : क्या कहा ? सिवाजी भोळा नाही ? त्या हरामखोराला एवढा धूर्त समजता की काय ?

कृ. भास्कर : खाविंद, जास्त बोलतो त्याबद्दल माफी असावी. आपली समजूत अगदी दूर करा. तो फार धूर्त धोरणी आहे याची खात्री बाळगा.

अफजुल : खामोष ! आप वह निमकहरामकी तारीफ क्यो कर रहा है ? तो धूर्त अगर धाडसी असो, आम्ही त्याला ठोकरून आमचं काम फत्तेह करणार याची जाणीव ठेवा. तो बंडखोर पळून जाईल तरी कुठे ? हम भी कुछ कम नही वकीलजी. तो जिथं जाईल तिथून त्याच्या मुसक्या बांधून आम्ही विजापूरी उभा करू त्याला.

कृ. भास्कर : खाविंद, शिवाजी म्हणतोय की आपण विजापूरच्या तख्ताचे पिढीजात नोकर आहोत, आणि आपण तसेच राहूं; पण विजापूरला काही येणार नाही. तह-करार नामा जे कांही करून घ्यायचं असेल त्याला आम्ही सदैव तयार आहो, पण जे व्हायचे ते आमच्या गोटात व्हायला हवे. खानसाहेव घालतील त्या अटी आम्ही मान्य करू, पण या घडीला मात्र विजापुरी बिलकूल येणार नाही.

अफझुल : वकीलजी, हे तर तुम्ही आम्हाला कित्येक वेळा सांगत आहात, आणि ती त्याची अट आम्ही तुमच्या आग्रहावरून मान्यही केली होती. लेकिन आता त्यातलं आम्ही काहीही मान्य करणार नाही. आमचं ध्येय एकच आणि ते म्हणजे त्याला कोणत्याही परिस्थितीत गिरफदार करणे.

कृ. भास्कर : खाविंद, ज्या कारणामुळे एखादा त्याला फार धूर्त कावेबाज म्हणेल, त्याच कारणानी आपण तो कांही असावा तेवढा धूर्त कावेबाज नाही असं म्हणता यावरुन आम्ही तरी जास्त काय बोलावं ?

अफजुल : (हसून) आपल्या बोलण्याचा अर्थ तरी काय वकिलजी ? आमच्या लष्कराला फूस लावून आपल्या हद्दीत नेवून का तो काफर हैवान आम्हाला जेरीस आणणार आहे? निदान या गोष्टी मला तरी पटत नाहीत वकीलजी. आमचे लष्कर एवढे मोठे आहे याची कल्पना त्याला असताना तो आपला जीव नाहक धोक्याच्या भयाण गर्तेत मुळीच घालणार नाही. एवढा जर तो शहाणा असला तर आमचं चांगलंच काम झालं म्हणायचं ! आपोआपच तो आमच्या हाती आला तर नको का झालाय आम्हाला ?

**कृ. भास्कर :** खाविंद, आपलं लष्कर फार मोठं आहे हे अमान्य करीत नाही आम्ही, पण एवढं मोठं सैन्य तिकडे नेणार कसं ? आणि ठेवणार तरी कुठे ? त्यापेक्षा खाविंदांनी निवडक सैन्यानिशीच त्याच्या भेटीला जावे. आपलं लष्कर मोठं अवाढव्य आहे हे पाहताच तो भिवून पळून जाईल आणि आपला सारा डाव धुळीला मिळेल. मी शिवाजीला असं सांगितलंय की खाविंद ज्या गोष्टी कबूल करतील त्याप्रमाणे वागायला कधीही माघार घेणार नाहीत, पण वेळ वख्त आहे. कोणत्या वेळी तुमचा मनसुबा कसा होईल याचा नेम नाही, म्हणून आमचे सैन्य आमच्यापासून कोठे तरी जवळपास पाहिजे. दोन चार कोसापर्यन्त आम्ही येवून ठेपलो म्हणजे मग आम्ही लष्कर तेथेच ठेवून देवू पुढे आणणार नाही खाविंद, आपण आता याहीपेक्षा मोठ्या अटी घालू लागला किंवा भेटीच्या जागेपर्यंत आपली, शिबंदी नेतो म्हणाला तर त्याच्या पोटात संशय उत्पन्न होईल.

**अफझुल :** या गोष्टी कुणासमोर बोलताहा आपण वकिलजी ? तो आता आमच्या हातून सुटून जायला त्याची प्रत्यक्ष भवानी माता उतरली पाहिजे. (याचवेळी कोपऱ्यात प्रखर प्रकाश पडतो व तिथं भवानी माता प्रगट होते तिला पाहून खान दचकतो.) वकीलजी, वकीलजी, ये क्या.

**भवानी :** दुष्टा ज्याचा तू, घात करायचा विचार करतोहेस त्या महाराष्ट्राच्या भावी राजाची कुलदेवता आहे मी.

**अफझुल :** कौन ? वह काफर सेवाजीकी कुलदेवता ? (हसतो)

**भवानी :** तो पहा शिवाजी आला. (दुसऱ्या बाजुच्या प्रखर प्रकाशांत शिवाजी दिसतो. खान त्याच्यावर तलवार उपसून धावतो) अरे तिकडे कुठं धांवतोहेस ? हा पहा इकडे. (खान दुसऱ्या दिशेला पाहतो पुन्हा शिवाजी दिसतो—तिकडे धावणार तेवढ्यात तो अदृश्य होतो ) अरे हा पहा इकडे, ( खान इकडे धांवताच भवानी तिकडे म्हणते आणि तिकडे धांवताच इकडे म्हणते. खान भांबावून जातो. शेवटी भवानीवरच वार करायला धावतो, एवढ्यात तीही अदृश्य होते) कहाँ है वह दगलबाज सेवाजीकी कुलदेवता ? कहाँ है ?— कहाँ है ? (क्षणभर थांबून) कहाँ है वो मग्रूर सैतान सेवाजी ? (भासात्मक प्रसंग संपताच खान भानावर येतो. डोळे चूरगळून इकडे तिकडे

पाहतो) वकीलजी क्या देखा मैंने ? बाहेर एवढा कडेकोट बंदोबस्त असताना तो काफर हैवान और त्याची ती कुलदेवता आली तरी कुठून ?

कृ. भास्कर : खाविंद, कुठं कोण आहे ? कदाचित आपणास तसा भास झाला असेल.

अफजुल : नही- नही वकीलजी ... आता इथं सेवाजी येवून गेला.

कृ. भास्कर : नाही खाविंद... हे शक्य तरी आहे का ? बाहेर कडेकोट पाहारा असताना शिवाजी तसा सहजा सहजी आंत येणं फार अशक्य आहे.

अफजुल : म्हणजे मला तसा भासच झाला म्हणतां वकीलजी ?

कृ. भास्कर : होय खाविंद.

अफझुल : मला वाटलं तो प्रत्यक्षच आला की काय ? लेकिन वकीलजी आम्ही त्याला चारही दिशानी नक्की गाठणार. तो गरिबीनं आम्हाला शरण आला तरी त्याच्या मुसक्या बांधून विजापुरात घेवून जाणार. त्याला शिक्षा व्हावी की पुन्हा सोडून द्यावा ते हजरतीच्या मर्जीवर अवलंबून राहील. आम्ही फक्त त्याला गिरफदार करून नेण्याचे जबाबदार. आम्ही वाटेल तेवढे सैन्य आमच्या बरोबर नेण्यास मुख्त्यार आहो. दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायची सवय नाही आम्हाला.

कृ. भास्कर : खाविंद, आपण सुज्ञ आहात, निदान मी काय म्हणतोय ते तरी ऐकून घ्या.

अफजुल : बोलो,

कृ. भास्कर : तो जे जे म्हणेल ते ते कबुल करुन त्याच्याच कलाने वागणे निदान या घडीला तरी योग्य आहे. आपण जाताना थोडंच सैन्य न्यावं· कुणीकडून त्याची व आपली एकदा मुलाखत होऊं द्या. मग आपणास जे करायचे असेल ते करण्यास आपण मोकळे आहोत. त्यास एकदम धाक घालून किंवा भिती दाखवून मुळीच जमणार नाही. या उपर आपला काय विचार असेल तो खरा.

अफजुल : नही- नही ऐसा हरगीज नही होगा. आम्ही आमचं सारं लष्कर घेऊनच त्या हरामखोराच्या भेटीला जाणार आहो. अमूक लोक आणू

नयेत, अमूक लोकांनिशीच यावे यात आम्हाला त्या निमकहरामाचा कावा दिसतो.

कृ. भास्कर : कावा ? नाही खाविंद, तो आपल्या येण्यानं फार भ्यालेला असताना कावा मुळीच करणार नाही. तो जर आपणाला भ्याला नसता तर आपल्या स्वागताची त्याने एवढी शाही तयारी चालू ठेवली असती का ? आडरानातून रस्ता काढण्याचे श्रम त्याने मुळीच घेतले नसते.

अफजुल : वकीलजी, आपण म्हणतात त्या गोष्टी खऱ्या वाटतात; लेकिन आमच्या मनांत असं येतंय की, युक्त्या वगैरे करण्याच्या भानगडीत पडू नये. धरावा की चोपावा. आजपर्यंत त्याच्या फसव्या कारस्थानामुळे तो सैतान आमच्या डोक्यावर बसला, नपेक्षा त्याचा आम्ही कधीच नायनाट केला असता.

कृ. भास्कर : खाविंद, आपल्यासमोर जास्त बोलतो याबद्दल माफी असावी. माझी समजूत आपल्या अगदी विरूद्ध आहे. आजपर्यंत त्याच्या कारस्थानाना तशाच प्रयुक्त्यानी लढा द्यायला हवा होता. तसं झालं नाही म्हणूनच असा प्रसंग आला. नपेक्षा शिवाजी एवढा बळावला नसता. काव्याला कावा साधून ज्या गोष्टी व्हायला हव्या होत्या त्या मुळीच झाल्या नाहीत, निदान यावेळी तरी खाविंदांनी सावधच राहायला हव.

अफझुल : वकीलजी, एवढा वेळ आम्ही आपलं बोलणं ऐकून घेतलं, आणि पूर्ण विचारांती आम्ही आमचा विचार नक्की केलाय. आपण म्हणता त्याप्रमाणे आपल्यावर विश्वास ठेवून आम्ही ठराविक लष्करानिशीच त्याची भेट घेवू.

कृ. भास्कर : अशानंच आपण यातून सुखानं मार्ग काढू शकाल.

अफझुल : ठीक आहे ! आपल्या शब्दाबाहेर आम्ही आता मुळीच जाणार नाही. लेकिन जर का त्या बंडखोरानं दगलबाजी किंवा एखादा कपटी कावा रचण्याचा प्रयत्न केला, तर तो आमच्या समशेरीला बळी पडलाच म्हणून समजा त्याला कंठस्नान घालूनच आम्ही आमची समशेर म्यान करू

# दृष्य ४ थे

स्थळ– प्रतापगडावरील शिवाजीची बैठकीची जागा. शिवाजी गंभीरपणे येरझारा घालीत आहे. इतक्यात बाहेरून सर्जेराव जाधवरावाला सोबत घेऊन प्र. क.

शिवाजी : सर्जेराव, कुणाला घेऊन आलांत सोबत ?

सर्जेराव : महाराज, या माणसाची एक महाभयंकर तक्रार आहे–आपल्या–जवळ.

शिवाजी : आमच्या जवळ.

जाधवराव : हो– हो– तुमच्या जवळ.

शिवाजी : आपण कोण कुठले... आणि अशी महाभयंकर तक्रार तरी कोणती आहे आपली ?

जाधवराव : माझी कमल कुठं आहे. ?

शिवाजी : तुमची कमल ?

सर्जेराव : महाराज, आता थोडंस माझं ऐकून घ्या. हा इसम विजापुराहून आलेला आहे. मागे आपल्या कानी मी एक गोष्ट घातली होती की खानाच्या दुष्ट माणसानी एका वीराला ठार मारलं आणि एक जोडपं एकमेकांपासून भिन्न दिशाना पळून गेलेल्यापैकी जो जाधवराव नांवाचा मराठा गडी होता तो हाच आणि याची बायको कमल म्हणजेच आपल्याकडे असलेली ती संतीण.

शिवाजी : ती संतीण यांची धर्मपत्नी आहे का ? व्वा व्वा ! काय दैवयोग असतात माणसाचे ! जाधवराव आपण निर्धास्त असा. आपली धर्मपत्नी कमलाबाई आमच्या आश्रयाला सुखरूप आहे सर्जेराव आंत जावून तिला घेऊन या.

जाधवराव : आश्रयाच्या बुरख्याखाली तिच्या शिलावर दरवडा घालून तिला भ्रष्ट केलीत – आणि आता साळसूदपणाचा आव मिरवायला लाज नाही वाटत ?

शिवाजी : हां– खबरदार जाधव, जिभेला लगाम घालून बोला. कुणी कुणाच्या शिलावर दरोडा घातला म्हणताहां ? जे बोलायचे असेल ते नीट शांततेने बोला. उगाच ओढून धराल तर परिणाम फार वाईट होईल.

सर्जेराव : जाधवराव, आता तरी आपली खात्री झाली कीं नाही ?

शिवाजी :सर्जेराव, आम्हाला एकतर्फी निकाल द्यायचा नाही. चला त्या बाईला बोलावून आणा. ( जातो )

जाधवराव : मला वाटतं त्या ढोंगी तपस्वीनीनंच माझी दिशाभूल केली असावी. शिवाजी महाराज असलं नीच कृत्य करणार नाहीत याची खात्री आहे मला. नक्कीच हा घोटाळा त्या अबदसेनं केला असणार ! ( सर्जेराव कमलसह प्र. क )

शिवाजी : जाधवराव, ही पहा आपली धर्मपत्नी. हिलाच विचारा काय विचारायचं आहे ते.

जाधवराव : ( गहिवरून ) महाराज ... मी आपला नाहक संशय घेतला. उण–अधिक बोलून आपल्या प्रतिष्ठेची अवहेलना केल्याबद्दल महाराजानी एकदार या पायिच्या पायिकाला क्षमा करावी (पाय धरतो) आजपासून जन्म असेतोवर या पायाचीच सेवा करून राहणारंय मी.

शिवाजी : (उठवीत) उठा जाधवराव, झाल्या गोष्टीबद्दल आम्ही आपणाला क्षमा केली आहे. अजूनही आपणाला खात्री करून द्यायची असेल तर जरूर विचारा आपल्या धर्मपत्नीला.

जाधवराव : नाही – नाही महाराज, आता कुणालाही काही विचारणार नाही मी. दुसऱ्याच्या सांगणीनं मी माझ्या भवितव्यालाच आग लावायला निघालो होतो, पण आपणच माझ्या भवितव्याचं सुकाणू योग्य दिशेला वळविलत. कमल, माझ्या प्राणदेवते तुझ्या भेटीचा मंगल क्षण प्रत्यक्ष शिवप्रभूच्या समोर यईल याची स्वप्नातही कल्पना नव्हती मला, पण कमल, तू हा बैरागिणीचा वेष का धारण केलास ?

कमल : प्राणनाथ बदलत्या प्रसंगानुरुप माणसालाही बदलावं लागतं. मी जर हा संतीणीचा वेष धारण केला नसता, तर एव्हाना त्या दुष्ट सैतानानी माझी काया भ्रष्ट केली असती. या वेषामुळेच मी महाराजांचे लाख मोलाचे

पंचप्राण वाचवू शकले. महाराजानीच मला इथं आणून आपल्या कृपाछत्राखाली ठेवली. पण तुम्हाला माझा ठावठिकाणा कुणी सांगितला ?

जाधवराव : त्या ढोंगी तपस्विनीनं. तिनंच मला तुझ्याविषयी खोटं नाटं सांगून महाराजांविरुद्ध माझ्या मनात संशयाचं भूत निर्माण केलं, पण कमल तुझ्या मुखाकडे पाहताच साऱ्या गोष्टी जागच्या जागी विरून गेल्या.

कमल : नाथ, मी कुणाच्या आश्रयाला आहे याचा तरी विचार करायला हवा होता तुम्ही. त्या ढोंगी संतीणीनं माझा सूड घ्यायचा ठरविलेला होता.

जाधवराव : तुझा सूड ?

कमल : होय प्राणनाथ, त्या ढोंगी बाईनं रचलेल्या कपटकारस्थानाच्या चक्रव्यूहातून मी शिवाजी महाराजांचे प्राण वांचविले ही गोष्ट तिला आवडली नाही. कुठूनही मला आणि महाराजाना क्लेश व्हावा या दुष्ट हेतूनंच त्या चांडाळणीनं तुमचे कान नको त्या संशयाने भरवले; पण तुम्ही मनांतल्या संशयाला गाडून टाका. मी पूर्ण शुद्ध आहे याची खात्री बाळगा आणि माझा आनंदानं स्वीकार करून महाराजाना संशयाच्या पापी जाळ्यातून मुक्त करा.

जाधवराव : कमल, झाल्या गेल्या गोष्टी विसरून गेलोय मी. माझ्या मनांत महाराजाविरुद्ध असं आता काहीही राहिलं नाही.

शिवाजी : जाधवराव, एकवार कमलाबाईना प्रेमालिंगन देऊन तिचं मन शांत करा. ( दोघं एकमेकांना अलिंगन देतात ) शाब्बास ! जाधवराव, यापुढे आपण दोघानी खुशाल आनंदाने आमच्या मुक्कामी राहावे. आपल्यासारखा वीर शिरोमणी आणि आई तुळजा- भवानीवत् असलेली ही आपली वीरांगना आमच्या पाठीशी असतांना अविघ्न आमच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही.

जाधवराव : महाराज, आम्ही उभयता आपल्या पदरी सदैव राहू आणि येणाऱ्या प्रत्येक संकटातून महाराजांची शिताफीनं सुटका करू. या आमच्या वल्गना नव्हेत तर स्वराज्यासाठी केलेली ही मंगल प्रतिज्ञा आहे.

शिवाजी : अहाहा ! हा शिवाजी आज खरोखरच धन्य झाला. जाधवराव, आपल्या सहचारिणीला सोबत घेऊन आपण आमच्या मातोश्रींचं दर्शन

घेऊन या. तुम्हा दोघांच्या मस्तकी तिचाही आशीर्वाद असू दे. चला कमलाबाई, जाधवरावाना मातोश्रीकडे घेऊन जा.

कमल : जशी महाराजांची आज्ञा ( दोघं जातात )

शिवाजी : सर्जेराव, पाहिलीत आमच्या मायभवानीची अगाध लीला ? आमच्या वरती संकटांची चौफेर बरसात होत असतानादेखिल ती आमचं जातीनं रक्षण करतेय.

सर्जेराव : तिच्याच कृपेने सारं काही सुरळीत पार पडणारेय महाराज.

शिवाजी : होय सर्जेराव, तिच्याच अतुल शक्तिसामर्थ्यावर आता आमचं यश अवलंबून आहे

सर्जेराव : महाराज, खानाच्या स्वागताची एकूण एक तयारी पूर्ण होत आलीय.

शिवाजी : गडाच्या पायथ्याशी उभारण्यात येणारा मंडप पूर्ण झालाय ना ?

सर्जेराव : होय महाराज.

शिवाजी : आपणाला काही गोष्टी सांगायच्या राहून गेल्या सर्जेराव.

सर्जेराव : सांगा महाराज.

शिवाजी : आम्ही किल्ल्यावरून उतरल्यावर कर्णा वाजला म्हणजे आपापले जमावाने पुढे चालत यावे आणि बाणाच्या टप्यांत उभे राहावे, पण सावध मात्र असावे. तो खान कोणत्या वेळी आपले विचार बदलून आम्हाला दगा देईल हे सांगता यणार नाही.

सर्जेराव : त्याबद्दल महाराजांनी तिळमात्र चिंता बाळगू नये. प्रसंगी प्राणाची कुर्बानी करायला आम्ही तयार आहोत– पण तुम्हाला सुक्षेम ठेवू.

शिवाजी : आम्हाला पूर्ण खात्री आहे सर्जेराव. आपल्या सर्वांच्या थोर सहकार्यानेच आम्हा शत्रूला नेस्तनाबूद करणार आहोत. आणखी एक महत्वाची गोष्ट ध्यानी ठेवा सर्जेराव, दरवाजात मोठे-मोठे सरदार ठेवायला विसरूं नकोस, आम्ही कचेरीस आल्यावर त्यानी पुढे चालून यावे.

सर्जेराव . महाराज, आपल्या शब्दाबरहुकूम आम्ही सर्व काही व्यवस्थित करूं. आई तुळजाभवानीला जर स्वराज्याचा उषःकाल पाहायची हौस असेल तर महाराष्ट्रावर चालून आलेलं हे काळं कभिन्न सावट क्षणात दूर होईल.

**शिवाजी :** तरीपण सर्जेराव, आम्ही ज्या कार्यास हात घातला आहे त्यात कदाचित काही बरं वाईट घडल्यास आपण घाबरे न होता बेत केला त्याप्रमाणे गर्दी करून शत्रूस बुडवावे आणि स्वराज्याचे रक्षण करावे.

**सर्जेराव :** महाराज, आपल्या पुण्य प्रतापाने सर्व काही सुरळीत होणारेय. आपण उगाच काळजी करू नये. तो नरपशु आपल्यापुढे मुळीच टिकाव धरणार नाही. आम्हाला असं झालंय की कधी एकदा त्या मदोन्मत्त हत्तीच्या अंगावर तुटून पडूं आणि त्याचा चेंदामेंदा करू !

**शिवाजी :** आपल्या मनी आहे तेच होईल सर्जेराव. विजापुरच्या पादशहातीपुढे अफजुलखानानं आम्हाला जिवंत पकडण्याचा विडा उचलला, आणि यां प्रांती येताना वाटेतली देवळं- आंतील देवांनिशी उध्वस्त केली. असलं नीच कृत्य ज्या सैतानाकडून झालं त्याची मुलाखत घेणंसुद्धा आम्हाला खेदाचं वाटतंय. सर्जेराव, पण ठोशाला ठोशानच उत्तर द्यायला हवं आम्हांला. ज्या हातानी आमच्या अंबाबाईच्या मंदिराचा चुराडा केला, त्या हाताना स्पर्श करण्याचा विचित्र प्रसंग आज आमच्या नशीबी आलाय, पण वखतच असा आहेकी ज्याचं तोंड पाहू नये त्याचे पाय पहावे लागहेत. (कमल हातात फुलं घेऊन लगबगीनं येते.)

**कमल :** महाराज – आपणाला शुभशकून झाला मातोश्रीचं दर्शन घेऊन आम्ही अंबाबाईच्या दर्शनाला गेलो तर तिथं काय आश्चर्य ! देवीच्या मस्तकावरचा पुण्य-प्रसाद खाली पडला. मी तो मोठ्या आनंदाने आपल्याला देण्यासाठी घेऊन आले. घ्या ह्या आईचा प्रसाद. ( देते )

**शिवाजी :** (स्वीकारित) अहाहा ! आई अंबा भवानी, अखेर तू तुझ्या कृपाप्रसादानं आम्हाला कृतार्थ केलंस. चला सर्जेराव, आम्ही आता नव्या जोमानं आमच्या कामाला प्रारंभ करूया. (बाहेर जातात)

**कमल :** अविंधाचा त्रास होऊ नये म्हणून धारण केलेला हा संतीणीचा वेष मनांतल्या पुष्कळ गोष्टी साध्य करून गेला. पती नसतां संसार आणि देव नसतां देव्हारा काय कामाचा ? आता या संतपदाचा राजीनामा देवून संसार करावा आणि पतिसेवा ही ईशसेवा मानून रहावं. शिवप्रभूच्या

आश्रयाला यायचं आमचं अधुरं स्वप्न तर पुरं झालंच. आतां प्राणपणानं संकटाला सामोरं जावून महाराजांचं रक्षण करावं. आई अंबाभवानी, तूंच आतां आम्हां सर्वांची रक्षण कर्ती आहेस.

॥ पद ॥

आई जगदंबिके भवानी
रक्षिसी तूंची शिव-स्वामिनी ॥ धृ ॥
प्रसाद देवूनी कृतार्थ केले
स्वराज्याचे मंगल झाले
मोद किती मम भरे मन्मनी ॥ १ ॥

(गाणं- संपतांच- अंधार)

## दृष्य ५ वे

स्थळ : ( अफझूलखानाच्या भेटीसाठी उभारलेला मंडप. वेळ- माध्यान्हीची. अफझूलखान, कृष्णाजी भास्कर, सय्यद बंडा प्र. क. )

अफझुल : कहाँ है वो शहाजीका बच्चा ?

कृ. भास्कर : खाविंद, माध्यान्हीची वेळ दिलीय त्याने आपल्याला.

अफजुल : मालूम है वकीलजी, लेकिन माध्यान्ह तर होत आली. अजून कसा पत्ता नाही त्या सेवाजीचा ?

सय्यद : खाविंद, हरामखोरानं आमच्या हातावर तुरी तर दिली नाही ना?

कृ. भास्कर : होय खाविंद, कदाचित ...

अफझुल : खामोष !

कृ. भास्कर : खाविंद, कदाचित तो काफर भुयारी मार्गानं पळून जाईल.

अफझुल : नही -नही ऐसा नही होगा. त्या हैवानानं पळून तर पहावं ? असेल तिथून त्याच्या मुसक्या बांधून आणि वर चाबकांचे फटकारे मारून त्याला आम्ही ओढीत आणू आमच्या पायाशी. पाठीची चांबडी रक्तबंबाळ होईपर्यंत झोडपल्यावर तरी वठणीवर येईल की नाही तो ?

कृ. भास्कर : खाविंद, बोलण्याची माफी असावी. आम्हाला तसं वाटलं म्हणून बोललो आम्ही...

अफजुल : तुम्हाला काय वाटतं त्याचा विचार आम्ही करणार नाही— यावेळी. तुम्हाला बहोत शंका येतील, लेकिन या घडीला त्याचा काही उपयोग नाही (बाहेरून मीर गुलाम प्र. क.)

मीर गुलाम : (कुर्निसात करतो) खाविंद, आपको मिलने केलिये सेवाजीका वकील आया है.

अफजुल : यहाँ भी सेवाजीका वकिल ? (हंसतो) भेज दो तुरंत. (जातो) त्या सेवाजीच्या वकिलाला काय उद्योग आहे दुसरा ?

सय्यद : मला असं वाटतंय, माध्यान्ह जशी जशी जवळ येत चाललीय तशी त्या सेवाजीच्या पोटात कालवाकालव सुरू झाली असणार.

अफझुल : सच है — सच है ... बंडा, तो आता आम्हाला पुरता घाबरून गेलाय. एकदा भेटीला तर येऊदे — अस्सा चिरडून टाकतो निमकहरामाला की मरताना ओरडतासुद्धा येऊ नये. (बाहेरून पंताजी गोपीनाथ प्र. क.)

पं. गोपीनाथ : खाविंद, शिवाजी महाराजांच्या आगमनाची वार्ता घेऊन आलोय मी.

अफझुल : महाराज, मत कहो — वो सैतान है — सैतान.

पंत गोपीनाथ : खाविंद, थोडा अन्याय झाला खरा, त्याबद्दल माफी असावी. शिवाजी राजे

अफजुल : राजे नही सिरफ सेवाजी.

पंत गोपीनाथ : होय खाविंद, शिवाजी आपल्या निवडक सैन्यानिशी गडावरून खाली येऊन इकडच्या वाटेला लागायची वेळ झाली. गड सोडताच तोफांची सलामी होईल. आणि शिवाजी मार्गस्थ होतील. आपणाला सावधानतेचा इषारा दिलाय त्यांनी,

अफजुल : आम्ही हमेशा सावध असतो वकीलजी. आपण जाऊ शकता. सेवाजीला सांगा की, खानसाहेब आपल्या भेटीला तय्यार आहेत.

पंत गोपीनाथ : ठीक आहे. येतो आम्ही (जातात).

अफजुल : वकीलजी, ऐकलीत दगाबाज सैतानाची भाषा ? म्हणे " आम्ही येतो आहो... याखातर खाविंदानी सावध राहावं. " क्वारे भाषा ! हं

हरामखोरा तूच आता तुझ्या जीवाचं बघून घे. आमच्या जिनगानीची काळजी का करतोस ?

सय्यद : खाविंद, तो फक्त बोलायचं म्हणून बोलतोय. लेकिन तसं पाहातां आता त्याच्यांत काही ताकद राहिली नाही. (गडावर तोफांचा आवाज)

कृ. भास्कर : खाविंद, शिवाजी गडावरून सुटला. आतां आपण जागरूक असावं.

अफजुल : वकीलजी... आम्ही आमच्या संपूर्ण तयारीनिशी खडे आहोंत. आमचं रक्षण करायला अल्ला भी खडा है. या अल्लालासुद्धा आमची भिती वाटते. सय्यद, साऱ्या गोष्टी लक्षपूर्वक आंखलेल्या आहेत ना ?

सय्यद : होय खाविंद– कशाचीही कसूर केलेली नाही.

अफझुल : ठीक है. सेवाजी आमच्या भेटीला येताच आम्ही त्याची भेट घेऊ आणि लागलीच क्षणाचीही वेळ न दवडता आमची तळपती समशेर आम्ही त्याच्या मस्तकात घालू. लेकिन त्याचवेळी मात्र आमच्या सैन्याला हल्ला करण्याचा हुकूम सोडावा. चारी बाजूनं कापाकापी सुरू झाली की हैवानाची बोबडी कायमची जाम होऊन जाईल.

सय्यद : खाविंदानी कसलीच चिंता करू नये. सारं काही ठाक-ठिक करतो मी ( पडद्यात 'हरहर महादेव – बोला शिवाजी महाराज की जय' ) खाविंद, निमकहराम सेवाजी शामियान्याच्या नजदीक आला वाटतं ( हर-हर-महादेव – गोब्राह्मण प्रतिपालक क्षत्रिय कुलावंतंस् शिवाजीमहाराज की जय ) ( पाहात ) खाविंद – खाविंद सेवाजी मंडपाच्या अगदी नजदीक पोंचला.

अफजुल : कोई पर्वा नही बंडा, हम भी तय्यार है. एकदा येवूंदेच त्याला. ( हर हर महादेव-आई तुळजाभवानी की जय ... शिवाजी महाराज की जय .. अशा घोषणा अगदी खड्या आवाजांत ऐकू येतात. आणि मागोमाग तानबा-सर्जेराव-जाधवराव-येसाजी कंक-पंताजी गोपीनाथ-शिवाजीसह प्र क. बरोबर काही मराठा शिपाई आहेत, शिवाजीने डोक्यास शिरस्त्राण व त्यावर पटका बांधला आहे. अंगात चिलखत व त्यावर अंगरखा घातलेला आहे. कमरेला समशेर, बिचवा असून बोटात वाघनखे आहेत. )

शिवाजी : खाविंद, आम्ही विजापूरच्या तख्ताचे पिढीजात नोकर या नात्याने आपले यथोचित स्वागत करीत आहो. काही कमतरता जाणवल्यास खाविंद माफी करतील याची मनी खात्री आहे. आमच्याकडून जेवढं होईल तेवढं आम्ही केलं आहे. आजुबाजूला केलेली स्वागताची शाही तयारी खाविदांनी डोळे भरून पाहिली असेलच.

अफजुल : (अुसनं हास्य) सेवाजी राजे ... आम्ही आपल्या सरबराईबद्दल बहोत आभारी आहोत. आपकी यह शाही तयारी देखकर बडी खुशी आगयी. आयीये – आयीये– सेवाजी राजे – आम्ही आपणास प्रेमालिंगन देवून आपल्या बहुमोल कार्याची कदर करीत आहोत. आयीये आयीये.

कृ. भास्कर : महाराज, खाविंद आपल्या बहुमोल कार्याची कदर करताहेत. एकवार त्याना दृढालिंगन देवून त्यांचं मन शांत करा.

शिवाजी : वकील साहेब, आम्ही खाविंदाना आलिंगन देण्यासाठीच मुद्दाम इथं आलो आहोत.

अफझुल : राजे मग विलंब कां करतां ? आम्ही अगदी अुत्सुक झालो आहोत आपल्या प्रेमळ आलिंगनाला ? आयीये– पहले आलिंगन देवून नंतरच पुढच्या बोलण्याला प्रारंभ करूया.

कृ. भास्कर : हो– हो– हे तर खरंच आहे.

पं. गोपीनाथ : महाराज, खाविंदाची इच्छा एकवार पूर्ण करा. उगाच त्याना तिष्ठत ठेवणं बरं नव्हे.

शिवाजी : पंत, आम्ही आजवर कुणालाही तिष्ठत ठेवलेलं नाही, आणि तसं ठेवणंही आमच्या मानी मनाला पटत नाही. स्वागताची आम्ही जी एवढी शाही तयारी करून त्याचं यथोचित स्वागत केलं, ते आम्ही त्यांच्या आलिंगनाला विरोध करूं का ? नाही पंत, [आमच्या हातून एवढा कृतघ्न-पणा कधीही होणार नाही. या खाविंद, गो-ब्राह्मण प्रतिपालक– शिवाजी आपल्याला खुल्या अंतःकरणाने दृढालिंगन देत आहे. खाविंदानीही खुल्या दिलानं आमची भेट घेऊन आम्हाला उपकृत करावं.

अफझुल : ( पुढे येत ) आयीये–आयीये – सेवाजीराजे, यही घडीकी हम राह देखते थे. आम्ही आपली भेट या प्रतापगडाच्या छायेत मोठ्या

खुल्या दिलानं घेत आहोत. ( दोघे परस्पराना भेटतात. अफझुलखान कावा करून समशेर शिवाजीच्या मस्तकावर उगारतो. दगा आहे हे ओळखून शिवाजी अफझुलखानाच्या बरगड्यात वाघनखे खुपसतात. खान चित्कारतो. ' या अल्ला – या अल्ला – दगा – दगा ' असं ओरडत खाली कोसळतो. एवढ्यात मराठी फौज खानाच्या लोकावर तुटून पडते. काही वेळ सर्वत्र हाहा:कार – ओरड – विव्हळणे – मध्येच हर हर महादेव – शिवाजी-महाराजांचा विजय असो इत्यादी घोषवाक्ये. तानाजीचा वार लागून सय्यद बंडा ठार होतो. मीर गुलाम सर्जेरावाच्या समशेरीला बळी पडतो. काही मुसलमान सैनिकही मरून पडतात. काही मराटेही. सर्वत्र एकच धुमाकूळ.

शिवाजी : तानवा–सर्जेराव लढाई आंवरती घ्या. समशेरी तावडतोब म्यान करा. आमचं कार्य संपलं. आम्हाला आई भवानीनं यशश्री बहाल केली. शत्रूचा पराभव झाल्यानंतर त्याच्या मुड्याशी झुंजण्यात मुळीच पुरुषार्थ नाही. अखेर प्रतापगडाच्या छायेंतच खानाला मृत्यू आला. ज्यानं आमचा सर्वनाश करण्यासाठी बादशहाच्या समोर पैजेचा विडा उचलून विजापूर सोडलं त्याचं पाऊल अखेर इथंच कायमचं स्थिरावलं. चला शूर वीरानो. आताच्या आता वाईहून मुल्लाला बोलावून घ्या आणि शाही इतमामानं खान साहेबांचा दफन विधी उरका. दगाबाजी करून जरी त्यानी आमच्या मस्तकावर समशेरीचा वार करण्याचा कपटी प्रयत्न केला असला तरी आम्ही त्याचा सूड खानाच्या मृत मुड्यावर उगवणार नाही. कुणीही आता खानाच्या मुड्याची विटंबना करायची नाही.

कृ. भास्कर : शिवाजी राजे आपण दगा केलात. ही रीत नव्हे तुमची.

शिवाजी : आम्ही दगा केला ?

कृ. भास्कर : होय– आता तुम्ही जिवंत सुटू शकणार नाही इथून.

शिवाजी : वकीलसाहेब, चुकताहा आपण – निदान आपल्याला तरी ...

कृ. भास्कर : नाही – नाही – हा निव्वळ दगा आहे.

शिवाजी : वकीलसाहेब, उगाच कुभांड रचताहा आपण.

कृ. भास्कर : ही पळवाट आहे तुमची, पण याचं शासन मी स्वतः देणार आहे तुम्हाला ...

शिवाजी : सर्जेराव आम्हाला नाहक दुःख देणाऱ्या या वकीलसाहेबांचा प्रथम समाचार घ्या.

सर्जेराव : आपली आज्ञा होताच हा वीर मुळीच गप्प राहाणार नाही. महाराजाना दगलबाज म्हणणाऱ्या या– या– कपटी वकीलाची मुंडी समशेरीनं अश्शी उडविली पाहिजे ( कृ. भास्करांवर वार करून त्याना ठार करतो ;

शिवाजी : चला- महत्वाची माणसं सुद्धा शेवटी आपणहून मृत्यूला सामोरी गेली. तानबा– सर्जेराव– खानाचं प्रेत जवळच्या शामियान्यात हलवा. जाधवराव आपणही चला त्यांच्या मदतीला. येसाजी, आपण काही मराठागडी घेऊन वकीलाचं प्रेतही उचला.

सर्वजण : जशी महाराजांची आज्ञा. ( खानाचे व कृ. भास्कराचे प्रेत नेतात. मराठा शिपाई – सय्यदचे व मीर गुलामाचे प्रेत नेतात )

पं. गोपीनाथ : महाराज, महाराष्ट्रावर आलेलं एक महान संकट– तर आई भवानीनं दूर केलं. आता त्या जावळीकरांच्या पोरीचा समाचार घ्यायला पाहिजे.

कमल : (बाहेरून धांवत येते) महाराज- महाराज- जावळीकरांच्या पोरीनं तलावांत उडी घेऊन आत्महत्या केली.

शिवाजी : (आश्च.) काय ? जावळीकरांच्या पोरीनं आत्महत्या केली ? (येसाजी येतात) येसाजी आपण जातीनं जावून प्रेत तलावातून बाहेर काढून घ्या. जावळीकरांच्या पोरीनं आत्महत्या केलीय म्हणे तलावांत. चला लवकर प्रेताचे हाल न करता. तिची खणा नारळानं ओटी भरून प्रतापगडाच्या छायेत तिचाही इतबारे अंत्यसंस्कार करून घ्या. ती जरी आमच्याशी दुष्मनी करीत असली तरी या घडीला आमचं धर्मकर्तव्य पार पाडलंच पाहिजे. चला – निघा – लवकर.

येसाजी : जशी महाराजांची आज्ञा. ( जातात )

( बाजूनं–तानबा–सर्जेराव–जाधवराव येतात )

शिवाजी : तानबा – सर्जेराव, अखेर तारानंही आपला देह मृत्यूच्या स्वाधीन केला. तिनं आत्महत्या केली ...

सर्व : आत्महत्या ?

शिवाजी : होय. तिच्या प्रेतावर अंत्यसंस्कार करण्यासाठी येसाजीही आतांच रवाना झाले. आपण आता प्रथम मायमाऊलीचं दर्शन घ्यायचं. तिच्याच मंगल प्रसादानं हे सर्व घडून आलंय... पंत, आपणही या आमच्या सोबत.

सर्व : चला–महाराज – ( सर्वजण शिवाजीचा जयजयकार करीत जात असतानाच समोरचा पडदा हळू हळू खाली येतो. )

श्रीसाईबाबार्पणमस्तु.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २९९ दिनांक
विषय किशोर क्र. २५०.

BVBK-0400291